सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | रविवार, १५ डिसेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २६१ | पाने : ८+८ आसमंतसह | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# ...तर काँग्रेस आणि शरद पवारांनीही ठाकरेंची साथ सोडावी : ऑल इंडिया उलेमा बोर्ड

तभा वृत्तसेवा/ जमीर काझी
मुंबई दि. १४ डिसेंबर :

लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकीत उध्दव ठाकरे यांच्या शिवसेनेला उघडपणे पाठिंबा देऊन अल्पसंख्यांक समाजाची मते त्यांच्या पारड्यात टाकण्यात मोलाची भूमिका बजावणाऱ्या ऑल इंडिया उलेमा बोर्ड आता त्यांच्याशी पंगा घेण्याच्या पवित्र्यात आहे. ६ डिसेंबरच्या बाबरी शहीद दिनाचे उदात्तीकरण करण्याची ठाकरे गटाची भूमिका उलेमा बोर्डला पचनी पडलेली नाही. त्यामुळे काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने त्यांची भविष्यातील राजकारणाची दिशा जाणून घ्यावी. त्यांना जर हिंदुत्वावरच भर द्यावयाचा असल्यास समाजवादी पार्टीप्रमाणेच त्यांनीही ठाकरेंच्या शिवसेनेपासून बाजूला व्हावे, अशी आक्रमक भूमिका घेतली आहे.

६ डिसेंबरला ठाकरे गटाकडून त्यांचे मुखपत्र असलेल्या सामना वृत्तपत्रात जाहिराती देऊन आणि बॅनर लावून बाबरी मशिदीच्या हौतात्म्याबद्दल अभिमान व्यक्त केला होता, उध्दव ठाकरे यांचे स्विय सहाय्यक मिलिंद नार्वेकर यांनी ट्विटरवर पोस्ट करून या घटनेचा अभिमान व्यक्त केला होता. त्याबाबत सपाचे अबू आजमी यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.या मुद्द्यावरून महाविकास आघाडीतून बाहेर पडत असल्याचे जाहीर केले. महाविकास आघाडीसह ठाकरे गटाला विधानसभेत दारूण पराभवाला सामोरे जावे लागले .९७ जागा लढवून जेमतेम २० आमदार निवडून आले. त्यामागील विविध कारणाबरोबरच हिंदूत्वांच्या मुद्यापासून बाजूला गेल्याचा फटका बसल्याचे पक्षातील काही नेत्यांचे मत आहे.



**उध्दव ठाकरे यांना २०१९ पासून मुस्लिम समाजाने मोठी साथ दिली आहे. मात्र ते जर पुन्हा धार्मिक तेढ निर्माण करणारे ला प्रोत्साहन देत असल्यास महाविकास आघाडी पासून त्यांना बाजूला करणे योग्य राहील शरद पवार व काँग्रेसने त्याबाबत त्यांच्याकडून एकदा स्पष्टीकरण घ्यावे अन्यथा अल्पसंख्यांक समाज त्यांच्याही पाठीशी राहणार नाही.**
**-मौलाना अल्लामा बुनई हसानी**
**( सरचिटणीस, ऑल इंडिया उलेमा बोर्ड)**

आगामी मुंबई महापालिका निवडणुकीत पुन्हा आक्रमक हिंदुत्ववादी भुमिका घेण्याचा आग्रह करण्यात येत आहे.

त्या पाश्र्वभूमीवर ऑल इंडिया उलेमा बोर्डच्या कार्यकारिणीची बैठक झाली. त्यामध्ये ठाकरे गटाच्या भूमिकेबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली.

महाविकास आघाडीची स्थापना करताना कोणत्याही परिस्थितीत अल्पसंख्याक समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्या जाणार नाहीत. अशी अट घालण्यात आली होती.

इतकेच नाही तर बाबरी मशिदीबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलानेही शौर्य दिवस साजरा करणे बंद केले आहे. ठाकरे गटाच्या आमदारापैकी बहुतांश जागा या मुस्लिम बहुल भागातील आहेत. मुस्लिम अनेकदा भावनेपोटी मतदान करतात, त्यामुळे मुस्लिम नेतृत्व उदयास येत नाही. असे असताना ठाकरे गटाच्या कृतीतून त्यांनी मुद्दाम मुस्लिमांच्या भावना दुखावल्याचे सिद्ध होते. उद्धव ठाकरेंची शिवसेना मुस्लिमविरोधी राजकारणावर आधारित असून ती कधीही आपल्या कारवायांपासून दूर राहणार नाही, त्यामुळे काँग्रेस व शरद पवार गटाने त्याच्यापासून अलिप्त व्हावे , सांप्रदायिक शक्तींना दूर करण्याची आवश्यकता आहे.अशी भूमिका मांडण्यात आली आहे.

# दिल्लीकडे जाणाऱ्या शेतकऱ्यांना रोखले

नवी दिल्ली, १४ डिसेंबर : दिल्लीच्या दिशेने कूच करणाऱ्या शेतकऱ्यांना आज, शनिवारी हरियाणा आणि पंजाब सिमेवरील शंभू सीमेवर थोबवण्यात आले. याठिकाणाहून १०१ शेतकऱ्यांचा गट दिल्लीकडे कूच करेल असे जाहीर करण्यात आले होते. परंतु, पोलिसांनी त्यांना मज्जाव करत परत पाठवले.



शेतकरी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर हरियाणा सरकारने अंबालामधील काही भागात इंटरनेट सेवा बंद करण्याचे आदेश दिले आहेत. आजपासून १७ डिसेंबरच्या मध्यरात्री १२ वाजेपर्यंत इंटरनेट बंद राहणार आहे. शंभू सीमेवरून दिल्लीकडे शेतकऱ्यांचा निषेध मोर्चा पुन्हा सुरू होण्याच्या काही तास आधी, हरियाणा सरकारने शनिवारी 'सार्वजनिक शांतता' राखण्यासाठी अंबाला जिल्ह्यातील १२ गावांमध्ये मोबाइल इंटरनेट आणि मोठ्या प्रमाणात मोबाईल-एसएमएस सेवा बंद करण्यात आली आहे. अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) सुमिता मिश्रा यांनी जारी केलेल्या आदेशानुसार हे निलंबन १७ डिसेंबरपर्यंत लागू राहणार आहे.

आदेशामध्ये म्हटले आहे की, 'अतिरिक्त पोलिस महासंचालक, सीआयडी, हरियाणा आणि उपायुक्त, अंबाला यांनी माझ्या निदर्शनास आणून दिले आहे की, काही शेतकरी संघटनांनी दिल्ली मार्चचे आवाहन केल्यामुळे तणाव, आंदोलन, सार्वजनिक अंबाला जिल्ह्याच्या परिसरात अशांतता आणि खाजगी मालमत्तेचे नुकसान आणि सार्वजनिक शांतता भंग होण्याची शक्यता आहे. ते म्हणाले की, अंबाला येथील डांगडेहरी, लेहगढ, मानकपूर, दादियाना, बारी घेल, छोटी घेल, लहरसा, कालू माजरा, देवी नगर (हीरा नगर, नरेश विहार), सदोपूर, सुलतानपूर आणि काकरू या गावांमध्ये मोबाईल इंटरनेट बंद करण्याचे आदेश ही बाब आहे. सार्वजनिक सुव्यवस्थेत कोणत्याही प्रकारचा गडबड होऊ नये म्हणून शांतता आणि सुसंवाद जारी केला आहे. हे निलंबन १४ डिसेंबर रोजी सकाळी ६ ते १७ डिसेंबर रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत लागू असेल. तर दुसरीकडे कुस्तीपटू बजरंग पुनियाने शेतकऱ्यांना समर्थ जाहीर केले आहे. शंभू बॉर्डरला रवाना होण्यापूर्वी बजरंग पुनिया यांनी 'वन नेशन, वन इलेक्शन' या विषयावर बोलताना 'देशात वन नेशन, वन इलेक्शन'ची चर्चा होऊ शकते, तर वन नेशन, वन एमएसपीचीही अंमलबजावणी व्हायला हवी अशी मागणी बजरंगने केलीय.

# परीक्षा देतानाच विद्यार्थ्याचा दुर्दैवी मृत्यू

बीड : बीड जिल्ह्यात एक धक्कादायक घटना घडल्याचे समोर आले आहे. पेपर लिहत एका विद्यार्थ्याचा जीव गेला असल्याची घटना घडली आहे. बीडमधील के. एस. के. महाविद्यालयातील परीक्षा केंद्रावर परीक्षा देत असतानाच विद्यार्थ्याला हृदयविकाराचा झटका आला. यामुळे त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला असून परिसरातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बीडमध्ये परीक्षा देत असताना एका २४ वर्षीय विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. सिद्धार्थ मासाळ असे विद्यार्थ्याचे नाव असून तो पदवीच्या पहिल्या वर्षाची परीक्षा देत होता. के एस के महाविद्यालयातील परीक्षा केंद्रावर परीक्षा देत असतानाच त्याला हृदयविकाराचा झटका आला. त्यामुळे त्याचा मृत्यू झाला.

या तरुणाचा मृत्यू झाल्यानंतर शवविच्छेदन करण्यासाठी मृतदेह जिल्हा रुग्णालयात नेण्यात आला. हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या नसांमध्ये गाठी तयार झाल्याने त्याला हृदयविकाराचा धक्का आल्याचे शवविच्छेदनातून समोर आले आहे.

# आता विद्यार्थ्यांच्या सहलीचा प्रवास होणार राज्य परिवहन बसमधून!

## शिक्षणाधिकारी बी.टी. पाटील यांचे आदेश

नाशिक : हिवाळा हा शैक्षणिक सहलींचा हंगाम असल्याने अनेक शाळांकडून शैक्षणिक सहलींचे नियोजन केले जात आहे. या शैक्षनिक सहल खासगी बसमधून नेण्यात येतात. मात्र या सहलींबाबत शिक्षणाधिकाऱ्यांनी आदेश जारी केले आहेत.

नागपूर येथील सरस्वती विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना सहलीला घेऊन जाणाऱ्या बसला अमरावती रोडवर देवरी पेंढरी गावाजवळ अपघात होऊन विद्यार्थिनीचा मृत्यू झाला होता.



**काय आहेत शिक्षणाधिकाऱ्यांचे आदेश?**
**१.महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसनेच सहल न्यायी. २.शालेय सहलीसाठी शिक्षण विभागाची पूर्वपरवानगी घ्यावी. ३.सहलीत सहभागी विद्यार्थ्यांच्या पालकांकडून संमतिपत्र घ्यावे. ४.कुठल्याही विद्यार्थ्याला सहलीची सक्ती केली जाऊ नये. ५.सूचनांचे पालन न केल्यास मुख्याध्यापकांवर जबाबदारी निश्चित करणार.**

यावेळी तपासादरम्यान बसचालकाकडे परवाना नसल्याचे आणि शाळेने सहलीसाठी शिक्षण विभागाची अधिकृत परवानगीदेखील घेतली नसल्याचे समोर आले होते. त्यामुळे आता महापालिकेचे शिक्षणाधिकारी बी.टी. पाटील यांनी महापालिका हद्दीतील सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांना परिपत्रक जारी करत, शाळांच्या सहलीसाठी खासगी बसेसचा वापर करण्यास बंदी घातली आहे.

त्याचबरोबर आता केवळ महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसचा वापर करावा आणि वाहकांची शारीरिक स्थिती योग्य असल्याची तपासणी करून घ्यावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

# घाटकोपरमध्ये क्रेन कोसळून भीषण अपघात!



मुंबई : घाटकोपरमधील पूर्व द्रुतगती मार्गावर क्रेन कोसळून भीषण अपघात झाला आहे. यामध्ये एक दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला आहे. तसेच या अपघातामुळे घाटकोपर उड्डाणपुलावरील वाहतूक काही काळासाठी बंद करण्यात आली आहे.

# २५ वर्षे वय असेल तरच मिळणार दारू, दिल्ली सरकारचे आदेश

नवी दिल्ली : तरुणांमध्ये वाढत चाललेले मद्यपानाचे प्रमाण पाहता दिल्ली सरकारने मद्यपानाचे वय निश्चित केले आहे. यापुढे २५ वर्ष आणि त्यावरील लोकांनाच मद्यपान करता येणार आहे. तसेच मद्यपानासाठी मद्यपींना वय नमूद असलेले ओळखपत्र किंवा पुरावा द्यावा लागणार आहे. दिल्ली सरकारने हॉटेल, क्लब, रेस्टॉरंट, परमिट रूमधारकांसाठी निर्देश जारी केले आहेत.

दिल्लीतील उत्पादन शुल्क खात्याला नियमांचे उल्लंघन होत असल्याचे निर्दशनास आले होते. अल्पवयीन मुलेही मद्यपान करीत असल्यामुळे वयाची अट निश्चित करण्यात आली आहे. मद्यपींना ओळखपत्र दाखविल्याशिवाय दिल्लीमध्ये मद्यपान करण्यास



परवानगी मिळणार नाही. अल्पवयीन अथवा २५ वर्षांच्या आतील मुलांना मद्यविक्री केल्यास परवाना रद्द करण्यात येणार आहे. परवानाधारक अथवा त्यांच्या कर्मचार्यांना नव्या अटींचे पालन करावे लागणार आहे. दिल्लीतील सर्व हॉटेल्स आणि रेस्टॉरंटमध्ये दिल्ली सरकारने परिपत्रक धाडले आहे.

उत्पादन शुल्क खात्याने वयाची खातरजमा करण्यासाठी मद्यविक्री परवानधारकांसाठी नवीन ॲप सुरू केले आहे. डीजीलॉकर ॲपद्वारे परवानाधारकांना मद्यपींच्या वयाची खातरजमा करता येणार आहे. भौतिक आयडीचा वापर केल्यानंतर मद्यपीचे वय २५ वर्षांपेक्षा जादा आहे की लहान हे समजण्यास मदत होणार आहे.

मद्यसेवनासाठी २१ व २५ वयाची अट ठेवण्यात आली आहे. त्यानुसार सौम्य क्षमतेचे मद्यसेवन करण्यासाठी २१ वय पूर्ण असणे आवश्यक आहे. तर 'हार्ड ड्रिंक' करण्यासाठी २५ वय पूर्ण असणे आवश्यक आहे. तसेच मद्य वाहतुकीसाठीही हाच नियम लागू आहे. कायद्यानुसार, महाराष्ट्रात दारू खरेदी करण्यासाठी, बाळगण्यासाठी, वाहतूक करण्यासाठी किंवा सेवन करण्यासाठी मद्य परमिट आवश्यक आहे. तसेच २५ वर्षांपेक्षा जास्त वयाची कोणतीही व्यक्ती त्याच्या आरोग्याची जपणूक आणि देखभाल करण्यासाठी मद्य परमिट मिळविण्यास पात्र आहे. परवानाशिवाय मद्य खरेदी करणे, सेवन करणे हा 'बॉम्बे प्रोहिबिशन क्ट, १९४९ अंतर्गत गुन्हा आहे.

# काँग्रेसच्या काळात राज्यघटनेचा गळा दाबला : अनुराग ठाकूर

नवी दिल्ली, १४ डिसेंबर : राहुल गांधी राज्यघटना खिशात ठेवतात पण त्याचे पालन करीत नाहीत. काँग्रेसच्या कार्यकाळात शिखांची कत्तल झाली होती. काँग्रेसने आपल्या काळात राज्यघटनेचा गळा दाबण्याचे काम केल्याचे भाजप खासदार अनुराग ठाकूर यांनी म्हंटले. लोकसभेत राज्यघटनेवर सुरू असलेल्या चर्चेदरम्यान राहुल गांधींनी केलेल्या आरोपांना प्रत्युत्तर देताना ठाकूर बोलत होते.

राज्यघटनेवरील चर्चेत सहभागी होताना विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सरकारला चांगलेच धारेवर धरले. सरकारवर आरोप करताना राहुल म्हणाले की, ज्याप्रमाणे द्रोणाचार्यांनी एकलव्याचा अंगठा कापला, त्याचप्रमाणे भाजप भारतातील तरुणांचा अंगठा कापत असल्याचे राहुल गांधी म्हणाले.

# प्रकृती अस्वास्थ्यामुळे लालकृष्ण अडवाणी पुन्हा दिल्लीतील रुग्णालयात दाखल

नवी दिल्ली: भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी गृहमंत्री लालकृष्ण अडवाणी यांची प्रकृती पुन्हा एकदा खालावली. त्यामुळे त्यांना नवी दिल्लीतील अपोलो रुग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. अडवाणींची प्रकृती गेल्या दोन आठवड्यापासून खूपच नाजूक असल्याचे सांगितले जात आहे. सध्या त्यांचे वय ९७ वर्षे आहे. डॉक्टरांचे पथक त्यांच्यावर उपचार करत आहे.

अडवाणी यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे शनिवारी सकाळी दिल्लीतील अपोलो रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. रुग्णालयातून मिळालेल्या



प्राथमिक माहितीनुसार, त्यांची प्रकृती सध्या स्थिर आहे. लवकरच मेडिकल बुलेटिन जारी केले जाईल. गेल्या ४-५ महिन्यांत त्यांना रुग्णालयात दाखल करण्याची ही चौथी वेळ आहे आहे. ऑगस्ट महिन्यात अपोलो रुग्णालयात, यापूर्वी २६ जून रोजी त्यांना दिल्लीतील एम्समध्ये दाखल करण्यात आले होते. त्यांना न्यूरोलॉजी विभागाच्या निरीक्षणाखाली ठेवण्यात आले होते. दुसऱ्या दिवशी त्यांच्यावर छोटी शस्त्रक्रिया झाली. त्यानंतर त्यांना डिस्चार्ज देण्यात आला होता.

लालकृष्ण अडवाणी हे गेल्या काही महिन्यांपासून आरोग्यविषयी समस्यांचा सामना करत आहेत. त्यामुळेच ते त्यांच्या घरीच राहतात आणि कोणत्याही सार्वजनिक कार्यक्रमाला येत नाहीत. अडवाणी यांना यावर्षी देशाचा सर्वोच्च सन्मान भारतरत्नही प्रदान करण्यात आला होता. मात्र प्रकृतीच्या कारणास्तव ते राष्ट्रपती भवनातील कार्यक्रमाला उपस्थित राहू शकले नव्हते. त्यांना त्यांच्या निवासस्थानीच भारतरत्न प्रदान करण्यात आला होता.

# इपीएफओच्या नियमांत बदल; लगेचच मिळणार पीएफचे पैसे

मुंबई : एझत्रृ्ज सदस्यांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. याआधी पीएफचे पैसे क्लेम केल्यानंतर सात ते दहा दिवसांची वाट पाहावी लागते. त्यानंतर पैसे संबंधित बँक अकाउंटमध्ये ट्रान्सफर केले जात होते. मात्र आता पीएफचे पैसे लगेचच मिळू शकणार आहेत.

ईपीएफओ मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत आहे. त्यानुसार, सदस्य अगदी सोप्या पद्धतीने पैसे काढू शकणार आहेत. ईपीएफओ सदस्यांना या नवीन सर्व्हिससाठी खास कार्ड देणार आहे. त्यामुळे सदस्य लवकरच पीएफचे पैसे एटीएममधून काढू शकणार आहेत. ही सेवा लवकरच ही सर्व्हिस लाँच केली जाणार आहे. यामुळे ईपीएफओ सदस्यांना खूप फायदा होणार आहे.

ईपीएफओ सदस्यांसाठी खास कार्ड

ईपीएफओने सात कोटीपेक्षा



जास्त सदस्य या योजनेचा लाभ घेऊ शकणार आहेत. या सर्व्हिसअंतर्गत कर्मचाऱ्यांना एक कार्ड दिले जाणार आहे. या कार्डमुळे ते एटीएममधून पैसे काढू शकणार आहे.

नॉमिनीला मिळणार ही सर्व्हिस

एझत्रृ्ज योजनेतील एखाद्या सदस्याचा दुर्दैवी मृत्यू झाला तर त्यांचा नॉमिनी हे पैसे काढू शकतात. एऊ्रख योजनेअंतर्गत मृत कर्मचाऱ्याचे नॉमिनी ७ लाखांपर्यंत पैसे काढू शकतात.

# दोन घरं जळून खाक; एकाचे अडीच लाखांचे तर दुसऱ्याचे तीस हजारांचे नुकसान

## गावकऱ्यांनी दाखविलेल्या प्रसांगवधानामुळे टळला मोठा अनर्थ

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि.१४ डिसेंबर**

तालुक्यातील टाकळी येथील दोन घरांना शनिवारी रात्री साडेबाराच्या सुमारास आकस्मिकपणे भिषण आग लागून एकमेकांना शेजारी असलेल्या दोन सख्ख्या चुलत भावांची घरे आगीत जळून खाक झाली.यात श्रीराम यांचे जवळपास अडीच लाखांचे नुकसान झाले तर लक्ष्मण यांचे ३० हजारांचे नुकसान झाले आहे. गावकऱ्यांनी दाखविलेल्या प्रसांगवधानामुळे मोठा अनर्थ टळला.

आगीच्या घटनेची माहिती मिळताच माहूर तहसीलदार डॉ.राजकुमार राठोड यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन नुकसानीची पाहणी करून मुरली - टाकळी सज्जाचे तलाठी गावंडे यांना त्वरित नुकसानीचा पंचनामा करण्याचे आदेश दिले. आपत्तीग्रस्तांना शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून उचित नुकसान भरपाई मिळवून देण्याचे आश्वासन देऊन त्यांचे मनोधैर्य वाढवत सांत्वन केले.

तालुक्यातील टाकळी येथील जिल्हा परिषद शाळेजवळ राहणारे ६० वर्षीय श्रीराम किसन शेंद्रे हे दुसऱ्याची शेती बटाईने कसत आपल्या संसाराचा गाडा हाकत पत्नी व चार मुले अशा सहा जणांचा कुटुंबाचा उदरनिर्वाह करतित. त्यांच्या घराला शनिवार दिनांक १४ डिसेंबर रोजी रात्री साडेबाराच्या सुमारास आकस्मिकपणे भिषण आग लागून घरातील संसारोपयोगी साहित्यासह, शेतातील वेचणी करून घरात साठवून ठेवलेला १० क्विंटल कापूस, घरातील १ लाख रुपये रोख रक्कम, लाकडी शेती साहित्य ,लाकुडफाटा, कपडे, लाकडी दिवान, अन्नधान्य आगीत जळून खाक झाले.तर



गोठ्यातील ६ बकऱ्या व त्यांचे ४ पिल्ले,१० कोंबड्या हे पशुधन देखील आगीच्या भक्ष्यस्थानी सापडल्याने होरपळून मृत्यूमुखी पडली. या दूर्दैवी घटनेत श्रीराम शेंद्रे यांचे जवळपास अडीच लाख रुपयांचे नुकसान झाले.

तर लागलेल्या ह्या आगीने श्रीराम शेंद्रे यांचे घराशेजारी राहणाऱ्या लक्ष्मण शामराव शेंद्रे यांच्या घराला देखील आपले भक्ष्यस्थानी केल्याने त्यांच्या गोठ्यात ठेवलेले स्प्रिंकलर सेटचे प्लॅस्टिकचे ३० पाईप जळून खाक झाले तर बांधून असलेल्या बैलजोडी पैकी एक बैल भाजल्याने जबर जखमी झाला.यात लक्ष्मण यांचे जवळपास ३० हजारांचे नुकसान झाले आहे.ही भयंकर घटना शेजारच्या काही जागरुक लोकांच्या निदर्शनास आल्याने त्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत प्रसांगवधान दाखवल्यामुळे घरात झोपलेल्या दोघां महिलांना त्यांनी सुखरूपपणे जळत्या घरातून बाहेर काढल्याने मोठा अनर्थ टळला. राज्यात नुकत्याच संपलेल्या विधानसभा निवडणुकीच्या गरमागरम चर्चेचा पारा अद्यापही जरी चढलेलाच असला तरी वातावरणातील उष्णतेचा पारा मात्र कमालीचा खाली घसरला असल्याने प्रचंड हुडहुडी भरवणाऱ्या कडाक्याच्या थंडीपासून उब मिळवण्यासाठी प्रामुख्याने ग्रामीण भागात घराघरात,चौकात शेकोट्या पेटवलेल्या असल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे.टाकळी येथील आगीच्या दूर्दैवी घटनेत देखील अंगावर शहारे आणणाऱ्या कडाक्याच्या थंडीपासून बचाव करण्यासाठी सदरील घरच्या लोकांनी घटनेच्या रात्री शेकटी पेटवली होती व नंतर ती झोपण्यापूर्वी विझविली देखील होती.परंतु, कदाचित ती अर्धवट विझल्याने वाऱ्यामुळे तीचा पुन्हा भडका होऊन त्याची ठिणगी श्रीराम शेंद्रे यांच्या टिन पत्रे व गवत ताटवे असलेल्या घरावर उडून सदरील आगीची घटना घडली असावी अशी शक्यता घटनास्थळी उपस्थित गावकऱ्यांनी व्यक्त केली असून, याकामी पंचनामा करणारे तलाठी गावंडे यांनीदेखील या शक्यतेला दुजोरा दिला.

आगीच्या भक्ष्यस्थानी सापडल्याने दोन घरे व त्यातील संसारोपयोगी साहित्य, रोख रक्कम, कापूस जळून खाक झाले तर पशुधनाचेही मोठे नुकसान झाले. पिडित श्रीराम शेंद्रे व लक्ष्मण शेंद्रे या दोन्ही भावांच्या कुटुंबाला आमदार भीमराव केराम यांच्यामार्फत शासनाकडून उचित नुकसान भरपाई मिळवून देणार.

# कयाधूवर ४ कोटी १३ लाखांच्या बंधाऱ्याचे भूमीपूजन

## आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या पाठपुराव्याला यश



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ डिसेंबर.**
हिंगोली आणि कळमनुरी तालुक्यातून वाहणाऱ्या कयाधू नदीवर हिंगोली विधानसभा मतदारसंघात आतापर्यंत ५ बंधारे बांधण्यात आले असून याचा लाभ त्या परिसरातील शेतकऱ्यांना होत आहे. दि १४ डिसेंबर रोजी हिंगोली शहरातून वाहणाऱ्या कयाधू नदीवर भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या पाठपुराव्यामुळे सहाव्या बंधाऱ्याचे भूमीपूजन करण्यात आले. या बंधाऱ्याला तब्बल ४ कोटी १३ लाखांचा निधी खर्च होणार असल्याची माहीती भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी दिली.

शहरातील कयाधू नदीवर बंधाऱ्याचे भूमीपूजन शनिवारी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांचेहस्ते करण्यात आले. यावेळी आ. संतोष बांगर, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, सुभाष बांगर, गणेश बांगर, भाजपचे सरचिटणीस उमेश नागरे, राजु कऱ्हाळे, निखील बांगर, राज बांगर आदीची उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना आ. तान्हाजीराव मुटकुळे म्हणाले की, मागील काळात कयाधू नदीवर पाच बंधारे बांधण्यात आले आहेत. त्यामुळे त्या भागात आता पाणी अडवल्यामुळे विहीर, बोअरची पाणीपातळी वाढली आहे. तसेच त्या भागातील शेतकऱ्यांना सिंचनाचा फायदा होत आहे. त्यांच्या पिकांना पाणी मिळत आहे. यासाठी शासनाकडे सतत पाठपुरावा केला. हिंगोली शहरातील कयाधू नदीवरही बंधारा बांधण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार आज या बंधाऱ्याचे कामाचे भूमीपूजन करण्यात आले असून शहरातील सांडपाणीचे शुध्दीकरण करून बंधारा भरून रहावा तसेच येथील नागरिकांना पाणी मिळावे यासाठी या बंधाऱ्याचे काम करण्यात येणार आहे. पावसाळ्यापूर्वी या बंधाऱ्याचे काम पूर्ण होणार आहे.

यावेळी आ. संतोष बांगर यांनी कयाधू नदीवर हिंगोलीनंतर पुढे सात बंधारे मंजूर असून त्याचे काम लवकरच होणार आहे. या बंधाऱ्यांचा फायाद परिसरातील शेतकरी व नागरिकांनाही होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेनंतर महिलांना जमिनीवर झोपवले

## आखाडा बाळापूर ग्रामीण रूग्णालयातील प्रकार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ डिसेंबर**
आखाडा बाळापूर येथील ग्रामीण रूग्णालयात ४३ महिलांना कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेनंतर कॉट नसल्यामुळे जमिनीवर गाद्या टाकून झोपण्याची व्यवस्था करण्यात आली. कडाक्याची थंडीत महिलांना जमिनीवर झोपवल्यामुळे रूग्णालय प्रशासनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून या प्रकारानंतर विरोधकांनी सरकारवर जोरदार टीका सुरू केली आहे. यावेळी महिलांच्या नातेवाईकांनीही तीव्र संताप व्यक्त केला.

कळमनुरी तालुक्यातील आखाडा बाळापूर ग्रामीण रूग्णालयात ३० बेड उपलब्ध आहेत या ठिकाणी १० बेड प्रसुतीसाठी आलेल्या महिलांसाठी तर १० बेड शस्त्रक्रियेसाठी आलेल्या रूग्णांसाठी राखील ठेवले जात असून उर्वरित १० बेडवर जनरल रूग्णांसाठी ठेवले जातात. आखाडा बाळापूर येथील ग्रामीण रूग्णालयात परिसरातील ५० पेक्षा अधिक गावातील रूग्ण उपचारासाठी येतात.

दरम्यान, कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेचे मार्च अखेरचे उद्दीष्ट पूर्ण करण्यासाठी सध्या आरोग्य विभागाची धावपळ सुरू झाली आहे. त्यासाठी रूग्णालयातील सुविधांचा विचार न करता शस्त्रक्रिया करण्यावरच भर दिला जात असल्याचे चित्र आहे. त्यातच ३० बेडचे रूग्णालय असलेल्या येथील ग्रामीण रूग्णालयात ४३ महिला बिनटाका कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेसाठी गुरूवार दि १२ डिसेंबर रोजी दाखल करून घेण्यातआले होते. त्यानंतर शुक्रवार दि १३ डिसेंबर रोजी हिंगोली येथील तज्ज्ञ डाक्टरांकडून या महिलांवर शस्त्रक्रिया करण्यात आली. मात्र शस्त्रक्रियेनंतर एक दिवस महिलांना थांबविण्यात आले. रूग्णालयात शस्त्रक्रिया झालेल्या महिलांना झोपण्यासाठी कॉटची पुरेशी व्यवस्था नव्हती. या महिलांना चक्क जमिनीवर गाद्या टाकून झोपविण्यात आले. सध्या परिसरात कडाक्याची थंडी पडली असून या थंडीत शस्त्रक्रिया झालेल्या महिला चांगल्याच गारठून गेल्या. या प्रकारामुळे नातेवाईकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. रूग्णालयात पुरेशी सुविधा नसतांनाही मोठ्या संख्येने शस्त्रक्रिया का केल्या असा सवाल उपस्थित केल्या जात आहे.

यासंदर्भात ग्रामीण रूग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ सचिन जाधव म्हणाले की, आखाडा बाळापूरचे ग्रामीण रूग्णालय मुळातच ३० बेडचे आहे. त्यातच २० बेड राखीव ठेवावी लागतात. बिनटाका शस्त्रक्रिया झालेल्या महिलांना झोपण्यासाठी गाद्या, पांघरण्यासाठी ब्लँकेट देण्यात आले आहे. तर त्यांना शनिवार दि १४ डिसेंबर रोजी सुट्टीही देण्यात आली आहे. त्यांची योग्य व्यवस्था केल्याचा अभिप्राय देखील नातेवाईकांनी दिला असल्याचे डॉ जाधव यांनी सांगितले.

उबाठा शिवसेनचे खा नागेश पाटील आष्टीकर यांनी प्रतिक्रिया देतांना म्हटले की, शस्त्रक्रियेनंतर महिलांना जमिनीवर झोपवले जात असेल तर ही अतिशय धक्कादायक व लाजिरवाणी बाब आहे. या प्रकरणात दोषीवर कारवाई केली जाईल.

# ईव्हीएम मशीनवरच निवडणुका घेण्याची शिरडशहापूर ग्रामपंचायतीची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ डिसेंबर**
राज्यासह देशभरात आगामी निवडणुका ईव्हीएम मशीनवरच घेण्यात याव्यात असा महत्वपूर्ण ठराव औंढा तालुक्यातील शिरडशहापूर येथील ग्रामस्थांनी दि १३ डिसेंबर रोजी घेतला आहे. या ठरावाची माहीती निवडणुक विभागासह राज्य शासनाला कळविली जाणार असल्याचे मिलींद यंबल यांनी सांगितले.



औंढा नागनाथ तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत असलेल्या शिरडशहापूर येथील ग्रामस्थांची दि १३ डिसेंबर रोजी मासिक सभा पार पडली. या गावाची लोकसंख्या १० हजारापेक्षा जास्त आहे. यावेळी सरपंच यशवंत रावले यांच्या अध्यक्षतेखाली मासिक बैठक घेण्यात आली. यावेळी उपसरपंच संभाजी जोगदंड, सदस्य पुष्पा स्वामी, अनिता तांबिले, दीक्षा सुर्यतळ, सय्यद नाजेमा सय्यद मुजाहेद, मीना रावले, शिला बिचेवार, रोहीणी मुक्कीरवार, अरूणा बिचेवार आशा कटारे, मुक्ता लांडगे, शेख इब्राहीम अली, शेख गुलामनबी, जयराम सुर्यतळ, शिवराज कोंडे यांची उपस्थिती होती.

यावेळी शिरडशहापूर गावांतर्गत विविध विकास कामे तसेच निधी खर्चाबाबत चर्चा करण्यात आली. गावात आवश्यक त्या ठिकाणी तातडीने रस्ते, पथदिवे, सांडपाणी व्यवस्थापनासोबतच इतर विकास कामे करण्यातबाबत चर्चा करण्यात आली.

दरम्यान, राज्यभरात ईव्हीएम मशीनवर शंका उपस्थित केली जात असून अनेक ठिकाणी बॅलेट पेपरवर मतदान घेण्याची मागणी केली जात आहे. त्यामुळे ईव्हीएम मशीन की बॅलेट पेपर यावरून राजकीय वातावरण चांगलेच तापलेले आहे. याबाबत शिरडशहापूर येथील बैठकीत सररंच यशवंत रावले यांनी लोकसभा व विधानसभा निवडणुकाप्रमाणे यापुढे सर्व निवडणुका ईव्हीएम मतदान यंत्रावरच घ्याव्यात असा मुद्दा मांडला. यावर सर्व सदस्यांनी पाठींबा दिला. सदर ठराव बहुमताने पारीत करण्यात आला.



**हिंगोली- शहरातील कयाधू नदीच्या पूलावरील रस्ता अत्यंत अरूंद तसेच रस्त्यावर जागोजागी खड्डे पडल्यामुळे या ठिकाणी नेहमीच वाहतुकीची कोंडी होत आहे. परभणी, सेनगाव तसेच औंढा या भागातून मोठ्या संख्येने अवजड वाहनांसह इतर वाहने येत असतात. हा पूल धोकादायक बनला असून तत्काळ पूलाचे काम करण्यात यावे अशी मागणीन नागरिकांमधून होत आहे. छाया- विजय गुंडेकर**

# संक्षिप्त वृत्त

### सोमवारी महिला लोकशाही दिनाचे आयोजन

हिंगोली- राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला समान हक्क व समान संधी असा मूलभूत हक्क दिलेला आहे. त्याअंतर्गत समस्याग्रस्त व पीडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे. तसेच त्यांच्या तक्रारी, अडचणी यांची शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून जिल्हास्तरावर जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन राबविण्यात येतो. माहे डिसेंबर, २०२४ च्या महिला लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार, (दि.१६) रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले आहे. समस्याग्रस्त व पीडित महिलांनी त्यांच्या अडचणी मांडण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, कक्ष क्र. एस-७, हिंगोली यांच्या कार्यालयात सादर करावेत. यामध्ये न्याय प्रविष्ठ प्रकरणे, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले, सेवा, आस्थापनाविषयक बाबी, तक्रार निवेदन वैयक्तिक स्वरुपाची नसेल असे अर्ज स्विकारले जाणार नाहीत. समस्याग्रस्त व पीडित महिलांनी शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या व्यासपीठाचा उपयोग आपल्या अडचणी सोडविण्यासाठी करावा, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, हिंगोली यांनी केले आहे.

### अस्ताव्यस्त पार्किंगमुळे वाहतुकीची कोंडी



हिंगोली- शहरातील मुख्य बाजारपेठेतील गांधी चौक, जवाहर रोडख, इंदिरा गांधी चौक, डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, पोस्ट ऑफीस रोड, अकोला रोड या भागात दुकानांसमोर अस्ताव्यस्तपणे वाहनांची पार्किंग केली जात आहे. त्यामुळे वाहतुकीची कोंडी होत असल्याचे दिसत आहे. शहरातील गांधी चौक, महावीर चौक, जवाहर रोड या भागातील रस्त्यांचे रूंदीकरण करण्यात आले. जागोजागी सिमेंटचे रस्ते बनविण्यात आले. त्यामुळे वाहतुकीची कोंडी कमी होईल असे वाटत होते परंतु या भागातील दुकानांसमोर मोठ्या प्रमाणावर दुचाकी, चारचाकी दोन्ही बाजूनी अस्ताव्यस्तपणे लावण्यात येत असल्यामुळे वाहतुकीला अडथळे निर्माण होत आहेत. एकीकडे पोलिस प्रशासन दुचाकी वाहन चालकांवर कार्यवाही करीत शिस्त लावीत आहे मात्र दुसरीकडे शहरातील वाहतुकीला शिस्त लावण्यात तसेच नो पार्किंगमध्ये वाहने उभी करणाऱ्या विरोधात पाऊल उचलतांना दिसत नाहीत.

# राष्ट्रमाता जिजाऊ विद्यानिकेतनमध्ये पालक मेळाव्याला प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ डिसेंबर**
राष्ट्रमाता जिजाऊ विद्यानिकेतन येथे पालक मेळावा संपन्न ॲड. ग्यानबाराव शिरसाट सेवाभावी संस्थेद्वारा संचालित राष्ट्रमाता जिजाऊ विद्यानिकेतन हिल टॉप कॉलनी हिंगोली येथे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या दुसऱ्या पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते या पालक मेळावा प्रसंगी संस्थेचे संचालक सुधाकर मेटकर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी उपस्थित होते. तसेच शाळेचे मुख्याध्यापक एस के डोलारे तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून सुधाकर बल्लाळ हे उपस्थित होते तसेच पालक प्रतिनिधी म्हणून श्रीमती पाईकराव व पालक प्रतिनिधी म्हणून हातागळे तसेच पालक प्रतिनिधी म्हणून शिवराज तर कसे सरहे उपस्थित होते. कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढ व सर्वांगीण विकासासाठी याबाबत संस्थेचे संचालक सुधाकर मेटकर यांनी मार्गदर्शन केले तसेच पालक प्रतिनिधींनी देखील आपलं मत व्यक्त केलं. याप्रसंगी शाळेचा सर्व स्टाफ उपस्थित होते सो ठोके मॅडम श्री कानेड, सौ पाईकराव, कुमारी पूजा, विद्या कानेड, कांचन टेकाळे, सो वाबळे, पडघन, पोले, सौ नरवाडे शेख इमरान इत्यादींनी कार्यक्रमासाठी सहकार्य केले.



# आर्थिक साक्षरतेबाबत पथनाट्याद्वारे ग्रामीण भागात जनजागृती

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ डिसेंबर**
धान कलंजियम फौंडेशन आणि अक्सिस बँक लिमिटेड व समुदाय आर्थिक साक्षरता केंद्र, हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने आर्थिक साक्षरता आणि बँकेच्या सेवा विषयी माहिती सांगणारे पथनाट्य हिंगोली तालुक्यातील पांगरी, इंचा,खांबाला, काळकोंडी, कलगाव आणि अंधारवाडी गावांमध्ये सादर करण्यात आले.

सदरील पटनाट्य मध्ये आर्थिक नियोजन आणि अंदाजपत्रक, बचत आणि गुंतवणूक, विमा पंतप्रधान जीवन ज्योती विमा,पंतप्रधान सुरक्षा विमा तसेच अटल पेन्शन योजना, पीक विमा,आणि जनावरांचा, कर्ज आणि परतफेड, डिजिटल बँकिंग, ग्राहक संरक्षण आणि शिक्षण विषयी पथनाट्याच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. पथनाट्य आणि जनजागृतीमध्ये गावांतील कामगार,पुरुष आणि युवक याचा खूप मोठया प्रमाणात प्रतिसाद मिळाला.

आर्थिक साक्षरता जनजागृती करतांना आपल्या कुटुंबाचे आर्थिक नियोजन कसे करायचे आणि आपल्या कुटुंबाला लागणारे पैशाचे अंदाजपत्रक तयार करतांना कुटुंबाचे मासिक खर्च किती आहे आणि मासिक उत्पन्न किती होत आहे त्यानुसार आर्थिक नियोजन करणे. तसेच महिन्याची उत्पन्नातुन किमान २५ टक्के बचत केली पाहिजे, बचत नेहमी भारतीय रिजर्व बँक यांच्या नोंदणीकृत संस्थे मध्येच केली पाहिजे आदी बाबत जनजागृती करण्यात आली. सध्या सगळीकडे डिजिटल बँकिंग चा जमाना आला आहे,त्यामुळे सर्वांनी डिजिटल होणे आवश्यक आहे. त्यासाठी ऑनलाइन च्या माध्यमातून आपण बाहेर गावी शिक्षण घेत असलेल्या मुलांना पैसे पाठवू शकतो, लाईट बिल भरू शकतो,घर उपयोगी वस्तू खरेदी करू शकतो, तसेच आपल्या गावातील किराणा दुकान,भाजीपाला खरेदी करून ऑनलाईन पैसे पाठवू शकतो. तसेच डिजीटल व्यवहार करतांना सतर्कतोविषयी माहीती दिली. मुख्य कार्यकारी अधिकारी उमा राणी, कदरेशन, राज्य समन्वयक नागराज यांच्या मार्गदर्शनाखाली विभागीय अधिकारी अनिल दवणे, रितेश वाढवे, साहेबराव बाजड, सीमा मुदिराज, रेखाताई वाघमारे, ललिता रनबावळे, संगीता जाधव, सीमा लोणकर, रंजना पवार, अशोक कपाटे यांची उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गावातील सरपंच, प्रतिष्ठित नागरिक, ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

# आजच्या स्त्रीने इतिहासातील स्त्रियांचा वारसा पुढे चालवावा-प्रा डॉ स्मिता शिंदे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ डिसेंबर**
मराठा कालखंडातील व आधुनिक व महाराष्ट्रात व भारतातील स्त्रिया या सामर्थ्यशाली असून त्यांना विविध क्षेत्रात नैपुण्य असल्याचे इतिहासातील उदाहरणे दिले. हिंदवी स्वराज्याची स्थापना करण्यात माँ जिजाऊ यांची प्रेरणा हे प्रमुख ऊर्जा स्त्रोत होते. आजच्या आधुनिक जगाप्रमाणे मराठा कालखंडातील इतिहासात स्त्रिया शारीरिक व्यायाम, क्रीडा, धर्मकारण, राजकारण, युद्ध कला या विविध क्षेत्रात स्त्रियांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे. हा आदर्श आजच्या स्त्रीने घेऊन प्रत्येक क्षेत्रात उंच भरारी घ्यावी. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर ह्या धर्मभावना जपणाऱ्या , रणरागिणी, स्त्रियांना उद्योजक होण्याची प्रेरणा देणारं उत्तुंग व्यक्तिमत्व तसेच परिस्थिती कितीही कठीण असली तरी त्यातून मार्ग काढणारी रणरागिणी होती. समाजाच्या उन्नतीत स्त्रियांनी महत्त्वाची भूमिका बजावी असे मार्गदर्शन केले. स्त्रीने चूल व मूल या पुरते मर्यादित न राहता आपल्या स्वकर्तृत्वाने विविध क्षेत्रात आपला ठसा उमटवावा असे मनोगत व व्याख्यान डॉ. स्मिता शिंदे देऊन अभ्यासपूर्ण विवेचन केले.



येथील श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठान आयोजित राष्ट्रीय लोकनेते गोपीनाथराव मुंडे व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प सुप्रसिद्ध व्याख्यात्या प्रा. डॉ. स्मिता शिंदे इतिहास विभाग प्रमुख छत्रपती संभाजीनगर, यांनी महाराष्ट्राच्या इतिहासातील स्त्रियांचे योगदान या विषयावर शिवाजीराव सभागृह येथे पुष्प गुंफिले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ. प्राचार्य काजल मेहता, उद्घाटक सेवासदनच्या संचालिका सौ मीरा कदम, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. विद्यारणी बांगर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक शालिनी नाईक, सुप्रसिद्ध व्याख्यात्या प्रा. डॉ. स्मिता शिंदे, भारती, श्रोतेमंडळी उपस्थित होते.

उद्घाटक सामाजिक कार्यकर्त्या मीरा कदम यांनी आईची भूमिका ही समाजाच्या उन्नतीत नितांत गरजेचे असून स्त्रियांनी सामाजिक व कामात हिरीरीने भाग घ्यावा असे मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य काजल मेहता यांनी बालवयात स्त्रियांची भूमिका अतिशय महत्त्वाची असून संस्काराचे मूल्य रुजविण्याचे व आपल्या आचरणातून पाल्यांना शिस्त लावण्याची जबाबदारी असल्याचे प्रतिपादन केले. समाजाला प्रेरणा मिळावी यासाठी समाजातील विविध पदांवर कार्यरत अधिकारी व खेळाडू यांचा मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला यामध्ये राष्ट्रीय कबड्डी खेळाडू भावना सतीश खाडे ,सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन साधना कराड, किरण सांगळे ,डॉ. प्रा.संगीता मुंडे, प्राचार्य डॉ नंदकुमार राठी, सुशांत गंगावणे यांचे आई वडील यांचा मान्यवरांच्या हस्ते गुणगौरव करण्यात आला.

लोकनेते गोपीनाथराव मुंडे व्याख्यानमालेतील दुसरे पुष्प महिलांच्या सन्मानार्थ सामाजिक कामातील सहभागी प्रेरणे घेण्यासाठी राखीव ठेवण्यात आलेले होते या क्रमाचे सूत्रसंचालन सौ छाया गुठे प्रास्ताविक सौ सिंधू कुटे पाहुण्यांचा परिचय ॲड सुवर्णा वाघ आभार प्रदर्शन सौ.सारिका चाटे यांनी केले.व्याख्यानमाला यशस्वी करण्यासाठी श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी व ग्रामीण व शहरी भागातील श्रोते मंडळी परिश्रम करीत आहे.

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# एक मिसळ अशीही : महाराष्ट्राच्या लोककलांची चटकदार मेजवानी



छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी : मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला, या बातमीला हैदराबादेतील साहित्यप्रेमींनी मानवंदना तर द्यायलाच हवी. कशी द्यावी बरं? मराठी भाषा ही फक्त पुस्तकात वाचतो तशी फक्त तेवढीच प्रमाणित भाषा नाही, तर महाराष्ट्रातील वेगवेगळ्या ठिकाणी, वेगवेगळ्या स्थानिक कलावंतांनी त्यात सुरेख गोडवा आणला आणि म्हणूनच ती एक अशी नाही; तर अनेक प्रादेशिक भाषांची सरमिसळ आहे. फक्त भाषाच नाही, तर असे कितीतरी लोककला प्रकार सुद्धा आहेत ज्यांना उजाळा देऊ शकतो, हाच विचार घेऊन साहित्य कट्टा साहित्यरंग, हैदराबाद यांनी एक साहित्यिक मेजवानीचा बेत आखला. या साहित्यिक मेजवानीला मराठी साहित्य परिषद, तेलंगणचा भरभक्कम असा पाठिंबाही मिळाला.

प्रवीण कावडकर यांनी मिसळची रेसिपी लिहायला सुरवात केली. महाराष्ट्राच्या लोककला आणि स्थानिक भाषा यांचे सुरेख मिश्रण म्हणजे 'एक मिसळ अशीही', ही पाककृती तयार होऊ लागली आणि तयार झाला कार्यक्रम 'एक मिसळ अशीही'. मराठी साहित्य परिषद, तेलंगण आयोजित 'एक मिसळ अशीही' चा प्रयोग ८ डिसेंबर २०२४ रोजी तेलंगणा साहित्य परिषद, हैदराबाद येथे ठरला आणि प्रयोगाच्या १ आठवडा आधी हा प्रयोग हाउसफुल्ल झाला.

## सरस्वती वंदनेने सुरुवात

'एक मिसळ अशीही' या मिसळीची सुरुवात अर्चना अचलेकर यांच्या मधूर सरस्वती वंदनेने झाली. अनुराधा राव यांनी सांगितले की, मराठी साहित्य परिषद, हैदराबाद दरवर्षी डॉ. द. दि.पुंडे यांच्या आईच्या स्मरणार्थ वाचक पुरस्कार देते, जेणेकरून वाचन संस्कृतीला प्रोत्साहन दिले जाऊ शकेल. यावर्षी हे पुरस्कार श्रीकांत आठवले, श्रीकृष्ण चिकाटे, मेघा देशपांडे आणि पुष्कर कुलकर्णी यांना देण्यात आले. अरुण डवलेकर यांनी या कार्यक्रमासाठी डॉ. द. दि.पुंडे यांनी दिलेल्या शुभेच्छा संदेशाचे वाचन केले. त्यानंतर, संस्थेच्या अध्यक्षा डॉ. विद्या देवधर यांनी या चार विजेत्यांना वाचक पुरस्कार प्रदान केले.

## नांदीने शानदार सुरुवात

आता मात्र जमलेले रसिक प्रेक्षक 'मिसळी'चा आस्वाद घ्यायला अगदी उतावीळ झाले होते. उज्वला धर्म यांनी त्यांच्या मृदू आवाजात 'मिसळी' साठी लागणारे प्रास्ताविक केले आणि यांनतर एक-एक पदार्थ मिसळीमध्ये समाविष्ट होऊ लागले. सगळ्यात आधी प्लेटमध्ये आली ती मस्त सात्विक बटाट्याची भाजी. मिसळीची सुरुवात व्यंकटेश कुलकर्णी यांनी लिहिलेल्या आणि संदीप केळकर यांनी स्वरबद्ध केलेल्या नांदीने झाली. ही नांदी संदीप केळकर, वैशाली केळकर, सुप्रिया आगाशे आणि संगीता तांबे यांनी सादर केली. नांदीने कार्यक्रमाला शानदार सुरुवात झाली.

## फुलला हास्याचा मळा

आता 'मिसळी' ला हवं असलेलं रंगरूप द्यायला कार्यक्रमाचे सूत्रसंचालक अवधूत कुलकर्णी आणि त्याला थोडासा तिखटपणा द्यायला त्याची सोबतीण म्हणून अभिलाषा कुलकर्णी (उर्फ हृदयेश्वरी) यांनी मिसळीची सूत्र त्यांच्या हातात घेतली. त्यांच्या खमंग संवादांतून रंगभूमीत हास्याचा मळा फुलू लागला. मिसळीवर यांनतर बतावणीची खमंग उसळ चढली ती मंजिरी जवळेकर, अदिती पांगारकर यांनी प्रवीण कावडकर लिखित आणि पुष्कर कुलकर्णी दिग्दर्शित एका हास्यप्रद बतावणीचे सादरीकरण केले. बतावणीची लिमिट म्हणजे स्वित्झर्लंडमध्ये समिंदर, काश्मीरमध्ये वाळवंट, साडीची लांबी चंद्रापर्यंत!! बतावणीतील पुरुषांची मक्तेदारी, मंजिरी व आदिती यांनी मोडीत काढली.




## लावणीचाही तडका

आता या मिसळीमध्ये चटकदार कट तर आलाच पाहिजे आणि हाच तडका घेऊन आल्या उत्कर्षा खडके आणि शीतल पाटील. ऋत्विक फाटक यांनी लिहिलेली लावणी 'नको सपाट रस्ता, झाडीवाला बरा', शीतल पाटील आणि उत्कर्षा खडके यांनी शानदार पद्धतीने सादर केली. त्यामुळे रंगभूमीत शिट्या व टाळ्यांचा खच पडला. ही लावणी मयुरा दातार यांनी गायिली. तिचे संगीत नियोजन मयुरा दातार आणि मंदार फाटक यांनी केले. या लावणीचे नृत्य दिग्दर्शन उत्कर्षा खडके यांनी केले होते.

## खुसखुशीत संवाद

यांनतर 'कार्पोरेट डेट' या लघु नाटिकेचे फरसाण या मिसळीत विराजमान झाले. प्रवीण कावडकर यांनी लिहिलेली आणि नितीन बसरूर यांनी निर्देशित केलेली लघु नाटिका 'कॉर्पोरेट डेट' मयुरा फाटक आणि ऋत्विक फाटक यांनी सादर केली. आजकाल लग्न ठरवताना तरुण-तरुणींचे काय विषय असतात, हे या नाटिकेतून मयुरा व ऋत्विक यांनी खुसखुशीत संवादाव्दारे मांडले. या फरसाणामुळे प्रेक्षकांच्या चेहऱ्यावर प्रसन्न हास्य उमटले.

## भारूडही रंगले

अशी तयार झालेली मिसळ लोकांनी खावी कशी आणि ती आत्मसात करावी कशी, याचे प्रबोधन करण्याचे काम केले प्रकाश धर्म यांनी. प्रकाश धर्म यांनी लिहिलेल्या, संगीतबद्ध आणि निर्देशित केलेल्या भारूडाने दर्शकांना हास्य, स्वराची मधुरता आणि भक्तीचे अद्भूत मिश्रण दिले. मेघना चाफळकर, कीर्ति जोशी-देशपांडे, शुभांगी कुलकर्णी, रश्मी नेमीवंत, पुष्कर कुलकर्णी, दिलीप सलगरकर, प्रकाश फडणीस आणि प्रकाश धर्म यांनी या प्रस्तुतीत भाग घेतला. त्यांनी एकत्र 'पाण्यावर निसरड भारी' गाणे शानदार पद्धतीने सादर केले. साउंडट्रॅक मूलत: मुक्त धर्म यांनी तयार केला होता.

## झगडा नवरा-बायकोचा

या सगळ्या मिसळीत नवरा-बायकोचं लुटुपुटीच भांडण, तिचं रुसणं आणि त्यानं तिचा रुसवा काढणं, हे सुद्धा झक्कास सादर झाले. सुमित पांडे आणि प्रीति पांडे यांनी प्रवीण कावडकर यांनी लिहिलेल्या आणि नितीन बसरूर यांनी निर्देशित केलेला 'रुसवा' फक्कडपणे सादर केला. यात एक पती त्याच्या नाराज पत्नीला कसे मनवतो, हे दाखविण्यात आले. 'भांडण मांडू पुन्हा पुन्हा' हे प्रकाश धर्म यांनी लिहिलेल्या गाण्यावर सुमित आणि प्रीति पांडे यांनी अतिशय आकर्षक असे नृत्य सादर केले.प्रेक्षकांनी वन्स मोर देऊन त्याचा पुन्हा आस्वाद घेतला.

## देवीचा गोंधळ

या मिसळीवर पुढचा रस चढला तो भक्तिरसाचा. 'देवीचा गोंधळ'चा. याचे लेखन, संगीत आणि गायन अवधूत कुलकर्णी यांनी केले. संदीप केळकर, वैशाली केळकर आणि अभिलाषा कुलकर्णी यांनी त्यांना गायनसाथ दिली. नृत्य दिग्दर्शन होते अदिती खांडेकर आणि सादर केले अदिती खांडेकर, सुमना वासीरेड्डी, अश्विनी राव यांनी. ही प्रस्तुती इतकी प्रभावशाली होती की, दर्शकांनी जोरदार टाळ्यांनी त्यांचे स्वागत केले. ही गोंधळाची प्रस्तुती पाहून प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले.

## कुरकुरीत कॉमेडी

मिसळीबरोबर कुरकुरीत पापड तर हवाच! हाच कुरकुरीतपणा घेऊन आले प्रवीण कावडकर व रश्मी नेमीवंत. स्टँड-अप कॉमेडीमध्ये प्रवीण कावडकर, रश्मी नेमीवंत आणि कविता वारके यांनी भाग घेतला. विशेषत: त्यांच्या ऑनलाइन बेबी शॉवरच्या संकल्पनेने दर्शकांना खूप हसवले. उपस्थित मुलांनी या क्टप्रति दिलेल्या प्रतिक्रिया खूप सुखद आणि आश्चर्यकारक होत्या, ज्यामुळे हसणारांची संख्या वाढली. ही कॉमेडी प्रवीण कावडकर यांनी लिहिली होती आणि नितीन बसरूर यांनी निर्देशित केली होती.

## पोवाड्याचे मर्दानी सादरीकरण

कार्यक्रमाचा समारोप शिवाजी महाराजांवर आधारित 'पोवाड्याने' झाला. पोवाड्याचे लेखन आणि संगीतबद्ध केले होते संगीता तांबे यांनी. पोवाडा साधारणपणे पुरुष शाहीर मंडळी लिहितात व सादर करतात. पण, संगीता तांबे यांनी तितक्याच ताकदवार शब्दात पोवाडा लिहिला व तितक्याच वीरश्रीयुक्त आवेशात, सुप्रिया आगाशे, मंजिरी जवळेकर, आदिती पांगारकर व प्रिती पांडे यांच्या सहभागाने सादर केला. ही या कार्यक्रमाची आणखी एक विशेषता म्हणावी लागेल. प्रकाश व्यवस्था आणि संगीत संयोजन नितीन बसरूर यांनी केले. पटकथा लेखन प्रवीण कावडकर यांनी केले होते.

## बॅकस्टेजही उल्लेखनीय

कार्यक्रमाच्या यशामध्ये बॅकस्टेज टीमचे महत्वपूर्ण योगदान होते. यात शुभदा नितीन, कविता वारके, मृणाल राव, श्रुती काकडे, अस्मिता काळे, सूरज मेश्राम, अरुण डवलेकर, पुष्कर कुलकर्णी, उज्ज्वला धर्म आणि तृप्ती आगाशे यांचा समावेश होता. मंचावर आणि मंचाच्या मागे काम करणाऱ्या एकूण ३८ कलाकारांना डॉ. विद्या देवधर यांनी सन्मानित केले. कार्यक्रम जोरदार टाळ्यांनी आणि दर्शकांच्या उत्साही घोषणाबाजीसह 'जय भवानी, जय शिवाजी' च्या जयघोषात समाप्त झाला.

*** ऑन दि स्पॉट रिपोर्ट / अरुण डवलेकर, अभिलाषा कुलकर्णी

## १.२ दिवसांत ९९.०४टक्के दावे निकाली काढले

छत्रपती संभाजीनगर -आयसीआयसीआय प्रुडेंशियल लाइफ इन्शुरन्सने जुलै २०२४ ते सप्टेंबर २०२४ या कालावधीसाठी ९९.०४टक्के क्लेम सेटलमेंट रेशो घोषित केला आहे, जो उद्योगातील सर्वोच्च आहे. विशेष म्हणजे, मृत्यूचा दावा निकाली काढण्याचा सरासरी कालावधी केवळ १.२ दिवस होता.श्री. अमीश बँकर, चीफ ऑपरेशन्स ऑफिसर, आयसीआयसीआय प्रुडेंशियल लाइफ इन्शुरन्स म्हणाले, दावा हा सत्याचा अंतिम क्षण असतो आणि आम्ही प्रत्येक दावा अत्यंत संवेदनशीलतेने हाताळतो.

## पॉवरफुल ग्रुपच्या इन्व्हेस्टर कॉन्फरन्स '२४ मध्ये प्रख्यात तज्ज्ञांनी आर्थिक विकासावर चर्चा केली

मुंबई : शनिवारपासून सुरू झालेल्या पॉवरफुल ग्रुपच्या गुंतवणूकदार परिषदेत उद्योग, गुंतवणूक आणि ग्रामीण विकास क्षेत्रातील दिग्गजांनी सहभाग घेतला. अधिवक्ता मनस्वी थापर (राजकीय विचारवंत आणि मालिका उद्योजक), अमित पारीख (एमएसएमई आणि स्टार्टअप फोरम इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष), आणि लिपी खंधार यांच्यासह अनेक प्रतिष्ठित व्यक्तींच्या उपस्थितीत परिषदेचे उद्घाटन झाले.त्यांच्या उद्घाटन भाषणात, स्टेप२स्टेपअप इंक. आणि वसुंधरा पवार, संस्थापक, पॉवरफुल ग्रुप, यांनी कॉन्क्लेव्हचे व्हिजन स्पष्ट करताना सांगितले की, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याद्वारे प्रभावी गुंतवणुकीला तसेच शाश्वत आर्थिक वाढीस प्रोत्साहन देण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देणे हे यामागचे उद्दिष्ट आहे. पवार म्हणाले, गुंतवणूकदार परिषद' २४ चे उद्दिष्ट भारतातील उद्योजकतेचे भविष्य घडवणे हा आहे. देशातील महिला उद्योजकांना बळकट करण्यापासून ते ग्रामीण विकास प्रकल्पांना पुढे नेण्यापर्यंत, ही परिषद संधी निर्माण करण्यासाठी आणि भारतीय अर्थव्यवस्थेत शाश्वत वाढ करण्यासाठी वचनबद्ध आहे. संस्थेचे उद्दिष्ट अधोरेखित करताना, पॉवरफुल ग्रुपचे सह-संस्थापक कुणाल देवमाने म्हणाले की, आम्हाला जगभरातील अशा प्रकारच्या पहिल्या-गुंतवणुकीवर आधारित, वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध, पद्धतीद्वारे ५०००० रोजगाराच्या संधी निर्माण करायच्या आहेत.

## एसबीआय फाऊंडेशनतर्फे निवडक महिलांना सहाय्य निधी

छत्रपती संभाजीनगर - 'उमेद अभियान व एसबीआय फाऊंडेशन'मुळे स्त्रियांच्या स्वप्नांना मिळणार बळ. महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण भागातील महिलांना त्यांच्या हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्याच्या उद्देशाने पहिल्यांदाच 'उमेद अभियान' अंतर्गत महिला स्वयंसहायता समुहातील महिला उद्योजकांसाठी येतोय नवा कोरा टी व्ही शो 'घे भरारी- मला पंख मिळाले' दिनांक १३ डिसेंबर २०२४, संध्या. ४.१५ वा टीव्ही ९ या लोकप्रिय चॅनेलवर. स्त्रियांचं आयुष्य म्हंटल तर संसार, चूल, मूल यांसारख्या असंख्य गोष्टी सांभाळण्यात जातं पण सध्याच्या बदलत्या काळात स्त्री संसार सांभाळून स्वतःच्या पायावर खंबीर उभं राहिलेली पाहायला मिळत आहे. ही अगदीच कौतुकाची बाब आहे पण तरीही स्त्रीला प्रोत्सहन, योग्य मार्गदर्शन मिळणं तितकंच महत्त्वाचं आहे यासाठी 'उमेद अभियान' स्वप्न पाहणाऱ्या प्रत्येक स्त्रीसाठी घेऊन येत आहे 'घे भरारी- मला पंख मिळाले' हा नवा कोरा कार्यक्रम. अनेकदा महिलांना स्वतःच्या पायावर उभं राहण्यासाठी प्रोत्सहन दिलं जातं पण 'उमेद अभियान' अंतर्गत 'घे भरारी- मला पंख मिळाले' या कर्यक्रमातून तब्बल ७० लाख महिलांना प्रेरणा मिळणार आहे.

## पहिले सीपीआर ॲप रिवाइव्ह सीपीआर ॲप लाँच केले

मुंबई - भारतात दरवर्षी, सडन कार्डिक अरेस्ट मुळे १५ लाखांहून अधिक लोक आपला जीव गमावतात आणि अलीकडच्या काळात सडन कार्डिक अरेस्टमुळे अनेकांना जीव गमवावा लागला आहे. सीपीआर द्वारे वेळेवर हस्तक्षेप केल्यास जीवन आणि मृत्यू यातील फरक होऊ शकतो. भारतातील पहिले सीपीआर-केंद्रित मोबाईल ऍप्लिकेशन, रिवाइव्ह सीपीआर ऍप लाँच करून आज आपत्कालीन आरोग्य सेवेमध्ये एक अभूतपूर्व पाऊल उचलण्यात आले. हा कार्यक्रम प्रतिष्ठित जिओ कन्व्हेन्शन सेंटर, वांद्रे (ई), मुंबई येथे झाला.१४५ कोटी भारतीयांसाठी शारीरिक प्रशिक्षण हे कठीण काम आहे अशा जगात, रिवाइव्ह सीपीआर प तुमच्या हाताच्या तळहातावर जीवन वाचवणारी कौशल्ये आणते. हे प्रत्येकासाठी डिझाइन केलेले आहे - प्रवेश करण्यायोग्य, अंतर्ज्ञानी आणि चांगल्या समॅरिटन कायद्याशी सरेखित, जे तुम्ही एखाद्याचा जीव वाचवण्यासाठी पाऊल टाकल्यास तुमचे संरक्षण करते.

### अतिक्रमणे स्वतःहून काढून घेण्याच्या सक्त सूचना

## शहरातील अतिक्रमणधारकांना महानगरपालिकेचा दोन दिवसांचा अल्टीमेटम

### आयुक्त ॲक्शन मोडवर; सोमवारपासून अतिक्रमण हटाव मोहीम

अहिल्यानगर - महानगरपालिकेने शहरातील अतिक्रमणांवर सुरू केलेली कारवाई आणखी तीव्र करण्यात येणार आहे. आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी कठोर भूमिका घेत अतिक्रमणधारकांना दोन दिवसांचा अल्टिमेटम देत अतिक्रमणे स्वतः हून काढून घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. सोमवारपासून शहराच्या सर्व भागात पोलिस बंदोबस्तात अतिक्रमण हटाव मोहीम तीव्र करण्यात येणार असल्याचे आयुक्त डांगे यांनी स्पष्ट केले आहे.

दिल्लीगेट ते चौपाटी कारंजा ते चितळे रोड, नेता सुभाष चौक, कापड बाजार, मोची गल्ली, बालिकाश्रम रोड, उपनगरातील एकविरा चौक प्रोफेसर चौक, भिस्ताबग चौक, सक्कर चौक, मार्केट यार्ड परिसर, बोल्हेगाव, केडगाव, लिंक रोड, अंबिका नगर बस स्टॉप, कोठला स्टँड परिसर, झेंडीगेट, मुकुंदनगर, अकबर नगर या परिसरात मोठ्या प्रमाणात रस्त्यावर अतिक्रमणे झाल्याचे आयुक्तांनी केलेल्या पाहणीत आढळून आले. तसेच, जिल्हा रुग्णालय समोरील गवळीवाडा येथे जनावरे रस्त्यावर सोडली जातात व रस्त्यावर बांधली जात असल्याचे दिसून आले आहे.

आयुक्त यशवंत डांगे यांनी अतिक्रमण निर्मूलन विभाग व प्रभाग अधिकाऱ्यांची बैठक घेऊन सोमवारपासून पोलिस बंदोबस्तात अतिक्रमण हटाव मोहीम सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. ज्यांची अतिक्रमणे आहेत, त्यांनी ती दोन दिवसात काढून घ्यावीत, अन्यथा महानगरपालिका कठोर कारवाई करेल, असा इशारा आयुक्त यशवंत डांगे यांनी दिला आहे. अहिल्यानगर शहर अतिक्रमण मुक्त करून शहराची नवी ओळख निर्माण करण्याचा महानगरपालिकेचा मानस असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

## उड्डाणपुलावरील अपघातासाठी संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करा

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे मागणी

नगर : शहरातील उड्डाणपुलावर वारंवार होणारे अपघात व जीवित हानी टाळण्यासाठी उपाययोजना करणेबाबत जिल्हा प्रशासनाला वारंवार लेखी निवेदन देण्यात आले होते. तरी देखील १२ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी उड्डाणपुलावरील त्याच अपघाती वळणावर एक उसाचा ट्रक पलटी झाला. ट्रकमधील ऊस उड्डाणपुलावरून खाली पडला. सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही. मात्र ट्रकचालकाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले. यावरून जिल्हा प्रशासनाला दिलेल्या पत्रांकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे या सर्व प्रकाराची आपण गांभीर्याने दखल घेऊन भविष्यात होणारे अपघात व जीवित हानी टाळण्यासाठी उड्डाणपुलावर काल झालेल्या अपघातासाठी जिल्हा प्रशासनातील संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून त्यांचेवर यथोचित कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी अभय ललवाणी यांनी केंद्रीय सडक परिवहन मंत्री ना. नितीन गडकरी यांच्याकडे ई-मेलद्वारे केली आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, रस्ते अपघात टाळण्यासाठी शासन विविध उपायोजना करते. त्यासाठी विविध कायदे केले जातात. रहदारीचे नियम तोडणाऱ्या वाहन चालकांना अत्याधुनिक प्रणाली वापरून इ चलनाद्वारे तात्काळ दंड आकारण्यात येतो व वसूल करण्यात येतो. परंतु प्रत्येक वेळी अपघातांसाठी फक्त वाहन चालकांना जबाबदार धरणे योग्य नाही. अनेकदा प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे व कर्तव्य पालनातील कसुरीमुळे देखील अपघात होत असल्याचे काल झालेल्या उड्डाणपुलावरील अपघातावरून स्पष्ट झाले आहे. प्रशासनाला दिलेल्या निवेदनांची गांभीर्याने दखल घेतली गेली असती तर कदाचित कालचा अपघात टाळला असता असेही ना. गडकरी यांना पाठविलेल्या निवेदनात म्हटले आहे. निवेदनाच्या प्रती केंद्र शासनाचे सडक परिवहन व राजमार्ग मंत्रालयाचे सचिव तसेच राज्याच्या गृह विभागाचे अपर मुख्य सचिव यांना देखील पाठविण्यात आलेल्या आहेत.

## 'तेनाली रामा' परतत आहे सोनी सबवर

सोनी सबवरील प्रसिद्ध मालिका 'तेनाली रामा' १६ डिसेंबर रोजी रात्री ८ वाजता दणक्यात पुनरागमन करत यह. नव्या गोष्टी आणि तेनालीच्या पुढे असलेली नवीन आव्हाने सादर करणारी ही मालिका तेनालीचे बुद्धीचातुर्य, त्याची विनोदबुद्धी यांचे दर्शन घडवणारी वेधक कथानके घेऊन येत आहे. कृष्ण भारद्वाज पुन्हा एकदा तेनाली रामाच्या भूमिकेत दिसणार आहे, तर पंकज बेरी सुद्धा पुन्हा तथाचार्य ही भूमिका साकारणार आहे. यावेळी मालिकेत कृष्णदेवराय राजाच्या भूमिकेत आदित्य रेडीज आणि गिरगिट राज या खलनायकाच्या भूमिकेत सुमित कौल हे नवीन कलाकार दिसणार आहेत.

## श्रेया पटेल आणि त्रिशान झळकणार सोनी सबवरील '

'तेनाली रामा' ही मालिका, तेनालीच्या बुद्धीचातुर्याच्या नवीन गोष्टी घेऊन १६ डिसेंबरपासून सोनी सबवर परतत आहे. तेनाली रामा हे पात्र आजही प्रेक्षकांना मोहित करते. त्याच्या जोडीला आणखी काही नवी पात्रे मालिकेत दाखल होत आहेत. पद्मावती, लच्छम्मा, बाल भद्र आणि वाचस्पती या चार लहान मुलांना तेनाली मार्गदर्शन देताना दिसणार आहे. सुपरिचित बाल कलाकार श्रेया पटेल आणि त्रिशान यांना अनुक्रमे पद्मावती आणि वाचस्पती यांच्या भूमिकेसाठी निवडण्यात आले आहे. ही दोन गुणी भावंडे आहेत. आपल्या माता-पित्यापासून अलग झाल्यावर अवघ्या तेराव्या वर्षी पद्मावती आपल्या धाकट्या भावाची आणि त्याच्या समूहाची जबाबदारी आपल्या अंगावर घेते. त्या सगळ्यांना एकजूट ठेवण्यासाठी तिची हुशारी, आत्मविश्वास आणि तडफदार स्वभाव कामी येतो.

## तालुक्यातील रोहित खरे यांची लेफ्टनंट कर्नलपदी बढती

तभा वृत्तसेवा



कन्नड :- दि.१४ डिसेंबर - तालुक्यातील भोकनगाव येथील रोहित खरे यांना सैन्यदलात तोफखाना विभागात लेफ्टनंट कर्नल पदी बढती मिळाली आहे. लेफ्टनंट कर्नल हे भारतीय सैन्यातील एक अत्यंत प्रतिष्ठेचे पद असून, या पदावर असलेल्या अधिकाऱ्याला मोहिमांचे नियोजन, रणनीती आखणे, आणि मोठ्या प्रमाणावर नेतृत्व करण्याची जबाबदारी असते,ग्रामिण भागातून आलेले रोहित खरे यांना सैन्यदलात बढती मिळाल्याची माहिती मिळताच गावकऱ्यांनी आनंद साजरा केला,कन्नड तालुक्याचे नाव संपूर्ण देशात सैन्य दलात उंचवण्याची कामगिरी त्यांनी केली आहे,या पदोन्नती बदल विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे,आमदार संजना जाधव, यांनी अभिनंदन केले.

## सोनालिकाकडून किसान प्रदर्शनामध्ये; ३ नवीन प्रगत तंत्रज्ञान ट्रॅक्टर्स लाँच

### सोनालिका चीता डीआय ३२, सोनालिका टायगर डीआय २६ आणि सोनालिका टायगर डीआय ६५ सीआरडीएस ४डब्ल्यूडी

पुणे : भारतातील पहिल्या क्रमांकाचा ट्रॅक्टर निर्यात ब्रँड सोनालिका ट्रॅक्टर्सने महाराष्ट्रातील पुणे येथील किसान कृषी प्रदर्शन २०२४ मध्ये दृढ उपस्थिती दाखवली आहे, जेथे कंपनीने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी सानुकूल केलेले सर्वात नाविन्यपूर्ण आणि हेवी ड्युटी ट्रॅक्टर्स दाखवले आहेत. कंपनीने ३ नवीन हेवी ड्युटी ट्रॅक्टर्स सादर केले आहेत - सोनालिका टायगर डीआय २६, सोनालिका चीता डीआय ३२ आणि सोनालिका टायगर डीआय ६५ सीआरडीएस ४डब्ल्यूडी, जे महाराष्ट्रातील खडतर जमिनीमध्ये अपवदात्मक कार्यक्षमता देण्यासाठी सानुकूल करण्यात आले आहेत. या भव्य



लाँचला पूरक सोनालिकाने प्रभावी लाइन-अपमधील ५ आणखी नाविन्यपूर्ण ट्रॅक्टर्सना देखील दाखवले आहे, जसे सोनालिका चीता एनटी३०४डब्ल्यूडी, अपग्रेडेड सोनालिका सिकंदर डीआय ७५० ३ डीएलएक्स ४डब्ल्यूडी, सोनालिका टायगर डीआय ३० ४डब्ल्यूडी, सोनालिका सिकंदर डीआय ६० डीएलएक्स ४डब्ल्यूडी आणि सोनालिका सिकंदर डीआय ६० डीएलएक्स टॉर्क प्लस ४डब्ल्यूडी, तसेच महाराष्ट्र स्पेशल मॉडेल - सोनालिका सिकंदर डीआय ७४५ ३ डीएलएक्स ४डब्ल्यूडी.

या इव्हेण्टचे खास आकर्षण ठरले सोनालिका चीता डीआय ३२ चे लाँच, ज्यामध्ये हेवी ड्युटी ३ सिलिंडर २,७८० सीसी इंजिन, ८एफ+२आर ट्रान्समिशन, उच्च दर्जाचे ऑईल इमर्स डिस्क ब्रेक आणि पॉवर स्टिअरिंग, जे विविध कृषी कामासाठी प्रबळ कार्यक्षमता देतात. 'डिझाइन इन युरोप' टायगर सिरीजअंतर्गत सोनालिकाने कॉम्पॅक्ट पॉवरहाऊस ट्रॅक्टर टायगर डीआय २६ दाखवला आहे, ज्यामध्ये ३ सिलिंडर १(३१८ सीसी इंजिन, विनासायास १२एफ+४आर ट्रान्समिशन आणि ३ फूट अरूंद ट्रॅक आहे, जे या ट्रॅक्टरला ऊस शेतीसाठी योग्य निवड बनवतात. स्टॉलमध्ये दाखवण्यात आलेल्या प्रीमियम सोनालिका टायगर डीआय ६५ सीआरडीएस ४डब्ल्यूडीमध्ये ४ सिलिंडर ४,७१२ सीसी इंजिन स्मूद १२एफ+१२आर मल्टीस्पीड ट्रान्समिशन, प्रगत ५जी हायड्रॉलिक्स आहे, ज्यामुळे हा ट्रॅक्टर महाराष्ट्रातील खडतर जमिनीमधील उच्च-स्तरीय कृषी कामांसाठी खरा गेम चेंजर आहे.

या विशेष प्रसंगी आपले मत व्यक्त करत सोनालिका ट्रॅक्टर्सच्या विक्री व विपणन विभागाचे अध्यक्ष व प्रमुख श्री. विवेक गोयल म्हणाले, ''महाराष्ट्र विभिन्न जमिन प्रकारांसह अद्वितीय बाजारपेठ आहे आणि किसान कृषी प्रदर्शन २०२४ लँडमार्क इव्हेण्ट ठरला आहे, ज्याने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना प्रत्येक कृषी गरजेची पूर्तता करणारे ट्रॅक्टर्स उपलब्ध करून दिले आहेत. आम्ही या प्रदर्शनामध्ये आमचे सर्वात प्रगत ट्रॅक्टर्स लाँच केले आहेत - सोनालिका टायगर डीआय २६, सोनालिका चीता डीआय ३२ आणि सोनालिका टायगर डीआय ६५ सीआरडीएस ४डब्ल्यूडी ट्रॅक्टर. हा प्रत्येक ट्रॅक्टर कृषी सोल्यूशन बेंचमार्क्सना नव्या उंचीवर घेऊन जाण्यासाठी आणि शेतकऱ्यांना अधिक यश व उत्पादकता प्राप्त करण्यास सक्षम करण्यासाठी सानुकूल करण्यात आला आहे. प्रदर्शनामध्ये शेतकऱ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद आम्हाला स्तर उंचावत राहण्यास आणि शेतकऱ्यांना त्यांच्या शेतांमध्ये समृद्धता आणण्यास मदत करणारे हेवी-ड्युटी सोल्यूशन्स वितरित करण्यास प्रेरित करतो.''

## अग्रलेख...

# सावधान, रात्र वैऱ्याची आहे...

भारत देश आपल्या शेजारी देशांच्या तुलनेत खूप सुखी, समृद्ध आणि प्रगतिशील आहे. त्यामुळे अस्वस्थ, अस्थिर आणि अविकसित अशा शेजारी देशांना नेहमीच भारताचा हेवा वाटत असतो. शेजारी देशांमध्ये पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, मालदीव आणि अन्य देशांचा समावेश आहे. मात्र यापैकी एकाही देशातील वातावरण सुरळीत आणि सौहार्दाचे नाही. आपल्या बहुतांश शेजारी देशांची आंतरिक सुरक्षा धोक्यात आली आहे, विघटनवादी शक्तींनी या साऱ्या देशांना ग्रासले आहे. तेथील सरकारेही अस्थिर आहेत. अर्थव्यवस्थेच्या आघाडीवरही आनंदीआनंद आहे. त्या तुलनेत आपण आपल्या देशाचा विचार केला तर आपला देश खूपच सुखी आणि समृद्ध आहे. आपल्या अंतर्गत सुरक्षेला कोणताही धोका नाही, विघटनवादी शक्ती अधूनमधून डोके वर काढण्याचा प्रयत्न करत असतात, पण त्यात त्यांना अपेक्षित यश येत नाही. आपली अर्थव्यवस्थाही सुदृढ आहे. आपल्या देशातील सरकारही शेजारी देशांच्या तुलनेत राजकीयदृष्ट्या स्थिर आहे. याचे कारण आपल्या देशाला लाभलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे दूरदृष्टीचे आणि विकासाभिमुख नेतृत्व. यामुळेच शेजारी देश आपल्यावर नेहमीच जळत असतात, दातओठ खाऊन असतात. 'उसकी कमीज मेरे कमीज से सफेद क्यो', असा त्यांना वाटत असते. यामुळेच आपल्या देशात अस्थिरता आणि अराजक निर्माण करण्याचा प्रयत्न गेल्या काही वर्षांपासून सातत्याने सुरू आहे. याआधी देशविरोधी शक्तींनी आधी पंजाब आणि जम्मू-काश्मीरला हाताशी धरले. १९९० च्या दशकात पंजाबमध्ये दहशतवादाने थैमान घातले होते. या दहशतवादाची झळ पंजाबमधील क्रीडा, आर्थिक, धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक आणि पत्रकारिता क्षेत्राला बसली होती. पंजाबमधील एकही क्षेत्र यातून सुटले नव्हते. यामुळे फक्त पंजाबचीच नाही तर संपूर्ण देशाची अपरिमित अशी हानी झाली. पंजाब विकासाच्या बाबतीत अनेक वर्ष मागे फेकला गेला. पंजाबमध्ये अनेक राजकीय नेत्यांची, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांची दहशतवाद्यांनी हत्या केली. देशाबाहेरील विघटनवादी शक्तीचा पंजाबमधील दहशतवादी कारवायांना पाठिंबा होता. पंजाबमधील तरुणांची या विघटनवादी शक्तींनी दिशाभूल केली, त्यांचे माथे भडकवण्याचा प्रयत्न केला. त्यांना देशाच्या मुख्य राष्ट्रीय प्रवाहातून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. पंजाबमधील त्यावेळची परिस्थिती हाताबाहेर गेली होती. याची परिणती ऑपरेशन ब्ल्यू स्टारमध्ये झाली होती, सुवर्ण मंदिरात लष्कर घुसवावे लागले होते. याची किंमत भारताचे तत्कालीन लष्करप्रमुख जनरल अरुण वैद्य यांना आपल्या निवृत्तीनंतर चुकवावी लागली होती. दहतवाद्यांनी पुण्यात त्यांची हत्या केली. एवढेच नाही तर ऑपरेशन ब्ल्यू स्टारची किंमत तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांना पदावर असताना चुकवावी लागली. सुरक्षारक्षक माथेफिरू लष्करी जवानांनी गोळ्या झाडून त्यांची हत्या केली. यानंतर देशभर शीखविरोधी दंगली झाल्या. हजारो शिखांचे शिरकाण करण्यात आले. खूप लवकर म्हणता येणार नसले तरी कालांतराने पंजाबमधील दहशतवादाच्या या राक्षसाचे निर्दालन करण्यात आपल्याला यश आले.

पंजाब पूर्ववत् झाला, मात्र जम्मू-काश्मीरमधील विघटनवादी कारवाया कधी थांबल्याच नाही. त्या कालही सुरू होत्या, आजही सुरू आहेत. कदाचित उद्याही सुरूच राहतील. त्याची तीव्रता कमी-जास्त होत गेली. आज जम्मू-काश्मीरमधील घातपाती आणि विघटनवादी कारवायांचे प्रमाण कमी झाले असले तरी पूर्णपणे संपलेले नाही. याला जम्मू-काश्मीरची भौगालिक रचना आणि आपल्या देशातील आतापर्यंत होऊन गेलेले काँग्रेसी शासनकाळातील बुळे आणि कुचकामी नेतृत्व जबाबदार म्हणायला हरकत नाही. देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी जम्मू-काश्मीरला ३७० कलमाची जी भेट आणि देणगी दिली, त्यामुळे जम्मू-काश्मीर कधी मनापासून स्वत:ला भारताचा भाग समजतच नव्हता. जम्मू-काश्मीरला आतापर्यंत मिळालेल्या भारतद्वेषी आणि पाकधार्जिण्या नेतृत्वामुळेच फक्त जम्मू-काश्मीरचेच नाही तर देशाचेही कधीही भरून न निघणारे नुकसान झाले. जम्मू-काश्मीरमधील राजकीय नेतृत्वाचे वर्णन गळ्यात मंगळसूत्र एकाच्या नावाने घालायचे आणि फिरायचे दुसऱ्यासोबत, असे केले तरी ते चूक ठरणार नाही. जम्मू-काश्मीरमधील रोगाचे निदान देशातील आतापर्यंत एकाही पंतप्रधानाला करता आले नाही. वा दुसऱ्या शब्दात सांगायचे तर त्याने या रोगाचे निदान जाणीवपूर्वक केलेच नाही. कारण रोगाचे निदान बरोबर केले तर पुढील उपचार करावे लागतात. जी करण्याची आपल्या देशातील राजकीय नेतृत्वाची हिंमत नव्हती. ती पहिल्यांदा दाखवली ती आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी. जम्मू-काश्मीरला अनेक वर्षांपासून भेडसावणाऱ्या राजकीय आजारावर मोदी यांनी जबरदस्त अशी शस्त्रक्रिया केली. जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे घटनेतील विशेष कलम ३५ ए आणि ३७० निष्प्रभ करण्याची हिंमत मोदी यांनी दाखवली. मोदी यांच्या या हिमतीचे तसेच राजकीय धडाडीचे करावे तेवढे कौतुक कमी आहे. जम्मू-काश्मीरला लाभलेला राजकीय अस्थिरतेचा शाप ३७० कलम निष्प्रभ झाल्यामुळे आपोआप संपुष्टात आला. मात्र यामुळे देशविघातक शक्तींचा प्रभाव कमी झाला असला तरी त्यांनी पूर्णपणे हार मानली नाही. भारताला अस्थिर करणाऱ्या ज्या शक्ती आहेत, त्यात प्रामुख्याने मुस्लिम संघटना जास्त आहेत, नव्हे त्याच सक्रिय आहेत. वेगवेगळ्या मार्गाने भारतात अस्थिरता निर्माण करण्याचे प्रयत्न या सर्व संघटनांनी थांबवले नाही. याचे प्रत्यंतर राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) नुकत्याच देशातील पाच राज्यांत घातलेल्या १९ ठिकाणाच्या छाप्यावरून दिसून आले. यात जैश-ए-मोहम्मदच्या समर्थकांना अटक करण्यात आली. विशेष म्हणजे यातून महाराष्ट्रही सुटला नाही. महाराष्ट्राची उपराजधानी नागपूरपासून अगदी जवळ असणाऱ्या अमरावती येथून पाकिस्तानशी संबंध असल्याच्या तरुणाला पोलिसांनी ताब्यात घेतले. एनआयएने ज्यांना ताब्यात घेतले, ते सर्व मुस्लिम आहेत. कोणताही धर्म कधीच कोणाला चुकीचे शिकवत नाही, हे खरे असले तर धर्माच्या आडून काही लोक एका धर्माविरुद्ध दुसऱ्या धर्माच्या लोकांना भडकवत असतात, ही वस्तुस्थिती आहे. गुन्हेगाराला जात आणि धर्म नसतो, हे वाक्य सुविचार म्हणून चांगले वाटत असले तरी विशिष्ट प्रकारच्या गुन्हेगारी कारवाया करणारे, विशेषत: दहशतवादी कारवायात गुंतलेले सर्व एकाच धर्माचे कसे असतात हे कोडे कधीच न उमगणारे नाही. यात संशयाची सुई मुस्लिम धर्मावरच का स्थिरावत असते. सर्व मुस्लिम अतिरेकी नसले तरी पडकलेले सर्व अतिरेकी हे मुस्लिमच असतात, याकडे कोणी दुर्लक्ष करू शकत नाही. एनआयएने आपल्या देशव्यापी छाप्यात पकडलेले लोक पाहिले तर याची खात्री पटते. त्यामुळेच हा अतिशय चिंतेचा विषय म्हटला पाहिजे. देशातील जी राज्ये सध्या शांत दिसतात, तेथील शांतता ही भविष्यातील धोका ठरणार नाही, याची काळजीही आपल्याला घ्यावी लागणार आहे. देशाला असलेला धोका आज वाढला आहे. कारण पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात देशाने सर्वच क्षेत्रांत केलेली नेत्रदीपक प्रगती डोळे दिपवणारी आहे. यामुळे या देशविघातक शक्तीचा मोदींच्या नेतृत्वावर तसेच त्यांच्या नेतृत्वातील चौफेर प्रगती करत असलेल्या देशावर राग असणे स्वाभाविक आहे. याची गांभीर्याने दखल घेतली पाहिजे. देशाच्या अनेक भागांत घातपाती कारवाया जाणीवपूर्वक घडवल्या जात आहे. मणिपूर दीड-दोन वर्षांपासून जळत आहे. कमी-जास्त असले तरी देशाच्या सर्व भागांत विघटनवादी शक्तींच्या अशा कारवाया सुरू आहेत. याचा वेळीच बीमोड करायला पाहिजे. देशाचा काही भाग शांत असला तरी तेथील शांतता ही वादळापूर्वीची शांतता ठरू नये. देशातील सुरक्षा यंत्रणा या आव्हानांचा सामना करण्यासाठी सज्ज आहे. ही समाधानाची बाब म्हणायला पाहिजे. मात्र रात्र वैऱ्याची आहे, याचा विसर आम्ही पडू देऊ नये. ▮

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# मुंबईचा किंग कोण?

मन तळ्यात, मळ्यात अशी अवस्था उद्धव ठाकरे यांची झाली आहे. लोकसभेत काही बऱ्या जागा मिळाल्यामुळे हवेत तरंगणाऱ्या उबाठा गटाला मराठी माणसाने विधानसभेत धूळ चारली. मुंबईतील मुसलमान मतदारांनी मात्र उद्धव ठाकरे यांचे बुडणारे जहाज सावरले. आता मुंबई पालिकेच्या निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर उबाठा गटामध्ये अस्वस्थता पसरू लागली आहे. उबाठा गटातील काही नेत्यांचे म्हणणे असे आहे की विधानसभेत आपला पराभव दोन कारणांमुळे झाला, एकतर लोकसभेत मिळालेल्या जागांमुळे वाढलेला फाजिल आत्मविश्वास आणि आघाडीतील पक्षांशी मैत्री. जर उबाठा गट आघाडीत सामील झाला नसता तर त्यांना चांगल्या जागा मिळाल्या असत्या, असं त्यांचे नेते मंडळी म्हणू लागली आहेत. मात्र संजय राऊत अजूनही आघाडी करण्याच्या मुद्द्यावर ठाम असून त्यांनी पराभवाचं खापर ईव्हीएमवर ढकललं आहे. शिवसेनेतून बेदखल झाल्यामुळे ठाकरेंना उबाठा गट स्थापन करावा लागला. आता त्यातही दोन मतप्रवाह निर्माण होत असल्यामुळे उद्धव ठाकरे भलतेच अडचणीत सापडले आहेत. खरं पाहता भाजपाशी युती तोडणं ही उद्धव ठाकरेंची मोठी चूक नव्हती. पण स्वतःला हिंदुत्वापासून दूर नेत आघाडीत सामील होणं ही ठाकरेंची घोडचूक होती. उद्धव ठाकरे भाजपापासून वेगळी चूल मांडून त्यांचं हिंदुत्व पुढे घेऊन जाऊ शकत होते. असं झालं असतं तर कदाचित एकनाथ शिंदे यांना बंड करण्याची संधी मिळाली नसती. पण उद्धव ठाकरेंनी हिंदुत्वाशी फारकत घेऊन एकनाथ शिंदे यांच्या बंडाला एक वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून दिलं, असं गमतीने म्हणावं लागेल.

विधानसभेत दारुण पराभव झाल्यानंतर आता ठाकरेंसमोर मुंबई पालिका निवडणूक जिंकण्याचं आव्हान आहे. पालिकेची निवडणूक जिंकणं हा ठाकरेंसाठी केवळ राजकीय मुद्दा नसून हा त्यांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न आहे. गेली सुमारे २५ वर्षे पालिकेवर सत्ता असलेल्या ठाकरे कुटुंबाला आता भीती वाटत आहे की जशी महाराष्ट्रातून आपली पीछेहाट झाली तशी मुंबईतलं आपलं नाव पुसून जाऊ शकतं. उबाठा गटाने कोकण पूर्णपणे गमावलं असून, उर्वरित महाराष्ट्रातील त्यांची ताकद संपुष्टात येत आहे. मुंबई हा एकमेव किल्ला आता त्यांच्याकडे शाबूत आहे. हा किल्ला त्यांना गमवायचा नाही. पण किल्ला पुन्हा मिळवताना त्यांची वैचारिक दमछाक होत आहे. ६ डिसेंबर २०२४ रोजी वादग्रस्त ढांचा पतनाच्या दिवशी उबाठा गटाने बाबरी पतनाचे समर्थन करणारे पोस्टर्स सोशल मीडियावर झळकवले होते. म्हणून समाजवादी पार्टीने आघाडीतून माघार घेतली. ठाकरे गट जर जुन्या मुद्द्याकडे वळणार असेल आणि आघाडीतले घटक पक्ष त्यांचे कान धरणार नसतील तर अशा आघाडीत का राहावे, असं म्हणत त्यांनी आघाडीतून काढता पाय घेतला आणि आपण मुस्लिमांचे तारणहार असल्याचे पुन्हा एकदा त्यांनी दाखवून दिलं. मुंबईतील दोन जागांपेक्षा उत्तर प्रदेशातील सत्ता त्यांना अधिक प्रिय आहे.



उद्धव ठाकरे जेव्हा मुख्यमंत्री झाले तेव्हा त्यांना केवळ चांगलेच नव्हे तर कोणतेच काम करता आले नाही. महाराष्ट्राच्या इतिहासात काम न करणारा, घरी बसून मुख्यमंत्री म्हणून त्यांची नकारात्मक ओळख निर्माण झाली. अर्थात ही ओळख विरोधकांनी केली नसून, त्यांनीच करून घेतली आहे. राजकीय वर्तुळात अशी चर्चा आहे की मुख्यमंत्री होण्यासाठी शरद पवारांनीच अट घातली होती की ठाकरेंनी कार्यालयात येऊ नये. खरे खोटे या दोघांनाच ठावूक. मात्र त्यांचं कर्तृत्वहीन व्यक्तिमत्त्व लपवण्यासाठी ठाकरे मुख्यमंत्री असताना दर तीन महिन्यांनी बेस्ट सीएम सर्व्हे केला जात होता आणि उद्धव ठाकरे हे भारतातील सर्वोत्तम मुख्यमंत्री असल्याचे घोषित केले जात होते. त्यांना असं वाटलं होतं की असले खोटे सर्व्हे करून महाराष्ट्राच्या जनतेला आपल्या बाजूने करता येईल. पण देवेंद्र फडणवीसांचं एक सुंदर वाक्य आहे. ते म्हणाले होते की विरोधक जातीवरून, कुटुंबावरून टीका करतात. पण त्याने काही फरक पडत नाही. उद्या जेव्हा महाराष्ट्रातील विकासकामांची यादी काढायला घेतली तर या कामांच्या मागे देवेंद्र फडणवीस म्हणून कुण्या माणसाचा हात होता हे अधोरेखित केले जाईल. खोट्या प्रचारापेक्षा काम बोलतं. आपलं नाणं खणखणीत असेल तर ते वाजतंच. चंदनाला कुठे जाहिरात करावी लागते? म्हणूनच ठाकरेंना आता मुंबईच्या जनतेसमोर कोणत्या तोंडाने आणि कोणते प्रश्न घेऊन जावे हा प्रश्न पडला आहे.

ठाकरे मुख्यमंत्री झाले तेव्हा एका लेखात मी उल्लेख केला होता की, भविष्यात उद्धव ठाकरेंवर मोठे भ्रष्टाचाराचे आरोप लागतील ज्याप्रमाणे मॅकबेथचं राजमुकुट त्यासाठी शाप ठरलं हीच परिस्थिती ठाकरेंवर येऊ शकते. आणि झालंही तसंच... ठाकरेंसाठी मुख्यमंत्री पदाची खुर्ची काटेरी ठरली. त्यांचं राजकीय करीअर धोक्यात आलं. म्हणून राजकारणात अति घाई करू नये. उद्धव ठाकरेंचे आजोबा प्रबोधनकार ठाकरे यांचं वाक्य ते विसरले. प्रबोधनकार म्हणायचे, एखाद्याला जर आपटायचं असेल तर आधी त्याला उचलावं लागतं. याचा विसर त्यांना पडला होता. मग आता मुंबईच्या जनतेसमोर कोणते मुद्दे मांडणार, हा सर्वांत मोठा प्रश्न आहे. म्हणूनच उबाठा गटात दोन गट पडले असून एका गटाला असं वाटतं आहे की बाळासाहेब ठाकरे यांचा वारसा उद्धव ठाकरेंनी पुढे न्यावा आणि हा वारसा पुढे न्यायचा असेल तर सर्वांत आधी काँग्रेस व शरद पवार गटासोबतची आघाडी, मैत्री तोडावी लागेल. पण उद्धव ठाकरेंचे सकाळचे लाऊड स्पीकर संजय राऊत स्वतःला महाविकास आघाडीचे जनक समजत असल्यामुळे त्यांना ही आघाडी हवी आहे. मग यातून मार्ग काढण्यासाठी ठाकरे मराठी माणूस आणि गुजराती व इतर परप्रांतीय असा मुद्दा पुन्हा उपस्थित करू शकतात. त्याचबरोबर हिंदुत्वाची फोडणी देण्यासाठी त्यांनी अयोध्येतील वादग्रस्त ढांचा पतनाला पुन्हा समर्थन दिलं आहे.

मुंबईत विविध भाषिक राहतात. तरीही मुंबईतला मराठी माणूस सुखी आहे. मुंबईत कोणावरच अन्याय होत नसून, ही कष्टकऱ्यांची नगरी मानली जाते. आता आधुनिक युगात स्मार्ट वर्क करणाऱ्यांना ही मुंबई नेहमीच यश देते. अशा परिस्थितीत 'मुंबई तोडण्याचा डाव, मुंबई मराठी माणसाची, परप्रांतीय' इत्यादी मुद्दे काम करणार नाहीत. त्याचबरोबर गमावलेले हिंदू मतदार उबाठाकडे इतक्या जलदगतीने परत येणार नाहीत. त्यासाठी त्यांना भाजपा व शिवसेनेपेक्षा मोठे हिंदुत्ववादी असल्याचे सिद्ध करावे लागेल. उद्धव ठाकरे मराठी लोकसंख्या अधिक असलेल्या विभागांवर लक्ष केंद्रित करतील. पण सर्वच मराठी जनता ठाकरेंना मतदान करते ही अंधश्रद्धा आहे. भाजपाला मतदान करणारे महाराष्ट्रद्रोही अशी प्रतिमा याच उबाठा गटाने निर्माण केली होती. आता मतदारांच्या या नकारात्मक प्रतिमेचा त्यांना विधानसभेत फटका बसला आहे. पालिकेच्या निवडणुकीतही हा फटका बसल्याशिवाय राहणार नाही. पण संजय राऊत एका वेगळ्याच फेजमध्ये वावरत असून ते उबाठा गटाला आणखी खोलात नेण्यासाठी सिद्ध झाले आहेत. आता पाहायचे आहे की वरील विश्लेषणानुसार त्यांचे जुने मुद्दे कामी येणार नाहीत, तर मन तळ्यात, मळ्यात अशी अवस्था असलेले उद्धव ठाकरे कोणते नवे मुद्दे आणि नवे डावपेच शोधून काढतील मुंबईकरांचं मन जिंकण्यासाठी, मुंबईचा किंग होण्यासाठी... ▮

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**नीलेश जोशी**

# समरसतेचा भाव दृढ व्हावा

संघटित हिंदू शक्तीचा हुंकार नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणूक निकालातून प्रकट झाला. जातीय तेढ निर्माण करणाऱ्यांना या निकालाने चोख उत्तर दिले. त्याचा आनंद वाटत असतानाच पुन्हा जातीय तेढ निर्माण होण्यासाठी कारणीभूत ठरणाऱ्या दोन घटना महाराष्ट्रात घडल्या. त्यातील एक घटना बीड जिल्ह्यातील तर दुसरी परभणी येथील आहे. सामाजिक स्वास्थ्य निकोप राहावे यासाठी धडपडणाऱ्या, सामाजिक समरसता हा समाजाचा स्वभाव व्हावा म्हणून प्रयत्न करणाऱ्या प्रत्येक संस्था, व्यक्तीचे मन विषण्ण करणाऱ्या या घटना आहेत. पण ज्या-ज्या वेळी हिंदू समाज संघटित होतो त्या-त्या वेळी नेमक्या अशा घटना का घडतात, हा निव्वळ योगायोग की षडयंत्र असा स्वाभाविक प्रश्न आता निर्माण झाला आहे.

परभणी येथे एका माथेफिरूने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यासमोर असलेल्या संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना केली. संविधानावर श्रद्धा असलेल्या प्रत्येकाचेच मन या घटनेने संतप्त झाले. संतप्त जनांची तत्काळ प्रतिक्रियाही उमटली. पोलिस प्रशासनाने देख?ील संविधानाच्या प्रतिकृतीचा अवमान करणाऱ्या माथेफिरूला लगेचच अटक केली. त्यानंतरही या घटनेमुळे प्रक्षुब्ध झालेल्या विविध संघटनांनी बंद पुकारला. अवघ्या परभणीत या बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद होता, असे असतानाही दुपारच्या सुमारास परभणी येथे तोडफोड, जाळपोळ करण्यात आली. हा विध्वंस करणारे नेमके कोण असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

दुसरी घटना बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात घडली. तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून खून करण्यात आला. त्यामुळे तेथील नागरिक चिडले. त्यांनी रास्ता रोको करीत न्यायाची मागणी केली. या दोनही घटना अत्यंत निंदनीय आहेत. या घटनांमध्ये जे दोषी असतील त्यांच्यावर कडक कारवाई शक्य तितक्या लवकर व्हावी यात कुणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. पण या घटनांआडून समाजात जातीय तणाव निर्माण करण्याचा कुणाचा प्रयत्न आहे का? याचाही सखोल आणि सूक्ष्म तपास करण्याची गरज आहे. खरं म्हणजे गत काही वर्षांत राज्यात जाती-जातीत संघर्ष, तेढ निर्माण व्हावा अशी षडयंत्रे रचली जात असल्याचे विविध घटनांवरून दिसून येते. हिंदू समाजात मराठा, ओबीसी, दलित असा भेद गडद व्हावा, संघटित हिंदू विभाजित व्हावा असे प्रयत्न केले जात आहेत. या प्रयत्नांमध्ये कथित पुरोगामी, स्वयंघोषित लिबरल, सर्वधर्मसमभावाचे पुरस्कर्ते म्हणवणाऱ्या राजकीय, सामाजिक कार्यकर्त्यांचा सहभाग असल्याचे दिसून येते. हिंदुत्व विचार असणारी शक्ती सत्तेत येऊ नये यासाठीच या साऱ्यांची धडपड सुरू होती. त्यांच्या कृतीमुळे महाराष्ट्रातील समाज जीवनावर किती विपरीत आणि दूरगामी परिणाम होऊ शकतात हे कळत असूनही केवळ द्वेषभावनेतून हे सारे प्रयत्न हेतुपुरस्सर केले गेल्याचे अनेकवेळा उघड झाले. कोरेगाव भीमा प्रकरणात न्यायालयाने नोंदविलेले निरीक्षण, या प्रकरणातून समोर आलेले अर्बन नक्षल नेटवर्क हे सर्वांच्याच स्मरणात असेल.

महाराष्ट्र नेहमीच देशाची वैचारिक आणि सांस्कृतिक भूमिका घट्ट करण्यात अग्रेसर राहिला आहे. छत्रपती शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यासह अनेकांनी देव, देश आणि धर्म हा विचार रुजविण्यासोबतच अठरा पगड जातींचे संघटन उभारून कृतीतून सामाजिक समसरतेचा भाव दृढ केला. या समरसतेच्या विचाराला नख लावल्याशिवाय आपली पोळी भाजता येणार नाही याची कल्पना असलेले अनेक जण आणि या राष्ट्राचा सर्वांगीण विकास होऊ नये, असे वाटणाऱ्या विदेशी शक्ती नेहमीच जातीय विद्वेष पसरविण्याचा प्रयत्न करतात. पण संघटित हिंदुत्वाच्या शक्तीने उभारलेले राममंदिर आणि याच शक्तीच्या आधारावर गत १० वर्षांपासून राष्ट्राच्या विकासासाठी धडपडणारे केंद्र शासन ही या विरोधी शक्तींना मिळालेली चपराक आहे. त्यातच लोकसभेला थोड्याशा यशाने हुरळून जाऊन व्होट जिहादसह जातीय विद्वेष पसरवून यश मिळेल असे वाटणाऱ्यांचे मनसुबे संघटित हिंदूंनी धुळीस मिळविले. कदाचित म्हणूनच पुन्हा जातीय तेढ निर्माण करणाऱ्या शक्ती काही षडयंत्र तर रचत नाही ना अशी शंका निर्माण व्हावी अशा घटना घडत आहेत. मात्र, समाजाने या शक्तींना उत्तर देण्यासाठी समरसता हा भाव अधिक दृढ करून हिंदुत्वाची, राष्ट्रीयत्वाची ज्योत प्रखर करण्याची गरज आहे. ▮

९४२२८६२४८४

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# खरंच लाज वाटली पाहिजे!

निकाल लागून कित्येक दिवस लोटले आणि अजूनही सरकार स्थापन केले जात नाही, सरकार स्थापन होऊन कित्येक दिवस लोटले आणि अजूनही मंत्रिमंडळाचा विस्तार नाही, गृहमंत्री नसल्याने राज्यातली कायदा व सुव्यवस्था बिघडली असल्याचा आरोप, शिल्लक सेनेचे अर्थात उबाठा गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आणि त्यांच्या पगारी नोकराने केले असून, जरा जरी लाज लज्जा शरम शिल्लक असेल तर, बांगलादेशातील हिंदूंवर सुरू असलेल्या अत्याचारावर सरकारने काय केले ते सांगावे, असे आव्हान देखील त्यांनी भाजपा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींना दिले आहे.

२०१९ मध्ये महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांचे निकाल २४ ऑक्टोबर २०१९ ला लागले होते. यावेळी भाजपाला १०५ आणि शिवसेनेला ५६ जागा मिळाल्या होत्या. त्यात १० अपक्षांचा पाठिंबाही होता. त्यामुळे सरकार स्थापन होण्यात कुठल्याही अडचणी नव्हत्या. पण तरीदेखील महाराष्ट्राचं सरकार २८ नोव्हेंबर २०१९ रोजी अस्तित्वात आलं. यावेळी मुख्यमंत्री म्हणून उद्धव ठाकरे यांनी शपथ घेतली आणि त्यांच्यासह एकनाथ शिंदे, सुभाष देसाई, जयंत पाटील, छगन भुजबळ, बाळासाहेब थोरात आणि नितीन राऊत या सहा लोकांनी मंत्रिपदाची शपथ घेतली होती. मात्र, मंत्रिपदाची शपथ घेतलेले सहा मंत्री हे तब्बल १५ दिवस बिनाखात्याचे मंत्री होते. ठाकरेंनी अडीच वर्षांत मंत्रालयात केवळ दोनवेळा जाण्याचा आणि घरी बसून सरकार चालविण्याचा जसा रेकॉर्ड केलाय, तसाच राज्याच्या राजकीय इतिहासात बिनखात्याचे मंत्री ठेवण्याचा बहुमानदेखील तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना प्राप्त आहे.

मंत्रिपदाची शपथ घेतल्याच्या १५ दिवसांनंतर अर्थात १३ डिसेंबर रोजी तत्कालीन मुख्यमंत्री सन्माननीय उद्धव ठाकरे साहेब यांनी आपल्या सहा मंत्र्यांना खाते वाटप केलं होतं. महत्त्वाची बाब म्हणजे ३० डिसेंबर रोजी मंत्रिमंडळाचा पहिला विस्तार करण्यात आला होता. २८ नोव्हेंबरला मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणाऱ्या उद्धव ठाकरेंनी ३० डिसेंबरला आपलं मंत्रिमंडळ बनवलं होतं. अर्थात तब्बल महिन्याभरानं सरकार स्थापन झालं आणि सरकार स्थापन होऊनही १५ दिवस राज्याला गृहमंत्री नव्हता आणि त्याच्या महिनाभरानंतर पूर्ण मंत्रिमंडळ स्थापित झाले होते. हे येथे आवर्जून अधोरेखित केलं पाहिजे. असे सगळे विश्वविक्रम यांच्याच नावाने असताना, उलट रेकॉर्ड होल्डरच इतरांच्या नावाने ''निकाल लागून पंधरवडा उलटला आणि अजूनही सरकार स्थापन केले जात नाही, सरकार स्थापन होऊन कित्येक दिवस लोटले, मुख्यमंत्री, दोन उपमुख्यमंत्र्यांनी शपथ घेऊन बराच काळ लोटला असूनही, मंत्रिमंडळाचा विस्तार नाही, गृहमंत्री नसल्याने राज्यातली कायदा व सुव्यवस्था बिघडली'' असल्याप्रकारचा थयथयाट करताना दिसत आहेत. हा प्रकार खरंच लाज विकल्याचं किंवा लाज, लज्जा, शरम उरली नसल्याचं द्योतक म्हणावे लागेल.

### आता आठवला हिंदू

केंद्र सरकार देशातल्या प्रश्नांबाबत गंभीर नाही असा आरोप करत, बांगलादेशात हिंदूवर हल्ले सुरू आहेत. त्यांच्यावर अत्याचार केले जात आहे. मंदिरं तोडली जात आहेत. इस्कॉन मंदिर जाळलं गेलं. मंदिराच्या प्रमुखांना अटक केली जात आहे. असा स्थितीत आपले विश्वगुरू हे अत्याचार का पाहात बसले आहेत, असा सवाल उबाठा गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना केला. पंतप्रधान बांगलादेशबाबत निर्णय का घेत नाही असा प्रश्नही त्यांनी या निमित्ताने उपस्थित केला. त्याचबरोबर केंद्राने बांगलादेशमध्ये हिंदूंवर होणाऱ्या अत्याचाराबाबत काय पावलं उचलली आहेत हे स्पष्ट करावे अशी मागणीदेखील उद्धव ठाकरे यांनी केली आहे. 'एक है तो सेफ है' पण इथं मंदिरच सेफ कुठे आहेत. त्यामुळे लाज लज्जा शरम शिल्लक असेल तर भाजपा आणि मोदींनी बांगलादेशबाबत बोलावं असे आव्हान ठाकरे यांनी दिलं आहे.

बरं वाटलं उद्धव ठाकरेंना हिंदूंची देखील काळजी वाटते हे ऐकून. कारण मागील काळात ठाकरे स्वतः मुख्यमंत्री असताना, पालघर येथे एका समूहाने पोलिसांच्या उपस्थितीत दोन साधू-संतांची हत्या केली. तेव्हा बांगलादेशातील हिंदूंचा कळवळा आलेल्या उद्धव ठाकरेंच्या चेहऱ्यावर जराही लवलेश दिसला नाही. त्यावेळी हेच उद्धव ठाकरे म्हणाले, हिंदू साधूंची हत्या चोर असल्याच्या गैरसमजातून झाली. अमरावतीत सर तन से जुदा म्हणत मेडिकल शॉप चालविणारे उमेश कोल्हेंची कट्टरपंथीयांनी गळा कापून निघृण हत्या केली. तेव्हा आमचे हिंदूचे कैवारी उद्धव साहेब राज्याचे मुख्यमंत्री होते. आणि हा प्रकार दरोडा टाकण्याच्या प्रयत्नात झाल्याचा बनाव करण्यासाठी अमरावतीच्या पोलिस आयुक्तांवर त्यांनी दबाव टाकला होता. कर्जतच्या प्रतीक पवारने नूपुर शर्मा यांची पोस्ट शेअर केली त्यामुळे शांतिदूतांनी प्रतीकवर हल्ला केला. तेव्हाही आपले उद्धवसाहेबच मुख्यमंत्री होते. अनंत करमुसेचं अपहरण करून उद्धव साहेबांच्या एका मंत्र्यानं बिहारप्रमाणे कृत्य करत बंगल्यावर आणून मारहाण केली, समाजमाध्यमांवरील पोस्ट शेअर केली म्हणून, निवृत्त नेव्ही ऑफिसरला बेदम मारहाण करत त्यांचा डोळा फोडणारे साहेबांचे कायकर्ते होते, उखाड दिया म्हणत कंगना राणावत यांचे उद्धव साहेबांच्या सरकारने विशेष आदेश देत घर पाडले, यांचे वसुलीचं पितळ उघडं पडू नये म्हणून मनसुख हिरेण यांची हत्या यांच्याच पोलिसांनी केली. हिरेण, कंगना, करमुसे, प्रतीक, उमेश आणि दोन साधू हे सगळे पीडित हिंदूच होते. आणि हा सगळा अत्याचार हिंदूंवर उद्धव साहेबांच्या नेतृत्वातील सरकारच्या काळात झाला. कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी ही राज्य सरकारची असते. त्या सरकारचे प्रमुख उद्धव साहेब स्वतः होते. ज्यांना आपल्या राज्यात हिंदूंना सुरक्षा देता आली नाही. जे आपल्या भाषणाची सुरुवात ''माझ्या तमाम हिंदू बांधवांनो आणि भगिनींनो आणि मातांनो'' अशा शब्दांनी करणारे उद्धव ठाकरे यांनी काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसच्या मांडीवर जाऊन बसल्यानंतर ''माझ्या तमाम देशभक्त, देशप्रेमी बंधँनो, भगिनींनो आणि मातांनो'' अशा शब्दाने सुरुवात करू लागले. आम्ही हिंदुत्व सोडलं नाही असं सातत्यानं सांगत दुसरीकडे स्वतःच्या वडिलांना सन्मानानं या महाराष्ट्राच्या जनतेनं दिलेली हिंदुहृदयसम्राट ही पदवी देखील त्यांच्या नावासमोर लावण्याची हिंमत काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसचा मंच सामायिक करताना करू शकत नसलेल्या उद्धव ठाकरेंना, बांगलादेशातील हिंदुत्वाचा अचानक कळवळा आल्याचा देखावा करणाऱ्या उद्धव ठाकरेंना स्वतः लाज, लज्जा, शरम वाटणे अपेक्षित आहे. आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे थेट पंतप्रधानांवर बोलण्याची लायकी किंवा औकात ठाकरेंची नाही, हे त्यांनी जाणून घेतलं पाहिजे. ▮

९२७०३३३८८६

### महाराष्ट्राचे समर्थ नेतृत्व

महाराष्ट्राच्या राजकारणात अलौकिक व्यक्तिमत्त्वाच्या यादीत आता देवेंद्र फडणवीस यांचे नाव सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. संकटांना न भिता सर्वसामान्य गोरगरीब जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी अहोरात्र प्रयत्नांची पराकाष्ठा करणारा, शून्यातून जग निर्माण करणाऱ्या व्यक्तीला महाराष्ट्र लक्षात ठेवतो अगदी कायमस्वरूपी आणि असे महाराष्ट्राला लाभलेले दुर्मिळ नेतृत्व म्हणजे देवेंद्र फडणवीस होय. अगदी राष्ट्रभक्तीने ओतप्रोत भरलेले व्यक्तिमत्त्व आहे. राम जन्मभूमी आंदोलनातला कारसेवक, काश्मीरमधील श्रीनगरच्या लाल चौकात पाकड्यांनी तिरंगा जाळल्याच्या घटनेने प्रक्षुब्ध होऊन काश्मीर आंदोलनात सहभागी होत लाल चौकात तिरंगा ध्वज फडकविण्याचा देशभक्तीचा अभिमानाचा साक्षीदार देवेंद्र फडणवीस होते. गेल्या दोन-तीन दशकापासून राजकीय क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. मुख्यमंत्री पदाचा मान मिळाल्यावर महाराष्ट्राच्या विकासाची दिशा समृद्धीच्या मार्गावर आणली. प्रगतीची महाराष्ट्र नवनिर्माणाची वाटचाल प्रारंभ झाली. छत्रपती शिवरायांच्या विचारावर निष्ठा ठेवून समृद्धी महामार्ग, अटल सेतू, कोस्टल रोड, मुंबई-पुणे-नागपुरातील मेट्रो प्रकल्प, जलयुक्त शिवार असे लोकाभिमुख प्रकल्प उभारण्याचे श्रेय केवळ फडणवीसांना जाते. उद्धव ठाकरे, शरद पवार आणि त्यांचे पक्ष अगदी टोकाच्या पातळीवर वैयक्तिक हल्ले करीत होते. जरांगे आणि इतर जातीवरून अगदी खालच्या पातळीवर टार्गेट करून फडणवीसांना घेरण्याचा प्रयत्न केला जात होते, विरोधकाला पुरून उरणारे अजिंक्य ठरले देवेंद्र. विरोधकांचे आव्हान, मोठी संकटे, संघर्षाचा सामना करून स्वराज्याच्या रक्षणासाठी कर्तृत्वसंपन्न व्यक्तिमत्त्वाच्या यादीत देवेंद्र फडणवीस यांचे नाव सुवर्ण अक्षराने नोंदविले गेले आहे.

**अमोल तपासे**/नागपूर

●● ●●

### निवडणूक आणि ईव्हीएम

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीचा खूप मोठ्या प्रमाणात विजय झाला आणि महाविकास आघाडीचा खूप मोठा पराभव झाला. या आघाडीने आपल्या कर्माचे मूल्यमापन न करता बदनाम केले ईव्हीएमला. आणि जनतेने दिलेला कौल मान्य केला नाही. लोकमताची कदर केली नाही. ज्यांनी विजय प्राप्त करून दिला त्याची आणि ज्यांनी त्यांना हरवले त्यांची देखील! त्यांनी लोकसभा निवडणुकीमध्ये ईव्हीएम नको, मतपत्रिकांवर मतदान घ्या असे आंदोलन केले असते तर त्यांचा प्रामाणिक उद्देश जनतेने मान्य केला असता. आता मतदार जागृत झाले आहे. नाहीतर त्यांनी महायुतीला कशाला निवडून दिले असते? कारण महाविकास आघाडी, त्याचे नेते कसे आहेत, याची त्यांना माहिती होती. या नेते मंडळींच्या मनाच्या मशीनमधून कधी काय बाहेर पडेल काही सांगता येत नाही. राजकीय पक्षाच्या मशीनने लोकशाहीमधील एका चांगल्या मतदान मशीनला बदनाम करण्याचा प्रयत्न चालू केला आहे, ही गोष्ट महाराष्ट्रामधील मतदारांना लक्षात आली आहे. निवडणुकीमध्ये पराभव झाला की आपल्या चुकांचा विचार न करता मशीनमधील चुका शोधून काढून, निवडून आलेल्या राजकीय पक्षाला बदनाम करण्याचे मशीन सुरू करणे आणि लोकशाही प्रदूषित करणे हाच त्याचा प्रयत्न असतो, याची पूर्ण माहिती मतदारांना आहे. आता मतदार अधिक सावध झाले आहेत, असे त्यांच्याशी चर्चा करताना लक्षात येते.

## वाचक पत्रे



**शशिकांत पांडे**/७५८८७४१९९६

●● ●●

### एक देश, एक निवडणुकीने मतदानाची टक्केवारी वाढेल

'एक देश एक निवडणूक' या धोरणामुळे मतदानाची टक्केवारी वाढणार आहे. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगर परिषद, महानगर पालिका, विधानसभा, लोकसभा या निवडणुका एकावेळी होतील तेव्हा एकेका बुथवर एका मतदाराकरिता ६ ते ७ ईव्हीएम लावाव्या लागतील. एवढ्या मोठ्या प्रमाणावर मशीनची व्यवस्था करावी लागेल. हे झाले प्रशासनाचे काम. निवडणुकांच्या संदर्भात असा अनुभव आहे की लोकसभा, विधानसभा, या निवडणुकांत पक्षाचा कार्यकर्ता मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करीत नाही, जेव्हा ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगर परिषद, महानगर पालिका या निवडणुका लोकसभा, विधानसभांबरोबर होतील तेव्हा स्थानिक कार्यकर्ता सुद्धा निवडणुकीत उमेदवार असेल त्या परिस्थितीत स्थानिक उमेदवार स्वतः निवडून येण्याकरिता घरोघरी जाऊन मतदार घराबाहेर काढेल आणि मतदान करायला लावेल. अशा स्थितीत मतदान ८५ ते ९० टक्क्यांपर्यंत वाढू शकते. याचा फायदा लोकसभा, विधानसभा यांना नक्की होईल. ▮

**डॉ. जयंत ओक**/९७६४६४८३८३

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# साहित्य सम्मेलनाच्या निमित्याने आद्यकवी मुकुंदराज स्वामी यांच्या पावन भूमीत सकल साहित्याची निर्मिती व्हावी-डॉ. शिरीष खेडगीकर

## अंबाजोगाईत ११ व्या साहित्य संमेलनाचे शानदार उदघाटन



**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१५ डिसेंबर**

साहित्य सम्मेलनाच्या निमित्याने आद्यकवी मुकुंदराज स्वामी यांच्या पावन भूमीत सकल साहित्याची निर्मिती व्हावी अशी अपेक्षा डॉ. शिरीष खेडगीकर यांनी अंबाजोगाई येथे आयोजित ११ व्या साहित्य संमेलनाच्या उदघाटन प्रसंगी व्यक्त केली.

या प्रसंगी संमेलनाध्यक्ष बालाजी सुतार, सुदर्शन रापतवार स्वागताध्यक्ष यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.या प्रसंगी रचना यांना डॉ शैला लोहिया लेखिका पुरस्कार, उमेश मोहिते यांना मंदाताई देशमुख कथा लेखन पुरस्कार तर अलीम अजीम यांना प्राचार्य संतोष मुळावकर शिक्षक लेखक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

या प्रसंगी बोलताना डॉ. शिरीष खेडगीकर म्हणाले की, लोकाश्रयातून साहित्य सम्मेलन म्हणजे आशादायक गोष्ट आहे. हे सम्मेलन इव्हेंट नव्हे तर मूहमेन्ट व्हावे. अखिल भारतीय साहित्य सम्मेलन झाले त्यावेळी मला सहहागी होता आले आणि त्यामुळे माझी साहित्याकडे ओढी झाली. अनेक लेखक योगेश्वरी शाळे मधुन उदयास आले. हे साहित्य सम्मेलन बहु सांस्कृतिक बनलं आहे.या साहित्य सम्मेलनाच्या निमित्याने आद्यकवी मुकुंदराज स्वामी यांच्या पावन भूमीत सकल साहित्याची निर्मिती व्हावी अशी अपेक्षा त्यांनी या वेळी व्यक्त केली.

या वेळी बोलताना संमेलन अध्यक्ष बालाजी सुतार म्हणाले की, अंबाजोगाई साहित्य संमेलनापासून, मराठवाडा साहित्य संमेलन आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनांपर्यंतचे सोहळे मी 'निमंत्रित' म्हणून मंचावरून अनुभवलेले आहेत. या सगळ्यात, मला छोट्या संमेलनांबद्दल नेहमीच प्रेम वाटत आलेलं आहे. 'संमेलन' ही गोष्ट व्याख्येत बसवता येणं जरासं कठीण आहे. सुगीच्या हंगामात भरघोस पीक यावं त्याप्रमाणे दिवाळीपासून पुढे पाडव्यापर्यंत वेगवेगळ्या संमेलनांची रेलचेल महाराष्ट्रात असते. काही शहरांत लिट-फेस्टही होतात. 'दर्जा' मात्र मोजक्याच ठिकाणी राखला जाताना दिसतो, साहित्य संमेलनांच्या माध्यमातून अशा प्रकारचा जागर अपेक्षित असतो. किमान तो जागर घडून येण्याच्या दिशेने काही हालचाली अशा संमेलनांच्या माध्यमातून निश्चितपणे घडून येतात, असं मला वाटतं.

स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयात शिक्षणासाठी आलो, तेव्हापासून या गावाबद्दल मनात जे प्रेम निर्माण झालं, ते आज तीन दशकांनंतरही किंचितसुद्धा कमी झालेले नाही. याचं मुख्य कारण हे, की, हे गाव मुळातच तितका जीव जडण्या लायक, तितका आदर करण्यालायक आहे. कला-साहित्यात रमणारी रसिक आणि समाजकारणात नीतिमत्ता जोपासणारी माणसं मला मिळाली. काही भली, काही वाईटही. अशा सगळ्या माणसांनी गावाला 'गावपण' दिलेलं असतं. अंबाजोगाईपुरता विचार केला, तर इथे अशी विराट उंचीची माणसं होऊन गेली, आजही आहेत, ही गोष्ट या गावाबद्दल प्रेम निर्माण करायला पुरेशी आहे. आद्यकवी मुकुंदराजांपासून, 'पासोडी'कार दासोपंतांपासून, प्रखर स्वातंत्र्यसेनानी स्वामी रामानंद तीर्थांपासून, विराट ताकदीचे कादंबरीकार प्रा. रंगनाथ तिवारी आणि सुस्मृत रामकाका मुकद्दम, एकनाथराव गुरुजी, प्रा. शैला लोहिया; उर्दूतले कवी वफा साहेब यांच्या सह बहुसंख्य विविध क्षेत्रा मधील व्यक्तिमत्व या संदर्भात मुद्दाम उल्लेख करावाच लागेल असा इथला यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह! सुजन राजकारणी असलेल्या सुस्मृत भगवानराव लोमटे यांच्या पुढाकारातून चालू झालेल्या आणि मागच्या तीन दशकांपासून दगडू लोमटे यांनी महाराष्ट्रभर एकहाती नावारूपाला आणलेल्या या समारोहाने या सबंध शहरावर, इथल्या पुढच्या-पुढच्या पिढ्यांवर कला-साहित्य-संगीताचे अक्षरशः संस्कार केलेले आहेत.

इतिहासाला अर्थ देण्याचं आणि उन्हातल्या वर्तमानाच्या माथ्यावर छत उभं करण्याचं काम नेहमी लेखणीनेच केलेलं आहे. लेखणीला दुसरा पर्याय असू शकत नाही. ज्ञानेश्वरांना आठवा, किंवा तुकारामांना डोळ्यांसमोर येऊ द्या; म्हणजे लेखणीचं मोल लक्षात येऊ शकेल.

दैनंदिन आयुष्यात आपल्या रोजच्या भोवतालातली, आपल्या निकटची माणसं रोजच्या रोज भरडली जात असतात त्याचं कोणाला सोयरसुतक दिसत नाही. बोलण्यासाठी घरात कुणीही उपलब्ध नसल्याने पैसे मोजून नाती विकत घ्यावी लागतात हे महाराष्ट्राच्या तथाकथित सांस्कृतिक राजधानीतलंच नव्हे तर गावोगाव सगळीकडेच दिसू लागलेलं वास्तव आहे.

पुरस्कार प्राप्त रचना सत्काराला उत्तर देताना म्हणाल्या की, मला अमर हबीब व दगडू लोमटे यांचा अभिमान आहे. डॉ शैला लोहिया यांचं नांव फार मोठे आहे मला हा पुरस्कार मिळाला हे माझं भाग्य आहे. माझ्या माहेरच्या लोकांनी घेतलेली ही दखल सदैव आठवणीत राहील. लिखानाची सुरवात २०१३ साली केली. मानवलोक मधील महिलांच्या मुलाखती घेऊन जो लेख लिहला तो माझा पहिला लेख ज्या नावाने पुरस्कार मिळतोय त्या नावाची उंची वाढवण्याची शक्ती मला मिळावी हीच अपेक्षा.

या वेळी प्रास्ताविक करते वेळी स्वागत अध्यक्ष सुदर्शन रापतवार म्हणाले की, १९९८ पासून अंबाजोगाई मध्ये साहित्य सम्मेलन सुरू झाले. लोकाश्रया वर चालणारे हे साहित्य सम्मेलन सुरू असून याच्या यशस्विते साठी सभासद शुल्क व्यतिरिक्त कोणाकडून ही पैसे जमा केले जात नाहीत. सम्मेलन यशस्वी ते साठी विविध स्पर्धा, कार्यशाळा आयोजित केल्या. साहित्य सम्मेलना मध्ये आगळ्या वेगळ्या विषयावर परिसंवाद होणार आहे.

या प्रसंगी आयोजित जागर दिंडीचे उद्घाटन डॉ. बी. आय. खडकभावी पूर्व स्वागताध्यक्ष यांच्या हस्ते झाले. ही जागर दिंडी छ. शिवाजी महाराज चौक येथून निघून आद्यकवी मुकुंदराज सभागृहात आली यात सहभागी विद्यार्थ्यांनी कार्यक्रम स्थळी उपस्थित जेष्ठ नागरिकांचा पुष्प देऊन सन्मान केला या जागर दिंडीसाठी सुनील व्यवहारे, ॲड. अनंत जगतकर, लक्ष्मण गोरे, कैलास चोले, नामदेव मुंडे, विष्णु सरवदे यांनी पुढाकार घेतला.

या प्रसंगी ११ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनाचे मार्गदर्शक प्राचार्य कमलाकर कांबळे, जेष्ठ पत्रकार अमर हबीब, तिलोत्तमा पतकराव यांच्या सह उपाध्यक्ष सुभाष बाहेती, वंदना तेलंग, सचिव प्रा. पंडीत कराड, सहसचिवः विष्णू सरवदे, कोषाध्यक्ष गोरख शेंद्रे, व्यासपीठ नियोजन प्रमुख विजय रापतवार, सांस्कृतिक कार्य प्रमुखः सुनील व्यवहारे, प्रसिद्धी प्रमुखः आशरब पठाण, सदस्य दत्ता अंबेकर, चंद्रकला देशमुख, सुजाता भोजने, ॲड. जयंत भारजकर, विशाल जगताप यांच्या सह मसापचे दगडू लोमटे (अध्यक्ष), डॉ. राहुल धाकडे (उपाध्यक्ष), गोरख शेंद्रे (सचिव), प्रा.डॉ. शैलजा बरुरे (कोषाध्यक्ष), प्रा. विष्णु कावळे (सहसचिव), अमृत महाजन, प्रा.डॉ. देविदास खोडेवाड, रेखा देशमुख, निशा चौसाळकर यांची प्रमुख उपस्थिती होती कार्यक्रमाची सुरवात दिवंगत साहित्यिकांना श्रद्धांजली व दीपप्रज्वलनाने झाली. प्रास्ताविक दगडू लोमटे (अध्यक्ष, मसाप) यांनी तर सूत्र संचालन अभिजित जोंधळे यांनी केले.या प्रसंगी अंबाजोगाई सह बाहेरून आलेले साहित्यिक, कवी व नागरिक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# लिंबागणेश जि.प.गटात विकासकामाचे उद्‌घाटन

## बेलखंडी फाटा-नागझरी ते नामाजीबुवा रस्त्याचा शुभारंभ



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ डिसेंबर**

लिंबागणेश जिल्हा परिषद गटातील डोंगरभागातील गावांचे दळवळण सोयीस्कर व्हावे यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडून मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत बेलखंडी फाटा-नागझरी ते नामाजी बुवा मंदीरापर्यंतच्या एकूण साडेसहा किलोमीटर डांबरी, एकूण साडेतीन कोटी रुपयांच्या रस्ता कामाचे उद्घाटन करण्यात आले. दरम्यान निवडणुकीत विजयी झाल्यानंतर आ.क्षीरसागर पहिल्यांदा या भागात आल्यामुळे नागरिकांनी मोठ्या जल्लोषात त्यांचे स्वागत केले.

लिंबागणेश जिल्हा परिषद गटातील डोंगरभागात असणाऱ्या गावांचे दळवळण सोयीस्कर व्हावे. येथील लोकांना सोयीसुविधेच्या उपलब्धतेसाठी वाहतूक व्यवस्था सक्षम असावी यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांच्या पाठपुराव्यातून ईजिमा ११५ ते नागझरी फाटा ते नामाजीबुवा मंदीरापर्यंत ०/०० ते ६/३०० च्या एकूण साडेसहा किलोमीटर अंतर असलेल्या डांबरी रस्त्याच्या कामाला मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मंजुरी मिळाली. शनिवार (दि.१४) रोजी या रस्त्याच्या कामाचा शुभारंभ आ.संदीप क्षीरसागर यांनी केला. या कामाला लवकरच प्रत्यक्ष सुरूवात करण्यात येणार आहे. या विकासकाम शुभारंभ प्रसंगी माजी आ.सय्यद सलीम, राजेंद्र मस्के, परमेश्वर सातपुते, गणेश वरेकर, वैजनाथ नाना तांदळे, गोरख शिंगण, बाळासाहेब गोरे यांच्यासह जिल्हा परिषदेच्या संबंधित विभागाचे अधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कॅफेमध्ये अश्लील कृत्याला परवानगी

## कॅफे मालक अटक ;बीड शहर पोलिसांची कामगिरी



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ डिसेंबर**

दिनांक ११/१२/२०२४ रोजी कॅफे फोर चे मालक विवेक सुधाकर जाधव यांनी एका अल्पवयीन मुलीला एका मुलासोबत एकांतवासात अश्लील कृत्य करण्यास बसू दिले. या प्रकरणाची खातरजमा करण्यात आली आणि व्हिडिओ शूटिंग पण करण्यात आली. यामुळे रितसर तक्रार नोंदवून यातील तो मुलगा आणि कॅफे मालक विवेक सुधाकर जाधव, राहणार संत नामदेव नगर, बीड यास अटक करण्यात आली आहे. त्यांच्यावर बाल लैंगिक अत्याचार कायदा याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच फिर्याद मध्ये असा पण उल्लेख आहे की , इतरही कॅफेवर अशा प्रकारचे अश्लील कृत्याला परवानगी देण्यात येत असते. यामुळे शहरातील सर्व कॅफे आता या गुन्ह्याच्या तपासात अंतर्भूत झाली असून ज्या कॅफेमध्ये अशा प्रकारचे आक्षेपार्य जोडपे सापडतील त्यांच्यावर बाल लैंगिक अत्याचार कायद्याप्रमाणे कडक कारवाई करण्यात येणार आहे.

सदरील कारवाई, श्री. अविनाश बारगळ, पोलीस अधीक्षक बीड, अपर पोलीस अधीक्षक बीड श्री सचिन पांडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी श्री. विश्वांबर गोल्डे, बीड, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ , सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबाजी राठोड, पोलीस अंमलदार गोरे, सुशेन पवार, मनोज परजणे सय्यद आशपाक यांनी केली आहे.

# अखेर आ.नमिता मुंदडा यांच्यामुळे कैकाडी समाजाला मिळाली स्मशानभूमीसाठी १५ गुंठे जागा

## आ.नमिताताई मुंदडा यांचे कैकाडी समाजाने मानले आभार

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१५ डिसेंबर**

मागील अनेक वर्षांपासून प्रलंबीत असलेला अंबाजोगाईतील कैकाडी समाज स्मशानभूमीचा प्रश्न अखेर आ.सौ.नमिता अक्षय मुंदडा यांच्यामुळे मार्गी लागला आहे. याबाबत अधिकृत माहिती अखिल भारतीय कैकाडी महासंघाचे अंबाजोगाई तालुकाध्यक्ष रमेश कोंडीराम जाधव यांनी दिली आहे. याबद्दल कैकाडी समाजाकडून आ.मुंदडा यांचे जाहीर आभार मानण्यात येत आहेत.

याबाबत अखिल भारतीय कैकाडी महासंघाचे अंबाजोगाई तालुकाध्यक्ष रमेश कोंडीराम जाधव यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना दिलेल्या माहितीनुसार सांगितले की, मागील अनेक वर्षांपासून कैकाडी समाजाच्या स्मशानभूमीचा प्रश्न प्रलंबित होता, ऊन, वारा, पाऊस यांचा सामना करीत कैकाडी समाजातील बांधवांना समाजाच्या ताब्यातील उघड्या व अपुऱ्या जागेवर पिढ्यान् पिढ्या अंत्यविधी करावा लागत होता, या बाबत अखिल भारतीय कैकाडी महासंघाचे अंबाजोगाई तालुकाध्यक्ष रमेश



जाधव यांनी कैकाडी समाजातील इतर बांधवांसह सर्वजणांनी मिळून केज विधानसभा मतदारसंघाच्या लोकप्रिय आ.नमिताताई मुंदडा, जेष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा, युवा नेते अक्षय मुंदडा यांना प्रत्यक्ष भेटून याप्रश्नी त्यांनी स्वतः लक्ष देण्याची विनंती केली असता, या सर्व मान्यवरांकडून आम्हाला सकारात्मक प्रतिसाद मिळाला. याविषयी कैकाडी समाजाचे युवक कार्यकर्ते तथा मी अखिल भारतीय कैकाडी महासंघाचा अंबाजोगाई तालुकाध्यक्ष रमेश जाधव व समाज बांधवांनी १५ गुंठे जागा उपलब्ध व्हावी यासाठी काकाजींच्या मार्गदर्शनानुसार ११ मार्च २०२४ रोजी अर्ज देवून सदरचा प्रस्ताव तयार करण्यासाठी मुख्याधिकारी, तहसीलदार, उपजिल्हाधिकारी व उप अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयाकडे सातत्यपूर्ण प्रयत्न व पाठपुरावा केला. तर आ.मुंदडा यांनी ही शासन दरबारी वेळोवेळी हा प्रश्न मांडला आणि सदर प्रस्तावाबाबत सकारात्मक पाठपुरावा करून रेणुकामाता मंदिर रोड जवळील अंबाजोगाई येथील कैकाडी समाजाच्या स्मशानभूमी साठी सर्व्हे नंबर ६२१/३ मधील १५ गुंठे जागा शासकीय गायरानातून उपलब्ध करून दिली. अखेर मुंदडा कुटुंबियांनी कैकाडी समाजाला दिलेला शब्द खरा व पुर्ण केला. त्यामुळे अत्यंत आवश्यक असलेल्या कैकाडी समाज स्मशानभूमीचा प्रश्न अखेर मार्गी लावल्याबद्दल कैकाडी समाजाकडून अखिल भारतीय कैकाडी महासंघाचे अंबाजोगाई तालुकाध्यक्ष रमेश जाधव यांनी केज विधानसभा मतदारसंघाच्या लोकप्रिय आ.नमिताताई मुंदडा, जेष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा, युवा नेते अक्षय मुंदडा यांचे तसेच शासन, प्रशासन, प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्वांचे जाहीर आभार मानले आहेत.

# परभणीतील कोंबींग ऑपरेशन थांबवून आंदोलकांवरील गुन्हे मागे घ्या

## आ.संदीप क्षीरसागरांची पोलीस महासंचालकांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१५ डिसेंबर**

परभणी येथे भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीचा अवमान केल्याचा प्रकार घडला होता. याचा निषेध म्हणून आंबेडकरी समाजबांधवांनी परभणीमध्ये आंदोलन केले होते. त्यामुळे अनेक समाजबांधवांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत आणि होत आहेत. तसेच कोंबींग ऑपरेशन करून नागरिकांना मारहाण केली जात आहे. दरम्यान भारतीय राज्यघटना म्हणजे आपल्या अस्मितेचा विषय असल्याने त्याबाबत कसलीही अवहेलना समाज खपवून घेऊ शकत नाही. या भावनेतून हे आंदोलन करण्यात आले होते. तरी पोलिस प्रशासनाने कोंबिंग ऑपरेशन थांबवून, आंदोलकांवरील गुन्हे मागे घ्यावे अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.

परभणी येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर घटनाकार, महामानव, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा आहे व पुतळ्याच्या जवळच भारतीय संविधानाची प्रतिकृती साकारलेली आहे. मंगळवारी (दि.१०) रोजी या संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना एका माथेफिरूकडून करण्यात आली. शेवटी भारतीय संविधान हा सर्वांच्याच अस्मितेचा विषय आहे. त्यामुळे या घटनेचा निषेध व्यक्त करण्यासाठी समाजबांधवांनी आंदोलने केली. आंदोलनाला अल्प प्रमाणात हिंसक वळण आले. त्यामुळे पोलिसांकडून कोंबिंग ऑपरेशन करून आंदोलकांवर गुन्हे दाखल करणे सुरू आहे. परंतु या आंदोलनाचा हेतू हा मुळीच हिंसा पसरवणे नव्हता. समाजबांधवांनी लोकशाही मार्गानेच आंदोलन केले होते. परंतु अशा आंदोलनाच्या आडून काही प्रवृत्ती हिंसा पसरविण्याचे काम करत असतात हे बर्याचवेळा लक्षात आले आहे. ही बाब लक्षात घेत, कोंबिंग ऑपरेशन थांबवून आंदोलकांवर दाखल झालेले गुन्हे मागे घ्यावेत अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी महाराष्ट्र राज्याचे पोलिस महासंचालक यांच्याकडे केली आहे.

# निवडणुका बॅलेट पेपर वर घ्या-खा.रजनीताई पाटील

**काँग्रेस आगामी निवडणुका स्वबळावर लढणार**
**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१५ डिसेंबर**

विधानसभा निवडणुका नुकत्याच संपल्या व या निवडणुकीचे निकाल अनपेक्षित आल्याने निवडणुका खरच लोकशाही पद्धतीने होत आहेत का ? असा प्रश्न काँग्रेसच्या नेत्या खा. रजनीताई पाटील यांनी बोलताना विचारला. केज येथे आयोजित करण्यात आलेल्या इव्हीएम हटाव स्वाक्षरी मोहिमेचा शुभारंभ प्रसंगी त्या बोलत होत्या या कार्यक्रमाचे अध्यक्ष बीड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल सोनवणे हे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून माजी मंत्री अशोक पाटील हे होते.

ईव्हीएम हटाओ देश बचाओ, संविधान बचाओ हे अभियान भारतीय काँग्रेस पक्षाने सुरू केले असून या अभियानाची सुरुवात बीड जिल्हयात करण्यात आली याचा शुभारंभ केज येथे करण्यात आला बोलताना खा. रजनीताई पाटील यांनी सांगितले की देशात व विशेषतः महाराष्ट्रात महायुतीच्या विरोधात जनतेचा कौल होता, जनभावना विरोधात होती अनेक पोल देखील महायुतीच्या विरुद्ध होते तरीही यापूर्वी कधीही मिळाल्या नाही येवढ्या मोठ्या प्रमाणात जागा भाजप व मित्र पक्षाच्या येतात याचा अर्थ इव्हीएम् मद्ये काहीतरी गडबड आहे आणि म्हणून काँग्रेस पक्षाने हे अभियान सुरू केले आहे. येणारा काळ काँग्रेस पक्षचा आहे त्यामुळे सर्वसामान्य लोकांसाठी कामे करा यापुढच्या निवडणुका आता आपल्या कार्यकर्त्यांसह व त्यांच्यासाठीच लढायच्या आहेत प्रत्येक वेळी आपल्यावर जागा वाटपात अन्याय होतो मात्र आता आपण आपल्याच चिन्हावर या निवडणुका लढणार असल्याचे रजनीताई पाटील यांनी सांगितले.

अब मैं मैदान मे आऊंगा..... अशोक पाटील

यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना अशोक पाटील यांनी आपल्या खास शैलीतून पदाधिकारी व कार्यकर्त्यांना कामाला लागण्याच्या सूचना केल्या आणि आता जिल्ह्यातील प्रत्येक निवडणूक काँग्रेस पक्ष स्वबळावर लढणार आहे त्यामुळे मी आपल्या कार्यकर्त्यांसाठी सैदव उपलब्ध असेल मला कधीही कुठेही बोलवा मी यायला तयार आहे. मोठ्या ताकतीने



पक्ष संघटन करू आणि तेवढ्याच ताकतीने नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका आपण काँग्रेसच्या चिन्हावर लढू अस मत त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले.

यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांनी देखील या अभियानाची सुरुवात खा.रजनीताई पाटील यांच्या स्वाक्षरीने सुरुवात करून केली तर यापुढे प्रत्येक तालुका निहाय पक्ष बांधणी करून नव्या जुण्यांचा एकत्र येवून मोठ बांधून जिल्ह्यात पक्षाला पुन्हा शिखरावर नेण्याचे काम आपण सर्वजण करू अशी भावना व्यक्त केली.यावेळी या कार्यक्रमाला आदित्य पाटील, नवनाथ थोटे, महिला काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष मीनाक्षी पांडुळे, अनुसूचित जाती सेल चे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे, सर्व तालुका अध्यक्ष, युवक चे पदाधिकारी, महिला पदाधिकारी, अल्पसंख्यांक विभागाचे पदाधिकारी, अनुसूचित जाती सेल चे जिल्हाध्यक्ष व पदाधिकारी यांचे सह प्रमुख कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.



स्वा. सावरकर माध्यमिक विद्यालयात कार्यानुभव अंतर्गत इयत्ता ६ वी वर्गातील विद्यार्थ्यांनी फटाक्यांच्या खोक्यापासून तुळशीवृंदावन,मंदिर व घर तयार केले. या प्रसंगी संस्था विद्यासभा उपाध्यक्ष उमेशराव जगताप, जेष्ठ शिक्षक हरिभाऊ साबळे सर,विषय प्रमुख सु.ल. चव्हाण सर, वर्गशिक्षक मिरगे सर समवेत सहभागी विद्यार्थी.

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### श्रीमती शांताबाई मानवतकर यांचा आज स्मृती संगीत समारोह

**परभणी,/प्रतिनिधी-** येथील डॉ. रवींद्र मानवतकर, डॉ.संध्या मानवतकर यांच्यावतीने रविवारी (दि.१२) येथील श्री शिवाजी म हाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात सायंकाळी ५ वाजता 'श्रीमती शांताबाई मानवतकर स्मृती संगीत समारोहा'चे आयोजन करण्यात आले आहे.

मागील तेरा वर्षापासून या शास्त्रीय संगीताचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. भारतीय संस्कृतीचा एक अमूल्य असा ठेवा असलेल्या शास्त्रीय संगीताच्या या कार्यक्रमात यावेळी गायन व वादन असे दोन्ही प्रकार सादर होणार आहेत. तसेच गायनामध्ये शास्त्रीय व उपशास्त्रीय दोन्ही प्रकार सादर होणार आहेत. या संगीत समारोहात प्रसिद्ध कलाकार कृष्णराज लव्हेकर हे रागसंगीत सादर करणार असून श्रीमती सावनी तळवलकर भदे या तबला सोलो तर श्रीमती उत्तरा जावडेकर पेंडसे या नाट्यसंगीत सादर करणार आहेत. त्याांना साथसंगत पंकज शिरभाते (व्हायोलिन), संजय सुवर्णकार (तबला), मंगेश जवळेकर (संवादिनी), कृष्णराज लव्हेकर (संवादिनी) हे करणार आहेत. या कार्यक्रमाचे निवेदन सौ. रोहिणी गोरे करणार आहेत. या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. रवींद्र मानवतकर व डॉ. संध्या मानवतकर यांनी केले आहे.

### महिला लोकशाही दिनाचे आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी-** समस्याग्रस्त व पीडित महिलांनी सोमवार, दि. १६ डिसेंबर, २०२४ रोजी महिला लोकशाही दिनी आपले अर्ज विहित नमुन्यात सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन घेण्यात येतो.

सोमवार, दि. १६ डिसेंबर, २०२४ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या अध्यक्षतेखाली महिला लोकशाही दिन होणार आहे. संबंधीत समितीचे सदस्य व शासन निर्णयात नमूद संबंधित विभागाचे अधिकारी यांनी उपस्थित राहावे. समस्याग्रस्त व पीडित महिलांना त्याांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे तसेच त्याांच्या हक्कांचे संरक्षण होऊन त्याांना न्याय मिळावा तसेच समाजातील त्याांना सुलभ मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून जिल्हास्तरावर महिला लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. तरी जिल्ह्यातील महिलांनी त्याांच्या वैयक्तिक स्वरूपाच्या तक्रारी विहीत नमुन्यात जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, परभणी यांच्या कार्यालयात दाखल करण्यात याव्यात, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी केले आहे.

### ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक हभप उध्दवरावजी लाड गुरुजी यांचे निधन

**मानवत,/प्रतिनिधी-** येथील शिवाजी नगरातील निवासी



ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक जेष्ठ आदर्श सेवानिवृत्त शिक्षक आ. उध्दवरावजी शालिकरामजी लाड (गुरुजी) यांना देवज्ञा झाली आहे. त्याांच्यावर येथील मानवत नगर परिषदेच्या शासकिय वैकूंठधाम मोक्षभूमित ठिक ४ वाजता अंत्यासंस्कार करण्यात येणार आहे. नेताजी सुभाष विद्यालयातील आदर्श शिक्षक श्री भगवान दादा लाड यांचे ते वडील होते. त्याांच्या पश्चात पती, मूलगा , सून नातू असा परिवार आहे. त्याांच्या निधनामूळे शिवाजी नगर , कैलास नगर, पंचवटी कॉलणी, लाड गल्ली, संभाजी नगरावर शोककळा पसरली. जिल्हातील आप्तगणांनी ठिक ४ वाजता अंत्याविधी कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन आप्तगणातून करण्यात आले आहे.

### आर्वीतील विद्यार्थी रमले निसर्गशाळेत

**परभणी,/प्रतिनिधी-** तालुक्यातील आर्वी येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी शनिवारी (दि.१४) 'आवडीचा शनिवार' उपक्रमांतर्गत तुळजापूर या ठिकाणी निसर्गशाळेचा आनंद लूटला.

दैनंदिन जीवनामध्ये चार भिंतींच्या वर्ग खोल्यांमध्ये पाठ्यपुस्तकातील शिक्षणात विद्यार्थी गुंग आहेत. या विद्यार्थ्यांची जीवन कौशल्ये विकसित व्हावी, या दृष्टीने निसर्गशाळा हा सहशालेय उपक्रम समोर आला. आर्वीतील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक विद्यालयातील शिक्षकांनी आयोजित केलेल्या त्याा उपक्रमातून विद्यार्थ्यांना निसर्गशाळेचा अनुभव दिला. शेती-माती आणि पिके, पिकांचा उपयोग, पिकांना पाणी देण्याच्या पद्धती, पिके संरक्षण करण्याच्या पद्धती, पिके उत्पादन याबाबतीत विद्यार्थ्यांना सहज आणि सूचकपणे या गोष्टी अनुभवयास मिळाल्या.

आपले गाव आणि गावाच्या भोवतालचा परिसर, परिसराची वैशिष्ट्ये, लोकजीवन, पशु-पक्षी यांच्याबरोबरच झाडे-वेली-रानफ ले-शेतकरी आणि शेतीची कामे विद्यार्थ्यांना परिचित होतीच. त्याा आणखीन ज्ञानाची भर पडली. सध्या हिवाळा ऋतू सुरू असून फ ललेले तुरीचे पीक आणि तुरीच्या शेंगा, बोरं, हिरव्यागार ज्वारी आणि गव्हाच्या पिकांची रानं पाहून आर्वीतील हे विद्यार्थी सुखावले.

तुळजापूर गावामध्ये तुळजाभवानी देवीचे मंदिर आहे. या मंदिरातील स्थापत्त्या कला (बांधकाम) लक्षवेधी आहे. विद्यार्थ्यांनी या स्थापत्त्या कलेची पाहणी केली. त्याा कलेमागील माहिती जाणून घेतली. तसेच मनोरंजनात्मक खेळही खेळले. झाडे आणि त्यांचे उपयोग विद्यार्थ्यांनी अवगत केले. विशेषतः जीवन जगण्यासाठी झाडांपासून मिळणारा ऑक्सिजन महत्त्वाचा आहे, हेही विद्यार्थ्यांना शिक्षकांनी समजावून दिले. यावेळी वनभोजन आणि सहभोजनाचा आनंद विद्यार्थ्यांनी शिक्षकाबरोबर घेतला.

या निसर्गशाळेचे आयोजन शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक भारत ढाणे, सौ. गंगा बाकले, सौ. अमिलकंठवार, सौ. पांचाळ, सौ. कौसडीकर, सौ. वरवटकर, लोखंडे, शहाणे, नरगरे आदींनी केले.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# इतिहास जन्माला घालणाऱ्या माय-बाप जनतेपूढे नतमस्तक - आ.डॉ.रत्नाकर गुट्टे

## विजयी आमदार डॉ.गुट्टे यांचे गंगाखेड नगरीत जोरदार स्वागत

**परभणी,/प्रतिनिधी:** राजकारण म्हटलं की, काहीच अंतिम नसते. मात्र, तरीही तुम्ही प्रामाणिकपणे काम करीत राहिलात की, जनता तुमच्या कामाची नोंद घेत असते. तीचं नोंद तुम्हाला विजयाचा गुलाल लावत असते. त्याामुळे काम करीत राहिले पाहिजे. तेव्हाच जनतेच्या आशीर्वादाने फळ मिळते, हा शिरस्ता गंगाखेड विधानसभा मतदारसंघातल्या मतदारांनी अवघ्या महाराष्ट्राला घालून दिला आहे. त्याामुळे अतिशय निर्णायक काळात सलग दोन वेळा मला विजयी करून इतिहास जन्माला घालणाऱ्या माय-बाप जनतेपुढे कायम नतमस्तक आहे, असे भावनिक प्रतिपादन स्थानिक आ.डॉ. रताकर गुट्टे यांनी केले.



विधानसभा निवडणूक विजयाच्या अनुषंगाने सर्वसाम ान्य जनता, पदाधिकारी, कार्यकर्ते व विविध समाज घटकांकडून परभणी ते गंगाखेड प्रवासादरम्यान आ.डॉ.गुट्टे यांचे जागोजागी जंगी स्वागत करून सत्कार करण्यात आला. त्याावेळी ते बोलत होते. याप्रसंगी पोखर्णी नृ, पोखर्णी फाटा, बनपिंपळा निवासस्थानी, राम-सीता सदन जनसंपर्क कार्यालय तसेच इतरही विविध ठिकाणी भव्य सत्कार करण्यात आले. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनीमोठाजल्लोषकरीत फटाक्यांची आतषबाजी केली. पुढे बोलताना आ.डॉ. गुट्टे म्हणाले की, गेल्या ४० वर्षांपासून आपल्या म तदारसंघाचा रखडलेला विकास पुन्हा कार्यान्वित करून त्यास चालना देण्यात मला जरी यश आले असले तरी, ते केवळ आपल्या पाठींब्यामुळे शक्य झाले आहे. त्याामुळे तुमची साथ, सोबत आणि आशीर्वाद हेचं माझं भांडवल आहे. तेचं भांडवल घेवून मी आजपर्यंत वाटचाल करीत आलो आहे. म्हणून मला विरोधकांची कधीच चिंता नसते. कारण, माझा पॅटर्नच वेगळा आहे. तो विरोधकांना कधीही समजणार नाही. त्याांनी जास्तीत-जास्त टीका करून वाटेल ती भाषा वापरली, म्हणूनच आपले मताधिक्य वाढले, ही गोष्ट विरोधक सुध्दा मान्य करतील. तरीही आगामी काळात मोठ्या उत्साहाने मतदारसंघाच्या सेवेसाठी सज्ज होण्याचा निर्धार केला आहे. तीन तालुक्याच्या या म तदारसंघात विकासाचा सम तोल राखण्यासाठी मी कायम कटिबद्ध राहीन. गावोगावी असलेल्या अडचणी व सम स्या दूर करण्यासाठी संबंधित गावातील जनतेला विश्वासात घेवून सकारात्मक पद्धतीने पुढे वाटचाल करायची आहे. त्याामुळे आता झाले गेले विसरून एकदिलाने काम ाला लागू. आणखी नव्या जोमाने विकासाची घौडदौड आणखी गतिमान करू, असेही आ.डॉ.गुट्टे यांनी म्हटले. विधानसभा निवडणूक निकालानंतर आज पहिल्यांदा मतदारसंघातील जनसामान्य नागरिक, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी केलेले हे उत्साही स्वागत आणि दिलेल्या शुभेच्छा खूप मोलाच्या आहेत. असे प्रेम करणारे असंख्य नागरिक, पदाधिकारी व कार्यकर्ते असल्यामुळे काम करताना नेहमी ऊर्जा आणि बळ मिळते. त्याामुळे राजकीय चौकटीच्या बाहेर जाऊन या सर्वांशी आत्म ीय नाते निर्माण झाले आहे. ते नाते अधिक दृढ करण्यासाठी आणि त्याांच्या आयुष्यात सुविधांची समृद्धी निर्माण करण्यासाठी इथून पुढे कार्यरत राहणार आहे. तसेच निवडणूक प्रचाराच्या दरम्यान दिलेली सर्व आश्वासने आणि शब्द पूर्ण करण्यासाठी विशेष परिश्रम सुध्दा करणार आहे, असेही आ.डॉ.गुट्टे यांनी स्पष्ट केले. यावेळी राष्ट्रीय समाज पक्ष, आ.डॉ.रताकर गुट्टे (काका) मित्र मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आरं कोण आले कोण आला! नागरिक, पदाधिकारी कार्यकर्ते व इतरांकडून जागोजागी झालेल्या या जंगी स्वागतावेळी कोण आला रे, कोण आला रासपचा वाघ आला, गुट्टे साहेब तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है, जनतेचा आहे एकच नारा, गुट्टे साहेबच आहे खरा, कोण म्हणतं होतं येणार नाही, आल्याशिवाय राहीला नाही, अशा विविध घोषणांनी सर्वांचेच लक्ष वेधून घेतले.

## रायखेडा येथे एक दिवसीय बौध्द धम्म परिषदेचे आयोजन



**जिंतूर,/प्रतिनिधी-** तालुक्यातील रायखेडा येथे भेसज्ज बुद्ध विहार भूमिपूजन सोहळा निमीत्त एक दिवसीय बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन रविवार दि १५ डिसेंबर सकाळी १० वाजता करण्यात आले आहे. या परिषदेला राज्यातून ज्येष्ठ भिकू उपस्थित राहणार असून या कार्यक्रम ासाठी बौध्द उपासक उपासिका तसेच भारतीय संविधान प्रेमींनी उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजन समिती कडून करण्यात आले आहे.

या परिषदेला महाराष्ट्रातील मुंबई अहमदनगर मनमाड हिंगोली पुणे आणि तेलंगणा येथून ज्येष्ठ बौद्ध भिक्खु आणि भिक्खुनी धम्म प्रवचनासाठी येणार आहेत. सदरील परिषद दोन सत्रात संपन्न होणार असून पहिल्या सत्रात बौद्ध भिकूंची धम्मदेशना आणि मान्यवरांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. दुसऱ्या सत्रात महाराष्ट्रातील ख्यातनाम गायिका भाग्यश्री इंगळे यांच्या समाज प्रबोधनपर बुद्ध भीम गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन सायंकाळी सहा वाजता करण्यात आले आहे. यावेळी उपस्थित बौद्ध उपासक उपासिका यांना अन्नदान होणार असून जिंतूर तालुक्यातील बौद्ध उपासक उपासिका यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजन समितीकडून करण्यात आले आहे. जिंतूर चारठाना हायवेवर दोन एक्कर परीसरात रायखेडा बुद्धभुमी वसलेली आहे. गेल्या वीस वर्षांपासून याठिकाणी बौध्द धम्माच्या प्रतीकांची स्थापना करण्यात आली आहे. सद्य स्थितीत या ठिकाणी भिकखुची धम्मकुटी असून अनेक उपासक उपासिका भेटी देत असतात. भविष्यात येथे महाविहार निर्मिती करण्याचा संकल्प आहे.

## जिंतूर प्रेस क्लबचे विभागीय स्तरावर दर्पण पुरस्कार जाहिर

### विकास वार्ता विकास राऊत तर सामाजिक वार्ता पुरस्कार नामदेव खेडकर यांना जाहीर

**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिंतूर तालुका प्रेस क्लबच्या वतीने आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त देण्यात येणारे दर्पण पुरस्कार जाहीर करण्यात आले असून सामाजिक वार्ता दर्पण पुरस्कार नामदेव खेडकर (छत्रपती संभाजीनगर) यांना तर विकास वार्ता पुरस्कार विकास राऊत (छत्रपती संभाजीनगर )यांना जाहीर करण्यात आला आहे.







जिंतूर तालुका प्रेस क्लब व व्हॉइस ऑफ मीडिया च्या वतीने दर्पण दिनाचे औचित्या साधून दरवर्षी मराठवाड्यातील पत्रकारिता क्षेत्रांमध्ये दर्जेदार लिखाण करणाऱ्या व सामाजिक ,सांस्कृतिक, साहित्यिाक ,तसेच राजकीय लिखाण करून समाज प्रबोधन करणाऱ्या पत्रकारांचा गौरव या व्यासपीठाच्या माध्यम ातून करण्यात येतो याहीवर्षी ०६जानेवारी २०२५रोज सोमवार सायंकाळी सहा वाजता जुनी कन्याशाळा,भाजी मंडी जिंतूर या ठिकाणी कार्यक्रमासाठी प्रसिद्ध व्याख्याते डॉ. प्रा विनोद बाबर (कऱ्हाड )यांचे ''आयुष्य सुंदर आहे या विषयावर व्याख्यान होणार आहे कार्यक्रमासाठी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत या व ईतर पाहुण्याच्या हस्ते या पुरस्कार सोहळा संपन्न होणार आहे आयोजन केले आहे दरवर्षी तालुका प्रेस क्लबच्या वतीने मराठवाडा विभागातील पत्रकारिता क्षेत्रामध्ये योगदान देणाऱ्या व निर्भीडपणे लिखाण करणाऱ्या दोन पत्रकारांना ''आचार्य बाळशास्त्री जांभेकर सामाजिक वार्ता दर्पण पुरस्कार'' व ''आचार्य बाळशास्त्री जांभेकर विकास वार्ता दर्पण पुरस्कार देण्यात येतो'' यापूर्वी अभिमन्यू कांबळे परभणी, संतोष धारासूरकर परभणी ,राजाभाऊ नगरकर जिंतूर,सुरज कदम परभणी,सुरेश जपंनगीरे परभणी विठ्ठल भिसे पाथरी बालाजी मालगुडे बीड ,फकीरा देशमुख जालना बसंत कुमार भट्ट हिंगोली मारुती जुबडे परभणी यांना हा पुरस्कार प्राप्त झाला आहे यावर्षी विकास वार्ता पुरस्कार विकास राऊत (छत्रपती संभाजीनगर ) सामाजिक वार्ता दर्पण पुरस्कार नामदेव खेडकर (छत्रपती संभाजीनगर) यांना जाहीर झाला आहे पुरस्काराचे स्वरूप रोख प्रत्योकी पाच हजार रुपये सन्मानचिन्ह ,जांभेकर पगडी ,पुष्पहार शाल असे आहे पुरस्कार जाहीर करते वेळेस प्रेस क्लबचे संस्थापक तथा व्हॉइस ऑफ मिडियाचे राज्य कार्याध्यक्ष विजय चोरडिया ,प्रेस क्लबचे अध्यक्ष मंचकराव देशम ुख, कार्याध्यक्ष प्राचार्य राहुल वाहुळे, व्हाईस ऑफ मीडियाचे तालुकाध्यक्ष भागवत चव्हाण यांची उपस्थिती होते. या कार्यक्रम ासाठी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जिंतूर तालुका प्रेस क्लब व व्हाईस ऑफ मीडियाच्या वतीने करण्यात आले आहेत.

## शेतकऱ्यांना ॲग्रिस्टॅकच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजनांचा जलदगतीने मिळणार लाभ-गावडे

### शेतकरी ओळख क्रमांकासाठी १६ डिसेंबरपासून राबविण्यात येणार

**परभणी,/प्रतिनिधी:** राज्यातील कृषि क्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करून शासनाच्या विविध योजनांचा जलदगतीने व परिणामकारकरित्याा लाभ शेतकऱ्यांना देणे सुलभ व्हावे याकरीता केंद्र शासनाची ॲग्रिस्टॅक योजना राज्यात राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. यासाठी दि. १६ डिसेंबर २०२४ पासून परभणी जिल्हयातील प्रत्योक गावात सर्व शेतकऱ्यांचे शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) तयार करण्याकरीता मोहीम राबविण्यात येणार आहे. परभणी जिल्हयातील सर्व शेतकऱ्यांनी सदर मोहिमेच्या दिवशी उपस्थित राहून आपला शेतकरी ओळख क्रमांक प्राप्त करून घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी केले आहे. ॲग्रिस्टॅक योजनेची उद्दिष्टे -- राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा व त्याांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संच (फार्मर रजिस्ट्री), शेतकऱ्यांच्या शेतातील हंगामी पिकांचा माहिती संच (क्रॉप सोन रजिस्ट्री) व शेतांचे भू संदर्भिकृत (जिओ रेफरन्स लँड पार्सल) यांचा माहिती संच एकत्रितरित्याा तयार करणे व सातत्याने अद्ययावत करणे. राज्यातील शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी केंद्र राज्य शासनाद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ शेतकऱ्यांना सुलभ, पारदर्शक पद्धतीने तसेच वेळेवर उपलब्ध करणे. शेतकऱ्यांना स्वस्त कर्ज, उच्च गुणवत्तेची कृषि निविष्ठा, विपणन, स्थानिक आणि विशिष्ट तज्ञ मार्गदर्शन उपलब्ध करुन देणे. शेतकऱ्यांना बाजारपेठेपर्यंत अधिक माहितीपूर्ण आणि सोयीस्कर प्रवेश मिळवून देणे. शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ जलदगतीने देण्यासाठी शेतकऱ्यांची ओळख पटवण्याची पारदर्शक व सोपी पद्धत विकसीत करणे तसेच प्रमाणिकरणाची सुलभ पद्धत विकसित करणे. राज्यातील शेतकऱ्यांना अधिक चांगल्या प्रकारे सेवा देण्यासाठी कृषि व संलग्न विभाग यांच्यात विविध योजनांच्या अभिसरण प्रक्रियेत सुलभता आणणे. . उच्च-गुणवत्तेचा डेटा व ॲग्रि-टेकद्वारे कृषि उत्पादने आणि सेवांमध्ये नवकल्पना वाढविणे. योजनेचे अपेक्षित फायदे -- पीएम किसान योजनेतर्गत अनुदान प्राप्त करण्यासाठी आवश्यकतेच्या अटी पूर्ण करून लाभ प्राप्त करण्यामध्ये सुलभता येईल. पीएम किसान योजनेतंर्गत पात्र सर्व लाभार्थी समाविष्ट करुन घेण्यास सहाय्य मिळेल. शेतकऱ्यांना पिकासाठी कर्ज मिळवण्यासाठी किसान क्रेडिट कार्ड आणि कृषि इनफ्रास्ट्रक्चर फंड व शेतीच्या विकासासाठी इतर कर्जे उपलब्ध करुन घेण्यात सुलभता राहील. पिक विमा तसेच आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत शेतकऱ्यांचे देय नुकसान भरपाईसाठी शेतकऱ्यांचे सर्वेक्षण करण्यात सुलभता येईल. किमान आधारभूत किंमतीवर खरेदीमध्ये शेतकऱ्यांचे नोंदणीकरण ऑनलाईन पध्दतीने होऊ शकेल. शेतकऱ्यांसाठी कृषि कर्ज, वित्त, निविष्ठा आणि इतर सेवा देणाऱ्या यंत्रणांना कृषि सेवा सहजपणे उपलब्ध करून देण्यासाठी सुलभता येईल. शेतकऱ्यांना विविध सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी, कृषि व संलग्न विभागांना शेतकऱ्यांचा व त्याांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संच (फार्मर रजिस्ट्री) च्या उपलब्ध आकडेवारीच्या आधारे योजनांचा लाभ वितरीत करण्यामध्ये सुलभता येईल आणि लाभार्थ्यांची वारंवार प्रमाणिकरणाची आवश्यकता राहणार नाही. शेतकऱ्यांना वेळेवर कृषि विषयक सल्ले, विविध संस्थांकडून शेतकऱ्यांना संपर्क करण्याच्या संधीमध्ये वाढीसह नाविन्यपूर्ण कार्यक्रमांच्या विस्तार-प्रचारात सफलता प्राप्त होईल. दि. १६ डिसेंबर २०२४ पासून परभणी जिल्हयातील प्रत्योक गावात सर्व शेतकऱ्यांचे ओळख क्रमांक (फार्मर आयडी) तयार करणेसाठी मोहीम राबविण्यात येणार आहे. तरी जिल्हयातील सर्व शेतकरी बंधु-भगिनींना आवाहन करण्यात येते कि, सदर मोहिमेच्या दिवशी उपस्थित राहून आपला शेतकरी ओळख क्रमांक प्राप्त करून घ्यावा, असे जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी आवाहन केले आहे.

## गट शेती लाभदायक- कुलगूरु डॉ.इंन्द्र मणि

**परभणी,/प्रतिनिधी:** शेतकऱ्यांना खरेदी बाजार व्यवस्थे ऐवजी विक्री बाजार व्यवस्थेचा उपयोग करता आला तर त्याांच्या शेतम ालाचा भाव ठरविता येईल, याकरिता गट शेती लाभदायक ठरते म्हणून गटाने शेती करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन त्याांनी केले.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या विस्तार शिक्षण संचालनालय आणि महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने कीटकशास्त्र विभागातील क्रॉपसॅप प्रकल्प अंतर्गत आयोजित शेतकरी शास्त्राज्ञ कृषी संवादाच्या २४व्या भागात शुक्रवारी (दि.१३) कुलगुरू डॉ. इन्द्र मणि यांनी 'उत्पादन खर्चाची भूमिका' अधोरेखित केली.

कुलगुरू मा. डॉ. इन्द्र मणि यांनी शेतकरी शास्त्राज्ञ कृषी संवाद हा शेतकऱ्यांसाठी विशेष उपक्रम असल्याचे सांगितले. शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी विद्यापीठाने संशोधन व तंत्राज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी विविध उपक्रम राबवत असल्याचे त्याांनी नमूद केले. किफायतशीर शेतीसाठी उत्पादन खर्च कमी करणे आवश्यक असल्याचे सांगत त्याांनी गोदावरी वाणाच्या तुरीच्या यशोगाथेचा उल्लेख केला. सोलापूरच्या करमाळा तालुक्यात ४० शेतकरी गटांच्या माध्यमातून ४०० हेक्टरवर गोदावरी वाणाची लागवड केली गेली. यासाठी विद्यापीठाच्या बदनापूर येथील कृषी संशोधन केंद्राच्या शास्त्राज्ञांच्या मार्गदर्शनाखाली कमी बियाण्याचा वापर करून टोकन पद्धत, ठिबक सिंचन व जैविक घटकांचा वापर या तंत्राज्ञानाचा उपयोग करून १५ ते २० क्विंटल प्रती हेक्टरपर्यंत उत्पादन घेत आहेत. या प्रकल्पासाठी पाणी फाउंडेशनचा महत्त्वाचा सहभाग असल्याचे त्याांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या प्रस्ताविकात विस्तार शिक्षण संचालक डॉ. गिरधारी वाघमारे यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी विद्यापीठ एकजुटीने कार्यरत असल्याचे सांगून शेतकऱ्यांचा सहभाग अधिक वाढविण्याचे आवाहन केले. यावेळी मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विविध विषयांवरील त्याांच्या प्रश्नांना विद्यापीठाचे शास्त्राज्ञ डॉ. गिरधारी वाघमारे, डॉ. विश्वनाथ खंदारे, डॉ. पुरुषोत्तम नेहरकर, डॉ. संजय पाटील, डॉ. अनंत लाड, डॉ. गजानन गडदे यांनी समाधानकारक उत्तरे दिली.

# गौरव कोटगिरे अपहरण प्रकरणातील आरोपींना अटक

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १४ डिसेंबर**



शिवसेना शहरप्रमुख गौरव कोटगिरे यांच्या अपहरण प्रकरणातील आठ आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले असून, आरोपीकडून दहा लाख तीन हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दरम्यान हा अपहरणाचा प्रकार फायनान्सच्या वादातून झाल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी दिली.

शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे शहर प्रमुख गौरव कोटगिरे यांचे शुक्रवारी रात्री अपहरण झाले होते. या प्रकरणात गौरव कोटगिरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन इतवारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणात पोलिसांनी अवघ्या बारा तासात आठ आरोपींना अटक केली असून, यामध्ये एका अल्पवयीन बालकाचा समावेश आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, पोलीस उपनिरीक्षक आनंद बिच्चेवार व मिलिंद सोनकांबळे यांच्या पथकाला मिळालेल्या गुप्त माहितीनुसार अपहरण करणारे आरोपी हे अभिलेखावरील आरोपी असून, ते मारतळा येथे असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. या माहितीवरुन पोलिसांनी या आरोपीचा शोध घेवून त्यांना ताब्यात घेतले. पोलिसांनी या कारवाईत बालाजी शिवाजी जाधव रा.दयासागर नगर, दिलीपसिंघ हरीसिंघ पवार रा.विस्तारीत नाथनगर, अनिल शिवाजी भगत रा.दरवेशनगर, बालाजी किशन भारती रा.श्रीरामनगर, सुनिल ग्यानोबा वाघमारे रा.नाईकनगर, अमनदिप अवतारसिंघ राठोड रा.मगनपूरा, चैतन्य संजय जोंधळे रा.विष्णूपुरी व एका अल्पवयीन आरोपीस अटक केली आहे.

पोलिसांनी त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेली टाटा सफारी वाहन व तीन खंजर असा एकूण दहा लाख तीन हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या घटनेत गौरव कोटगिरे व आरोपी बालाजी जाधव यांच्यात जुन्या फायनान्सच्या वाहने खरेदी विक्री करण्यावरुन वाद असल्याचे पोलिसांनी सांगितले. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी सुशिलकुमार नाईक, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, इतवारा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रणजित भुईटे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक आनंद बिच्चेवार, मिलिंद सोनकांबळे, पोलीस उपनिरीक्षक रमेश गायकवाड, पोलीस अंमलदार गंगाधर कदम, प्रभाकर मलदोडे, रवि बामणे, संजीव जिंकलवाड, चंद्रकांत स्वामी, विश्वनाथ पवार, राहुल लाठकर, मोतीराम पवार, तानाजी येळगे, तिरुपती तेलंग, बालाजी तेलंग, राजकुमार डोंगरे, हेमंत बिचकेवार, सिध्दार्थ सोनसळे यांच्या पथकाने केली.

# आ.केराम यांना मंत्री करण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांचे पाठबळ

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि.१४ डिसेंबर**

प्रत्येक विधानसभा निवडणुकीत नांदेड व इतर काही ठराविक मतदारसंघातून निवडून आलेल्या आमदाराची मंत्रिमंडळात वर्णी लागावी म्हणून त्यांच्या पाठीशी मोठी एक मोठी राजकीय शक्ती जोरदार फिल्डिंग लावत उभी राहत असल्याने त्यांचे पारडं जड पडतं.यावेळी मात्र परिस्थिती वेगळी असून, दस्तुरखुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपला सर्व राजकीय अनुभव व शक्ती पणाला लावून आ.भीमराव केराम यांना निवडून आणण्यासाठी सिंहांचा वाटा उचलला आहे. आता हिच शक्ती मुख्यमंत्री फडणवीस आ.केराम यांना मंत्रिपद देऊन डबल करणार असल्याची सूत्रांकडून खात्रीलायक माहिती मिळत असल्याने ही खुशखबरी ऐकण्यासाठी मतदारसंघातील जनतेचे व भाजपा कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे.

आदिवासी व बंजारा बहुल भाग असलेल्या किनवट विधानसभा मतदारसंघाला गेल्या पंचविस वर्षांपासून राज्य मंत्रिमंडळात स्थान नसल्याने विकासाच्या बाबतीत पोरका झाला. तब्बल पंचवीस वर्षाच्या प्रदिर्घ कालावधीत संयुक्त विधानसभा मतदारसंघ असलेल्या किनवट व माहूर या दोन्ही तालुक्याच्या आमदाराला मंत्रिमंडळात स्थान न मिळावे हेच सर्वात मोठे दुर्भाग्य ठरले आहे येथील विविधांगी विकास रखडण्याचे, मागासलेपणाचा डाग कायम असण्याचे येथील विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी आता खरी गरज आणि योग्य वेळ आहे ती या मतदारसंघाला मंत्रिमंडळात स्थान देऊन आदिवासी जमातीचे भाजपाचे आमदार भीमराव केराम यांना आदिवासी विकास, नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अथवा राज्यमंत्री करण्याची आणि हे यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस करतीलच अशी राजकीय वर्तुळातून व जनसामान्यांमधून आशा व्यक्त केली जात आहे. किंबहुना आ. भीमराव केराम यांना कॅबिनेट मंत्री नाही तर निदान राज्यमंत्री पदाची लॉटरी लागल्याची दाट शक्यता राजकीय निरीक्षकांकडूनही वर्तविण्यात येत आहे.

## संक्षिप्त वृत्त

### परभणी घटनेच्या निषेधार्थ देगलूर कडकडीत बंद

**देगलूर**-परभणी शहरातील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळा परिसरात असलेल्या संविधानाच्या प्रतिकृतीची मंगळवारी आरोपी नामे सोपान पवार नामक समाज कंठकाणे विटंबना केली. या घटनेच्या निषेधार्थ आज दि. १३-११-२०२४ संविधान प्रेमी कडून देगलूर बंदला शांततेत पार पाडण्यात आले व दि.११.१२.२०२४ रोजी पुकारलेल्या परभणी बंदला हिंसक वळण लागले होते. बंद च्या काळात अनेक ठिकाणी जाळपोळ, दगडफेक झाल्याची माहिती समोर येत आहे. जेव्हा जेव्हा राज्यामध्ये भाजपचे सरकार येते तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याची किंवा मागासवर्गीय अस्मितेच्या प्रतीकाची अशी तोडफोड विटंबना होण्याची ही पहिलीच घटना नाही या अगोदर भीमा कोरेगाव दंगल असेल किंवा अजून कितीतरी घटना असतील अश्या अनेक जातीय दंगली महाराष्ट्रात भाजपच्या काळात घडत आलेल्या आहेत. महापुरुषांचे स्मारक, प्रतीके सुरक्षा, मागासवर्गीय सुरक्षा राखण्यात भाजप अपयशी ठरलेले आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उप मुख्यमंत्री अजित पवार यांनी या संपूर्ण घटनेची जबाबदारी स्वीकारून आपल्या पदाचा राजीनामा दयावा आणि दि. ११ डिसें. ला झालेल्या आंदोलनाच्या खोट्या गुन्ह्यात आंबेडकर विचार धारेची तरुणांना अडकवण्याचा प्रयत्न जर केलात तर याहूनही तीव्र आंदोलने व मोर्चे काढण्यात येतील याला सर्वस्वी जबाबदार प्रशासन राहील अशा प्रकारचे निवेदन देण्यात आले. यावेळी देगलूर शहर व ग्रामीण भागातील हजारो सर्व धर्मीय संविधान रक्षक उपस्थित होते. शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर महाविकास आघाडीच्या वतीने धरणे आंदोलन करून निषेध व्यक्त करण्यात आला. हाविकास आघाडीच्या वतीने दोषीवर कारवाई करा तसेच परभणी येथील युवकांवर झालेला गुन्हा मागार घ्यावा असे उपजिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.यावेळी महाविकास आघाडी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थिती होते.

### अब्दुल कुरेशी यांचे निधन

**आदमपूर**-बिलोली शहरातील ईदगाह मोहल्ल्यातील रहिवासी सेवानिवृत्त ग्रंथपाल तथा जेष्ठ पत्रकार ए.जी.कुरेशी अर्थात अब्दुल गफूरसाब कुरेशी(७०)यांचे दि.१३ डिसेंबर रोजी शुक्रवारी हृदयविकाराने निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर दि.१४ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता जामा-मस्जिद बिलोली कब्रस्तानात शोकाकुल वातावरणात दफनविधी करण्यात आला.

# नळाला तुटी बसवून घ्यावे, अन्यथा नळ जोडणी बंद : मुख्याधिकारी लाळगे

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. १४ डिसेंबर**



शहराला सुनेगाव तलावातून पाणी पुरवठा केला जातो.सांडपाण्याचे नियोजन नसल्याने अनेक वेळ नळाद्वारे पाणी वाया जाते तसे न करता जनतेनी नळाला तुटी बसवून घ्यावे, होणारा पाण्याचा अपव्यय टाळावा लवकरात लवकर नळाला तुटी बसुन घ्यावे अन्यथा नळ जोडणी बंद करण्याचा इशारा मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे यांनी दिला.

नवनिर्वाचित मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे यांनी विधानसभा निवडणुकीत नगर परिषदेचा कार्यभार स्विकारल. पण शहरातील काही कामाचे आऊटपुट घेतले नाही पदभार स्वीकारताच विधानसभेच्या निवडणुकीचे काम हाती आले. यामुळे शहरातील जनतेच्या कामाचा आढावा घेता आला नाही. मतदान झाले की सुट्टीवर गेले आणी १३ डिसेंबरला कार्यालयात दाखल झाले. शहरातील नागरिकांच्या आडीआडचणी सोडवण्यासाठी कार्यालयातील सर्व विभाग प्रमुखांची बैठक घेऊन शहरातील कामाचा आढावा घेतला.

शहराला सुनेगाव तलावातून पाण्याचा पुरवठा केला जातो पण शहरात पाण्याचे वितरण विस्कीळीत आसल्याने अनेकवेळा शहरात पाणीपुरवठा अखंडीत होत असतो कारण शहरासाठी साठवन क्षमता ,वितरण व्यवस्था खिळखिळी झाली आहे, अनेक वार्डात मुख्य लाईन गळती असल्याने वितरीत पाण्यापेक्षा गळती पाणी वाया जाते त्यामुळे प्रभागात ठरवून दिलेल्या वेळेपेक्षा जास्ता वेळ पाणी सोडावे लागते. यामुळे अनेक नळाचे तोंड खुले आसल्याने नळाचे पाणी वाया जात असते. काही दिवसानंतर लिंबोटी धरणातुन शहराला पाणी पुरवठा होणार आहे. या संदर्भात कामाचा आढावा घेण्यात येईल त्या अनुषंगाने शहरातील पाणीपुरवठा वितरण व्यवस्था मजबूत करण्यासाठी जनतेने नळाला तुटल्या बसुन घ्याव्या पाण्याचा अपव्यय टाळावा, लागेल तेवढे पाणी घेऊन नळ बंद करुन ठेवावे अन्यथा नळ जोडणी बंद करण्यात येणार असल्याचे मुख्याधिकार श्रीकांत लाळगे म्हणाले. तसेच शहरातील घरकुलासाठी दोन कोटीं रुपये कार्यालयाला प्राप्त झाले पण कोणत्या टप्प्यासाठी आलेत यांचे माहिती घेऊन घरकुल लाभधारकांच्या खात्यावर लवकरात लवकर जमा करण्यात येणार असल्याचेही नुतन मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे यांनी सांगितले.

# परभणीतील घटनेचा सिडकोमध्ये निषेध

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. १४ डिसेंबर**

परभणी येथील घटनेचा निषेध दर्शविण्यासाठी सिडको शिवाजी पुतळा येथे दिनांक १२ डिसेंबर रोजी आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते पी. एस. गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली निदर्शने करण्यात आली.

यावेळी आंबेडकरी चळवळीतील पी.एस. गवळी, विलास गजभारे, राजू लांडगे, डि.के. कांबळे, प्रदीप हानवते, प्रसेनजीत वाघमारे, सुनिल वडगावकर, एकनाथ वाघमारे, बंटी गायकवाड, सम्राट आढाव, वेंकट इंगळे, मोतीराम गायकवाड, चांदू वाघमारे, बाबुराव गजभारे, तेजस भिसे, आकाश सूर्यवंशी, नितीन पावडे, दिलीप लांडगे, विशाल जोंधळे, बालाजी गायकवाड, राजेश लांडगे, चंद्रकांत सावंत ,आकाश सोनकांबळे, शुभम वाघमारे, किरण सोनसळे, मनोज नांदेडकर, धम्मानंद टोम्पे, राहुल तारू ,आकाश गजभारे, संदीप महाबळे, अनिल सोनसळे,शिलवंत लांडगे यांच्यासह सिडको हडपती समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. परिसरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी नांदेड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक यांची घटनास्थळी उपस्थिती होती. तर नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि.अनंत भंडे, व्हि. आर. रोडे, बाबुराव चव्हाण, जी एस भालेराव, सपोउपनि. उद्धव भारती, हेड कानिष्ठेबल तेलंग, केंद्रे, आरसीपीचे जवान यांच्यासह गोपनीय शाखेचे बालाजी दंतापल्ले, टर्के बालाप्रसाद यांच्यासह महिला पोलीस कर्मचारी वैशाली घोणसेटवाड, ज्योती कंधारे, छाया याल्लावार, भाग्यश्री सूर्यवंशी, दीपा पुंडगिरे यांच्यासह पोलीस अधिकारी कर्मचारी सहकारी यांच्या वतीने कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# हदगाव तालुक्यात भाजपा सदस्यता अभियान राबविणार : सूर्यकांत हनवते

**तभा वृत्तसेवा**
**निवघा,दि. १४ डिसेंबर**



भाजपा सदस्यता अभियान सुरू केले असून सदस्य होण्याकरिता८८००००२०२४ या क्रमांकावर मिस कॉल देऊन भाजपचे सदस्य होता येणार आहे सदरील अभियान हादगाव तालुक्यात राबवून भाजपाचे सदस्य वाढवणार असल्याची माहिती भाजपा सदस्य अभियान हदगाव तालुका संयोजक सूर्यकांत हनवते यांनी दिली आहे

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ,भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे ,खा अशोक चव्हाण , खा अजितजी गोपछडे ,मराठवाडा संघटन मंत्री संजयजी कोडगे, नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष किशोरजी देशमुख, हादगाव तालुका अध्यक्ष तातेराव पाटील ,भाजपा नेते तुकाराम चव्हाण, निळू पाटील कल्याणकर, व्यंकटेश लोणे ,प्रमोद आप्पा मामीडवार , ड रा-वसाहेब देशमुख , बाळासाहेब देशमुख, यांच्या मार्गदर्शनात, हादगाव तालुक्यात प्रत्येक बूथ वर बूथ प्रमुख यांच्या माध्यमातून तसेच हदगाव तालुका सहसंयोजक रूपा देवी पाटील ,बाला पाटील कदम ,मोरेश्वर माने ,साईनाथ बाबुळकर ,तुकाराम देशमुख, पवनजी वानखेडे ,सोनू भातनाते तसेच प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते यांच्या सहकार्याने भाजपा सदस्यता अभियान राबविणार असल्याची माहिती सदस्यता अभियान तालुका संयोजक सूर्यकांत हनवते यांनी दिली आहे



मुदखेड-तालुक्यात विविध ठिकाणी नवनिर्वाचित आ. ॲड श्रीजया चव्हाण यांनी दौऱ्या निमित्ताने नागरिकांशी भेटिगाठी व कार्यकर्त्यांचे आभार मानले. यामध्ये श्री आपरंपार स्वामी मठात कार्यक्रम ठेवण्यात आला होता. या निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजक स्वाभिमानी कुंभार समाज तालुकाध्यक्ष विठ्ठल आचार्य, देविदास चंद्रे,संतोष सावंत, विशाल बादलवाड, गणेश देवडे, योगेश शेटे, यांच्या वतीने नवनिर्वाचित आमदार ॲड श्रीजया चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला.

# परभणी येथील घटनेच्या निषेधार्थ इस्लापूर शहर कडकडीत बंद



## निषेध सभाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**इस्लापूर,दि. १४ डिसेंबर**

परभणी शहरात घडलेल्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाच्या प्रकरणी घडलेल्या निंदनीय घटनेच्या विरोधात किनवट तालुक्यातील इस्लापूर शहरांमध्ये इस्लापूर शहर कडकडीत बंद ठेवून या घटनेचा निषेध नोंदवण्यात आला. व इस्लापूर येथील शिवाजी चौकामध्ये निषेध सभेचे आयोजन दिनांक १४ रोजी करण्यात आले होते. याप्रसंगी संविधानाच्या संदर्भात घडलेल्या निंदनीय प्रकाराच्या निषेधार्थ सर्वपक्षीय पक्षाचे पदाधिकारी विविध संघटनेची पदाधिकारी पत्रकार बांधव आंबेडकर प्रेमी व विविध समाजातील शेकडो तरुण युवक वर्ग मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. याप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संदर्भात घडलेल्या घटनेच्या संदर्भात डॉक्टर भगवान गंगासागर, प्रभाकर बोडेवाड, विठ्ठलराव गटपाळे, मारुती शेळके, दत्ता गडलवाड, परमेश्वर पेशवे, प्रकाश कारलेवाड, यांनी या घटनेच्या संदर्भात तीव्र शब्दात मत व्यक्त करून निषेध नोंदवला. व ही घटना ज्या समाजकंटकाकडून घडली असेल किंवा घडवल्या गेली असेल त्यांच्याविरुद्ध कठोर कार्यवाही करण्यात यावी अशा स्वरूपाची मागणी केली. याप्रसंगी परिसरातील शिवनी, भिशी, कोल्हारी कोसमेट, येथील नागरिकांनी सुद्धा मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शवली होती.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवी कसबे यांनी केले. यानंतर इस्लापूर येथील बस स्थानकापासून ते रेल्वे स्टेशन पर्यंत भव्य स्वरूपात रॅली काढून घोषणाबाजी करत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. येथील सहाय्यक पो-लीस निरीक्षक उमेश भोसले यांनी या घटने संदर्भात कुठेही कायदा व सुव्यवस्था बिघडू नये म्हणून मोठ्या प्रमाणात बंदोबस्त ठेवला होता. व पूर्णतः शांततेमध्ये ही निषेध सभा व रॅली पार पडली.

# निवघा बाजार परिसरात बोगस पशु डॉक्टरांचा सुळसुळाट

**तभा वृत्तसेवा**
**निवघा,दि. १४ डिसेंबर**

हदगाव तालुक्यातील निवघा बाजार येथे बोगस डॉक्टरांकडे कोणती डिग्री नसताना पण खेडोपाडी फिरून जनावराला ट्रीटमेंट देत आहेत यांच्याकडे निवघा येथील कोणत्याच पशु अधिकाऱ्या चे लक्ष नाही अशी शेतकरी वर्गातून बोलले जात आहे जनावराला इंजेक्शन सलाईन गोळ्या पशु डॉक्टर देत आहेत यांच्याकडे कोणती डिग्री नसताना पण अनेक जनावरे मरण पावले आहेत या मरण पावले आहेत या मृत्यूमुखी पडलेल्या जना-वराला जबाबदार कोण हे बोगस डॉक्टर शेतकऱ्याचे आर्थिक लूट करत आहेत अशा बोगस डॉक्टरला व कोणती डिग्री नसताना ट्रीटमेंट देत आहेत यांना पाठबळ कोण चे अशी पण उलट सुलट चर्चा होत आहे अशी शेतकरी वर्गातून ओरड होत आहे पशु अधिकारी यांनी अशा बोगस डॉक्टर वर कारवाई करण्यात यावी अशी शेतकरी वर्गातून मागणी होत आहे.

# हेमंत पाटील यांना मंत्रीमंडळात संधी द्यावी : पप्पू गायकवाड

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. १४ डिसेंबर**



माजी खासदार तथा विधान परिषदेचे आमदार हेमंत पाटील यांना मंत्रिमंडळात संधी देण्यात यावी अशी इच्छा नांदेड सिडको उपशहरप्रमुख पप्पू गायकवाड यांनी प्रसिद्धी माध्यमाद्वारे माजी मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली.

राज्यात नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत हेमंत पाटील यांनी नांदेड सह हिंगोली जिल्ह्यातील शिवसेनेची वज्रमुठ बांधून शिवसेना मजबूत करून चार आमदार निवडून आणले आहेत. या यशासाठी त्यांनी रात्रीचा दिवस करून परिश्रम घेऊन अटीतटीच्या शर्यतीत नांदेड दक्षिण मधून आ. आनंदराव पाटील बोंढारकर , नांदेड उत्तर मधून आ. बालाजी कल्याणकर , हदगाव विधानसभा येथून आ. बाबुराव कदम कोहळीकर व हिंगोली मधून आ. संतोष बांगर यांना निवडून आणले आहे. तेव्हा महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा सध्याचे उपमुख्यमंत्री शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांच्याशी एकनिष्ठ राहून हेमंत पाटील यांनी शिवसेनेचे प्रमाणिकपणे काम करून पुन्हा नवचैतन्य निर्माण करण्याचे मोलाचे कार्य केले आहे. त्यासाठी हेमंत पाटील यांना मंत्रिमंडळात स्थान देऊन मराठवाड्यातील शिवसैनिकांना न्याय द्यावा व नांदेडला पालकत्व मिळावे अशी सिडको उपशहर प्रमुख पप्पू गायकवाड यांनी प्रसिद्धी माध्यमातून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मागणी केली आहे.

# आंबट शोकीनांसाठी माळेगाव यात्रा नियमात शिथीलता

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. १४ डिसेंबर**

माळेगांव येथे दक्षिण भारतात प्रसिद्ध असे खंडोबा देवस्थान आहे. या खंडोबा देवस्थानची ४०० वर्षापासुन खंडोबा देवस्थानच्या नावाने यात्रा भरते या यात्रेत नाहीरे वाले , गावकुसाबाहेर समुह , ज्या समुह घटकांचे नात्या गोत्याची एकत्रीत भेट होण्याचे प्रसिध्द ठिकाण म्हणजे माळेगांव येथील खंडोबा देवस्थानची माळेगाव यात्रा होय, प्रशासनाच्या वतीने पाच ते सहा दिवश चालणारी मात्र परिसरातील यात्रेकरुना खरेदी व विक्री साठी तब्बल एक महिना चालणाऱ्या माळेगांव यात्रेची २९ डिसेंबरला देवस्थान पालखीच्या देवस्वारीने यात्रेला प्रारंभ होतो. आगामी यात्रेचे नियोजन व आयोजन करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने आढाव बैठकिचे आयोजन केले होते त्या बैठकिला लोहा मतदारसंघाचे आ. प्रताप पाटील चिखलीकर यांच्या अध्यक्षतेखाली माळेगांव येथील शासकीय विश्रामगृह परिसरात आढावा बैठकीचे आयोजन करुन यात्रेतील असुविधेची प्रशासनापुढे उकल करुन यात्रा वाढीसाठी सर्वांचे पर्यंत करणे आवश्यक आहे.आणी मंत्री मंडळानतर मुंख्यामंत्री व मराठवाड्याती मंत्र्यांना निमंत्रीत करुन यात्रेच्या वैभवात आणखी वाढ करण्याचे आश्वसन दिले.माजी मुख्यमंत्री कै.विलासराव देशमुख यांच्या स्मारकासाठी नांदेड, लातूर खासदाराशी बोलून काम मार्गी लावण्याचे काम लवकरच हाती घेण्यात येईल असे म्हणाले.आगमी यात्रेत आंबट शोकीनाचे मनोरंजन व्हावे यासाठी जिल्हा पोलिस यंत्रने यात्रा नियमात शितीलता ठेवण्याचे सुतोवाच केले

या बैठकीला प्रमुख उपस्थिती नांदेड जिल्हाधिकारी अभिजीत राऊत,जि.प मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, कंधार उपविभागीय अधिकारी आरूणा संगेवार, लोहा तहसीलदार विठ्ठल परळीकर ,लोहा उपविभागीय अभियंता मोहन पाटील पवार, सहाय्य गटविकास अधिकारी शिवाजी ढवळे,लोहा गटविकास अधिकारी आडेरागो,लोहा जि.प बांधकाम अभियंता शिवाजी राठोड,यांच्यासह अनेक सर्व जिल्हा विभागस्थर विभागाचे प्रमुख उपस्थित होते. यात्रेत भाविकावर अनुचित प्रकार घडूनये यासाठी मोठा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी ड्रोन कॅमेरातून यात्रेवर सि.टि.व्ही ची नजर रहाणार असल्याचे सांगितले. पोलिस विभागाच्या वतीने यात्रेत पोलीस उपविभागीय अधिकारी, पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक अशी ९० पोलीस अधिकारी १२५० पोलिस कर्मचाऱ्यांची नियुक्ती केल्याचे सांगितले प्रत्येक विभागाने काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे सुतोवाच केले.

आरोग्य विभागाने यात्रेतील भाविकांच्या आरोग्याची काळजीसाठी आयुर्वेदिक दवाखाना, याशिवाय चार ठिकाणी ओपीडी सुविधा, यात्रेत एकूण २० डॉक्टर, ५० आरोग्य कर्मचारी , मोटारसायकलसह तीन ॲम्बुलन्सची व्यवस्था राहणार आहे. माळेगाव यात्रेत महाराष्ट्रसह परराज्यातील खंडोबा भाविक खरेदी, विक्रीसाठी डेरेदाखल होतात नांदेड, परभणी, लातूर येथून दररोज अनेक बसचे ये..जा करण्यासाठी आयोजन केले आहे. माळेगाव यात्रेत महिला, जेष्ठ नागरिक मोठ्या प्रमात गर्दी होण्याची शक्यता आहे महिलांना एस.टी.प्रवास तिकिटात सवलत आसल्याने खरेदी साठी महिला वर्ग मोठ्या प्रमाणात दाखल होण्याची शक्यता आहे, नवसे, गवसे हौवसे, आंबट शोकीन तरुणाची हौस पूर्ण होणार आहे,तळीरामाल यात्रेत मुक्तपणे यात्रेचा आनंद घेता येणार आहे. यात्रा काळात आंबट शौकिनाना मुक्तपणे यात्रेत आनंद घेता यावा यासाठी जिल्हा पोलिस यंत्रणे यात्रा नियमात शितीलता ठेवण्याचे सुतोवाच केले. या बैठिला दत्ता वाले,करिम शेख, साहेबराव काळे, मिलिंद पवार,राम पवार,पपन बोडके,दिपक कानवटे, दिपक सुर्यवंशी, सुरेश पार्डीकर, सरपंच हानमत धुळगुंडे,विजय वाघमारे, यासह अनेक विभागाचे प्रमुख व पदाधिकारी भाविक उपस्थित होते. माळाकोळ पोलिस स्टेशनच्या अंतर्गत यात्रेत बंदोबस्ताचे नियोजन केले जाते माळेगांव यात्रा सत्तेत २० ते २५ दिवस यात्रा चालते या मार्गावर अनेक अवैध वहातुक चालते, अवैध धंदे चालतात, अनेक सराईत व पटाईत शोकीन यात्रेत दाखल होतात यावर माळाकोळी पोलिस प्रशासनाची मोठी जबाबदारी आहे पण पोलिस महासंचालक शहाजी उमाप यांचेही माळेगांव यात्रेवर बारकाईने निरिक्षण राहाणारे आहे.

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर



## सेवेचे समाधान देणारा कार्यक्रम 'दशसूत्री': जिल्हाधिकारी दिलीप स्वामी



छत्रपती संभाजीनगर, दि.१३(जिमाका):- 'दशसूत्री' शालेय शिक्षणातून आपल्या देशासाठी सत्शिल, प्रामाणिक व हुशार नागरिक घडविण्याचा कार्यक्रम आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्यासहित सर्व बाबींची काळजी घेऊन त्यांचे आयुष्य घडवून शिक्षकांना आपल्या सेवेचे समाधान देणारा कार्यक्रम आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज केले.

येथील छत्रपती शाहू महाराज शैक्षणिक संस्थेच्या सभागृहात आज 'दशसूत्री' अंमलबजावणीसाठी फुलंब्री व छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील जि.प. शाळा मुख्याध्यापकांची कार्यशाळा पार पडली.

जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथ.) जयश्री चव्हाण, जिल्हा शिक्षणाधिकारी(माध्य.) आश्विनी लाटकर, जिल्हा शिक्षणाधिकारी(योजना) अरुणा भुमकर, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्य सान्वी देशमुख, गटशिक्षणाधिकारी दिपाली थावरे, तहसिलदार मुनलोड व डॉ. कृष्णा कानगुले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे, सहा. प्राध्यापक मनोज मते आदी याप्रसंगी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, विद्यार्थ्यांना घडविणे हे अत्यंत पवित्र कार्य आहे. मुलांना देशाचे भावी नागरिक म्हणून आपण घडवित आहोत ह्या जबाबदारीचे भान असू द्यावे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाठी दशसूत्री कार्यक्रम तयार केला आहे. त्यासाठी निधीची आवश्यकता नाही. वेगळा वेळ द्यायची गरज नाही. हा कार्यक्रम आपल्याला आपली दैनंदिन शैक्षणिक काम करीत असतांनाच करता येणार आहे. या कामातून आपल्याला चांगले काम केल्याचे समाधान मिळणार आहे,असे जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले.

प्रास्ताविक श्रीमती आश्विनी लाटकर, सुत्रसंचालन मनोज मते तर दिपाली थावरे यांनी आभार मानले.

## बिडकीन येथे स्व. गोपीनाथरावजी मुंडे यांची जयंती साजरा



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १३ डिसेंबर पैठण तालुक्यातील बिडकिन येथे लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. आज सायंकाळी निलजगाव फाटा येथे संत गाडगेबाबा प्रतिष्ठान सभागृह येथे प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी शहरातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावचे प्रथम नागरिक तथा सरपंच अशोक धर्मे, राहूल ठाणगे, किरण गुजर, अमोल वंजारे, मधुकर सोकटकर, अमोल कोथिंबीरे, प्रा. पठाण सर, प्रा. उबाळे सर, प्रा. मुंढे सर. नागरिकांनी प्रतिमा पूजन करून अभिवादन केले. प्रा. ठोकळ सर यांनी स्व. गोपीनाथजी मुंडे यांचे जिवन चरित्र आपल्या भाषणातून उलगडले व संघर्षमय जिवन प्रवास यावर आपले अमूल्य विचार जनतेसमोर व्यक्त केले. तसेच प्रा. संभाजी आंधळे सरानी स्व. मुंडे राजकीय आणि सामाजिक कार्यातील योगदान व राजकारणातील खडतर पण यशस्वी प्रवास यावर मार्गदर्शन केले. तसेच प्रा. प्रमोद शिंदे सर यांनी ही स्व. गोपीनाथजी मुंडे सामाजिक कार्यावर मार्गदर्शन करताना सांगितले की नेहमीच समाजातील सर्वच वर्गांचा हिताचा विचार करून काम केले आणि तळागाळातील लोकांपर्यंत जाऊन त्यांना यथायोग्य मदत करण्यासाठी प्रयत्न केले. यावेळी शुभम केंद्रे, चि. ऋषी आंधळे, रितेश नागरगोजे, कृष्णा बडे, . शुभम मोगल यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शहादेव नागरगोजे यांनी तर सूत्रसंचालन प्रा. नवनाथ बांगर यांनी व आभार प्रदर्शन शुभम केंद्रे यांनी केले.

## दत्त जयंती सोहळा भक्तीमय वातावरणात साजरा



तभा वृत्तसेवा

पैठण दि १४ :- दक्षिण काशीतील श्रीक्षेत्र पैठण येथील मठ, मंदिरातून दि.१४ शनिवारी आगळेवेगळे महत्त्व असलेल्या दत्त जयंतीचा सोहळा मोठ्या भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला.भगवान दत्तात्रेंच्या स्पर्शाने पुनीत झालेली हि भुमी आहे. पैठण नगरीतील राष्ट्रीय संत एकनाथ महाराज यांच्या वाड्यावरही भगवान दत्तात्रेंनी चोखदार म्हणून सेवा बजावलेली आहे.नाथवंशज योगीराज महाराज गोसावी यांचे नाथ चरित्र ऐकण्यासाठी महाराष्ट्राच्या कान्याकोपऱ्यातुन भाविक वर्ग आला होता. भाविकांनी पहाटे गोदावरी स्नान करून शहरातील मंदिरातील दत्त दर्शन घेण्यासाठी गर्दी केली होती. मठ मंदिरातून भगवान दत्तात्रेंवर प्रवचन,किर्तने झाली.

दत्त जयंती निमित्ताने दत्त मुर्तीचा अभिषेकही करण्यात आला.नाथांचे गुरु जनार्दन स्वामी यांनी एकनाथ महाराजांचे प्रत्यक्षात भगवान दत्तात्रेंचे दर्शन व आशिर्वाद घडवून आणले. त्यामुळे पैठण शहरात घरोघरी दत्तात्राचे पारायण करून दत्त जयंती पैठणकर साजरी करतात.

## विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रदान करणे ही नैतिक जबाबदारी - जिल्हाधिकारी दिलीप स्वामी



तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.१४ डिसेंबर - विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रदान करणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दशसूत्री कार्यक्रमप्रसंगी केले

पंचायत समिती शिक्षण विभाग कन्नड व खुलताबाद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दशसूत्री कार्यक्रम कार्यशाळा पार पडली,विद्यार्थ्यांच्या सर्वंकस विकासासाठी दशसूत्री कार्यक्रम जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी हाती घेतला आहे यावेळी अधिक बोलताना ते म्हणाले की,सर्वाधिक जबाबदारी शिक्षकांवर आलेली आहे विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रधान करणे स्पर्धात्मक विद्यार्थी घडवणे आरोग्यक्षम विद्यार्थी घडवणे संस्कारक्षम विद्यार्थी व पुढे होणारे पालक घडवणे या विद्यार्थ्यांना तंत्रस्नेही बनवणे विद्यार्थ्यांकडून कौशल्यपूर्ण स्वावलंबी शिक्षण करून घेणे शिक्षणाच्या विविध प्रकारांमधील आनंदी शिक्षण नाविन्यपूर्ण व रचनात्मक शिक्षण म्हणजे विद्यार्थीच आपल्या ज्ञानाचा रचिता आहे या वाक्यावर आधारित रचनात्मक शिक्षण देणे गरजेचे आहे दशसूत्री चा समावेश करून जर आपण विद्यार्थ्यांचे ज्ञान वृद्धिंगत केले तर एक चांगला समाज तयार होऊन आपल्या देशासाठी आपण काहीतरी केले अशी भावना आपल्यामध्ये निर्माण होईल असे मार्गदर्शन करताना ते म्हणाले.

या कार्यशाळेस उपविभागीय अधिकारी संतोष गोरड जि प माध्यमिक शिक्षणाधिकारी अश्विनी लाटकर,प्राथमिक शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण, शिक्षणाधिकारी अरुणा भूमकर , खुलताबाद तहसीलदार स्वरूप कंकाळ पंचायत समिती कन्नड गटविकास अधिकारी चंद्रहार ढोकणे गटविकास अधिकारी खुलताबाद प्रकाश नाईक कन्नड गटशिक्षणाधिकारी नीता श्रीमाळ खुलताबाद गटशिक्षणाधिकारी दिलीप केवट ,नायब तहसिलदार दिलीपकुमार सोनवण, प्राचार्य जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था सानवी देशमुख, याची प्रमुख उपस्थिती होती .

कार्यक्रमाच्या ठिकाणी कन्नड तालुक्यातील अनेक शिक्षकांच्या चित्रकलेचे व विद्यार्थ्यांच्या सुंदर हस्ताक्षराचे प्रदर्शन मांडण्यात आले होते . कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण यांनी केले तर योगेश पाटील यांनी सूत्रसंचालन केले तर आभार योजनेच्या शिक्षणाधिकारी अरुणा भूमकर यांनी मांडले .

यावेळी कन्नड व खुलताबाद तालुक्यातील विस्तार अधिकारी, जिल्हा परिषद शाळांचे केंद्रप्रमुख मुख्याध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### लोकअदालतीस नागरीकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## १ हजार २९० वादपूर्व प्रकरणात १ कोटी रुपयांची वसुली

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.१४ डिसेंबर - कन्नड येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयात १४ डिसेंबर रोजी न्यायाधीश व्ही. डी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते.

या लोक अदालत मध्ये महावितरण,राष्ट्रीयकृत बँका, पतसंस्था, ग्राम पंचायत, पंचायत समिती, नगरपालिका,बीएसएनएल. व इतर जुन्या प्रकरणांसह न्यायालयातील प्रलंबीत प्रकरणे या लोक अदालतीमध्ये निकाली काढण्यात आली.

या अदालतीसाठी नगर परिषद व ग्रामपंचायत च्या कर थकीत लोकांना नोटिसा देऊन बोलाविण्यात आले होते. यामुळे वर्षानुवर्षे कर थकवणाऱ्यां नगर परिषद च्या २१०० कर थकबाकीदारांना नोटीस बजावली होती त्यापैकी २४३ लोकांनी १६ लाख ८८ हजार ४७७ रुपयांचा कर भरणा केला आहे .तर तालुक्यातील १३८ ग्रामपंचायतींच्या १ हजार ४२ कर थकवणाऱ्या लोकांनी २५ लाख ४१ हजार ७९८ रुपयांचा कर भरणा केला. महावितरणच्या ३० ग्राहकांनी १२ हजार ५०० रुपयाचा भरणा केला आहे.

यासाठी विधी सेवा समिती चे अध्यक्ष न्यायाधीश व्ही. डी. पाटील , न्यायाधीश ए. आय. औटी, न्यायाधीश व्ही. एन. काटकर, कन्नड तालुका वकील संघाचे उपाध्यक्ष ड.अनंत शेजवळ,गटविकास अधिकारी चंद्रहार ढोकणे,नगर परिषद मुख्याधिकारी नंदकिशोर भोंबे , सहाय्यक गटविकास अधिकारी संतोष दारकुंडे , विस्तार अधिकारी एम. एफ. शेख,एच .एल. बांगर, सर्व वकील संघ,नगर परिषद कर्मचारी , ग्रामसेवक उपस्थित होते.

## व्हिडिओचा धाक दाखवून २५ वर्षीय महिलेवर अत्याचार

तभा वृत्तसेवा

पैठण दि १४ :- पैठण शहरातील एका २५ वर्षीय महिलेचा आपल्या सोबतचा बेडरूमध्येमधील व्हिडिओ पतीला पाठवतो असे ब्लॅकमेल करून सदरील महिलेवर अत्याचार केल्याची घटना घडली असून पीडित महिलेच्या तक्रारीवरून नामदेव तुकाराम पोकळे रा. संत एकनाथ गॅस गोडावून पैठण विरुद्ध पोलिसांनी बलात्काराचा गुन्हा दाखल केला आहे.

अधिक माहिती अशी की पैठण शहरातील एका २५ वर्षे महिलेला बेडरूममध्ये सोबत काढलेला व्हिडीओ तिच्या पतीला पाठवितो असे ब्लॅकमेलिंग करून सदरील महिलेवर बळजबरीने अत्याचार करण्याची घटना घडल्यामुळे. या प्रकरणाची तक्रार पीडित महिलेने पैठण पोलीस ठाण्यात शुक्रवारी दि.१३ रोजी दाखल केल्याने पोलीस निरक्षक संजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पैठण पोलिसांनी आरोपी नामदेव तुकाराम पोकळे रा. पैठण विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सपोनि जनाबाई सांगळे या करीत आहे.

## सोयगाव येथील अजंता व्हॅली स्कूल येथे विज्ञान प्रदर्शनाचे

### डॉ.प्रमोद पवार यांच्या हस्ते उद्घाटन; अजंता व्हॅली इंग्लिश स्कूल सोयगाव मध्ये विज्ञान प्रदर्शन प्रचंड उत्साहात



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१४ डिसेंबर

सोयगाव शहरातील अजंता व्हॅली इंग्लिश स्कूलच्या स्तरावर विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.विज्ञान प्रदर्शनात ८० विद्यार्थीनी,निर्मित केले एकूण ४० विविध नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर केले. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ.प्रमोद पवार प्राध्यापक यांच्या हस्ते मुख्य पाहुणे म्हणून करण्यात आले.यावेळी रामचंद्र महाकाळ गटशिक्षण अधिकारी कार्यालयाकडून तर विजय पगारे शालेय समिती अध्यक्ष,रुपाली मानकर मुख्याध्यापक ,संचालक भास्कर पिंगाळकर,दिनकर पिंगाळकर,स्वाती पिंगाळकर आदींची प्रमुख उपस्थिती होती,उच्च माध्यमिक व उच्च प्राथमिक गट अशा दोन गटात झालेल्या या विज्ञान प्रदर्शनात पहिली ते चवथी,आणि पाचवी ते सातवी या गटात प्रदर्शनामध्ये पाणी संधारण कच्चे-पक्के घर वाऱ्याच्या उर्जे वर आधारित गिरण्या जीवन चक्र,वाहतूक प्रणाली,आणि कचरा व्यवस्थापन व उचलणी यांसारखे विविध प्रकल्प सादर करण्यात आले.इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी आपले उपक्रम सादर करताना विज्ञानाविषयीची सर्जनशीलता आणि समज प्रकट केली.

ट्रान्स-डीकन्स्ट्रक्शन आणि ट्रान्स-इंटरप्रिटेशन्सचे जनक म्हणून ओळखले जाणारे डॉ. पवार यांनी विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले आणि त्यांना नाविन्यपूर्ण विचारांसाठी प्रोत्साहन दिले.पोस्ट-डेरिडा साहित्य समीक्षक व वैश्विक विचारवंत म्हणून, त्यांनी अशा कार्यक्रमांमुळे भविष्यातील संशोधक घडण्यास मदत होईल असे त्यांनी यावेळी सांगितले. प्रणाली विजय पगारे,दर्शिका गणेश महाजन,गौरी विष्णु सोनवणे यश अनिल चव्हाण आदींनीसह बाल विद्यार्थ्यांनी सहभाग घेवून प्रचंड प्रतिसाद दिला,या स्पर्धेत गुणांनुसार प्रथम,दुतीय, तृतीय क्रमांक निवडण्यात येवून स्कूल कडून प्रोत्साहन पर बक्षीस सोमवारी देण्यात येणार असल्याची माहिती स्कूल व्यवस्थापनाकडून देण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्कूल च्या शिक्षीका सोनाली बागुल,रंजना जाधव,सिमा पाटील,प्रीयंका रोकडे,रूपाली गोल्हारे,पुजा दामधर शिक्षकेत्तर कर्मचारी अथक परिश्रम घेतले.

## लोकअदालत मध्ये नगरपालिकेने केली १६ लाखांची वसुली



तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.१४ डिसेंबर - दिवाणी व फौजदारी न्यायालयात दि.१४ शनिवार रोजी लोक अदालत मध्ये कन्नड नगरपालिकाने तब्बल सोळा लाखांची कर वसुली केली आहे

लोक अदालत मध्ये मालमत्ता कर वसुली पथकाने मुख्याधिकारी तथा प्रशासक नंदकिशोर भोंबे यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण १६ लाख ८८ हजार ४७७ रुपयांची मालमत्ता कर वसुली केली आहे यात दोनशे त्रेचाळीस नागरिकांना मालमत्ता कर भरलेला आहे शहरातील नगरपालिका हद्दीतील एकूण २१०० नागरिकांना मालमत्ता कर भरणे बाबत नोटीस देण्यात आलेल्या होत्या त्यापैकी २४३ नागरिकांनी दि.१४ रोजी मालमत्ता कर भरणा केला आहे

या वसुली पथकात भाग्यश्री बेडगे, शितल चौधरी, प्रशांत देशपांडे ,वैशाली दाभाडे,साईनाथ फुले,अतुल साळवे,पवन परदेशी, सय्यद मुमताज अली,शेख फसियोद्दिन,नारायण कनगरे, प्राजक्ता शेजुळ,प्रतीक्षा दिवाणे,राहुल करडे ,निलेश शिंदे,प्रदीप अल्लाड,,प्रांजल अल्लाड, रविंद्र रजोरा,मुकेश राजोरा, देविदास पाटील,बाजीराव थोरात, भागीनाथ अल्लाड, देवेंद्र रजोरा, जगन शिरसे,सुरेश शिरसे,शाम कनगरे,राजू पवार, सत्वगुणा जोगदंड ,शोभा साठे, पोपट जाधव,नितेश बेद ,शिवा निकम,पवन शेजवळ,अविनाश कनगरे, गणेश राऊत,रोहित बनकर आदींचा सहभाग होता.

## दत्तजयंती निमित्त दत्त मंदिरावर विद्युत रोषणाई विविध धार्मिक कार्यक्रम



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १४ डिसेंबर पैठण तालुक्यातील बिडकीन व परिसरात दत्तजयंती निमित्त सर्व मंदिर वर रंगरंगोटी व विद्युत रोषणाई करण्यात आली असून, पारायण कथा वाचन करण्यात आले आहे, सद्गुरू दत्त जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला आहे,जागृत भगवान दत्तात्रेय मंदिर दत्तगल्ली येथे दत्त जयंती निमित्त सकाळी दत्त परायण समाप्ती व सायंकाळी ६:३० वाजता जन्मोत्सव सोहळा महाआरती आयोजन करण्यात आले होते व दि १५ रविवार रोजी दुपारी महाप्रसादाचे आयोजन श्रीदत्त मंदिर समिती च्या वतीने करण्यात आले आहे. जास्तीत जास्त भावीकांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आव्हान मंदिर समितीच्या वतीने गोविंद तोतला, संजय देवळाणकर, नंदकुमार वैद्य,अभिजीत ढाकेफळे,राजु कोथंबीरे, अनिल गव्हाने , विलास मुळे,आदीनी केले आहे

## सौ गयाबाई बाबुराव भालेकर यांचे निधन



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १४ पैठण तालुक्यातील ववा येथील सौ गयाबाई बाबुराव भालेकर वय ९३ वर्ष यांचे वर्धापकाळाने दि. १४ शनिवार रोजी पहाटे चार वाजेदरम्यान दुःखद निधन झाले त्यांच्यावर सकाळी अकरा वाजता गावातील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात पती, दोन मुले ,सुना, तीन मुली, जावई, नातवंडे, परतुंडे असा मोठा परिवार आहे

## पक्षाघाता बरोबर लढण्यासाठी तंत्रज्ञान आणि टीमवर्क गरजेचे - मराठवाडा इंडोव्हेस्क्युलर २.० परिषदेत तज्ञांचे आवाहन

छ . संभाजीनगर : हृदय विकाराचा झटका आल्यानंतर जसे सुरुवातीचे काही तास अत्यंत महत्वाचे असतात तसेच पक्षाघाताचा झटका आल्यानंतरही तत्काळ उपचार मिळाले तर रुग्ण बरा होण्याची शक्यता जास्तीत जास्त वाढते . त्यामात्र त्यासाठी फिजिशियन पासून ते मेंदूविकारतज्ञांनी एक टीम होऊन काम करणे आवश्यक आहे. त्यासाठी मराठवाडा इंडोव्हेस्क्युलर २.० सारख्या परिषदांची गरज आहे असे मत या परिषदेत तज्ञ डॉक्टरांनी मांडले.

Marathwada Endovascular Summit २.० छ. संभाजीनगर (आयएसव्हीईआर) च्या वतीने स्ट्रोक अँड न्युरो इंटरव्हेंशन २.० अर्थात पक्षाघात आणि मेंदू विकार उपचार या विषयावर परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. एमजीएम रुग्णालयाच्या द्योतन सभागृहात परिषदेचे उद्घाटन आज झाले. पक्षाघाताबरोबर लढा देण्यासाठी टीम वर्क ची आवश्यकता असते. फिजिशियनने तत्काळ उपचाराची गरज ओळखून रुग्णाला पुढील उपचारासाठी पाठवले पाहिजे. एमआरआय आणि सिटी स्कॅन हा दुसरा महत्वाचा टप्पा असल्याने त्याचे महत्व एमजीएम रुग्णालयाच्या रेडीओलोजी विभागाचे प्रमुख डॉ. दहिफळे यांनी सांगितले. डॉ. राहुल चौधरी यांनी पक्षाघात आणि गैरसमज या संदर्भात माहिती दिली. डॉ. आनंद सोनी यांनी पक्षाघातानंतर कोणती काळजी घ्यावयाची यासंदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले.



आपल्या शहरातील वैद्यकीय शासकीय रुग्णालयात जास्तीत जास्त सुपरस्पेशालिटी शाखा सुरु करण्याचा प्रयत्न आहे. एन्डोव्हॅस्क्युलर शाखाही लवकरच सुरु होईल असे प्रतिपादन अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी उदघाटन प्रसंगी केले. महात्मा गांधी विद्यापीठाचे कुलपती डॉ. अंकुशराव कदम आणि डॉ. प्रवीण सूर्यवंशी यांनी शुभेच्छा संदेश दिले . एमजीएम ट्रस्टचे उपाध्यक्ष डॉ .पी.एम.जाधव, डॉ. शिवाजी सुक्रे, डॉ. अनिल कारपूरकर. डॉ. रश्मी सराफ , डॉ. पी. एम.जाधव ,डॉ . राघवन , डॉ.गाडेकर यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. एमजीएमच्या द्योतन सभागृहात परिषदेचे उद्घाटन झाले. संयोजन समितीचे सचिव डॉ. शिवाजी पोले यांनी प्रास्ताविक केले.

पक्षाघात फक्त वयस्कर लोकानांच होतो असे नाही तर लहान मुलांनाही पक्षाघात होऊ शकतो. असे झाल्यास त्या मुलाचे पुढील आयुष्य कठीण असते. लहान मुलांमधील मेंदू विकार आणि पक्षाघात यावरील विशेष चर्चासत्रात मुंबईच्या केईम हॉस्पिटलमधील तज्ञ डॉ. रश्मी सराफ यांनी मार्गदर्शन केले. इंटरव्हेंशनल न्युरोरॅडिओलॉजी किंवा एंडोव्हॅस्कुलर न्यूरोसर्जरी ही पक्षाघातावरील अत्याधुनिक उपचार पद्धती आहे. पक्षाघाताचा झटका आल्यानंतर २४ तासानंतरही एंडोव्हॅस्कुलर न्यूरोसर्जरीमुळे रुग्णाला लवकरात लवकर बरे करता याते. यासंदर्भात मुंबईचे ज्येष्ठ न्यूरोसर्जन डॉ. अनिल कारापूरकर यांचे सविस्तर मार्गदर्शन परिषदेतील महत्वाचा विषय ठरला. मराठवाड्यातील तळागाळातील रुग्णापर्यंत हे आधुनिक उपचार पोहचले पाहिजेत असे यावेळी डॉ. कारापूरकर म्हणाले.

एंडोव्हॅस्कुलर उपचार पद्धतीमधील छ. संभाजीनगर मधील अग्रेसर डॉ. पोले यांनी शहरात वर्षाला किमान ६० ते ७० पक्षाघाताच्या रुग्णावर एंडोव्हॅस्कुलर पद्धतीने उपचार होत असल्याचे सांगितले. पक्षाघाताचा झटका आल्यानंतर सर्वप्रथम सिटी स्कॅन आणि एमआरआय, त्यानंतर प्राथमिक औषधोपचार, न्युरोर्सजन चे महत्व आणि त्यानंतर न्युरो इंडोव्हेस्क्युलर सर्जरी असा क्रम आहे तो साध्य करावयाचा असेल तर टीमवर्कचे गरज आहे असे सांगून हे तंत्रज्ञान तालुकास्तरापर्यंत पोचवण्यासाठी सर्व वैद्यकीय शाखेचे डॉक्टर एकत्र यावेत यासाठी ही परिषद महत्वाची ठरणार असल्याचे सांगितले. डॉ. इस्तियाक सिद्धिकी यांनी न्यूरोसर्जरी केव्हा व्हायला हवी याविषयी मार्गदर्शन केले. निवासी डॉक्टरांसाठी आयोजित कार्यशाळेत सुमारे ३० डॉक्टर सहभागी झाले होते. तर पोस्टर प्रदर्शन मध्ये २६ जणांनी सहभाग नोंदवला.